अंक दुसरा

त्रैमासिक
जुलै-सप्टेंबर २०२६

धि गोवा हिंदु असोसिएशन

# गोमंत तरंग

संपादक - जितेश सावंत

**NKGSB Co-operative Bank Ltd.** (Multi-State Scheduled Bank)

SINCE 1917

108 Years of Banking Excellence

# Achieving Growth Every Step Forward....



## Financial Year 2025-2026

# BUSINESS MIX CROSSED

# ₹14,700 Crore

We Thank our Customers, Shareholders & Well-wishers for their support & faith in our vision of growth....

www.nkgsb-bank.com

Customer Care : 08069791917

धि गोवा हिंदु असोसिएशन, गोमंतधाम, ३५८, डॉ. भडकमकर मार्ग, मुंबई - ४०० ००७.
संपर्क - मुंबई - ०२२-४९७९८२५६ / मोबा - ९०८२१८३८०६
स्थापना - १९१९ रजिस्टर १९४०
Email :gomanttarang@gmail.com / Web.:https://goahinduasso.org

# 'गोमंत तरंग'

## संपादकीय विभाग


| | | |
|---|---|---|
| संपादक | : | श्री. जितेश सावंत |
| उपसंपादक | : | श्री. समीर कामत |
| सल्लागार मंडळ | : | श्री. सुभाष सराफ, श्रीमती निरुपा केणी, श्री. विजय केंकरे |
| संपादकीय मंडळ | : | श्री. राजेंद्र पै, ॲड. महादजी प्रभुदेसाई, श्रीमती शर्मिला रेडकर, श्रीमती रजनी लोटलीकर, श्रीमती रश्मी हळर्णकर |


# THE GOA HINDU ASSOCIATION

## MANAGING COMMITTEE MEMBERS (2025-2027)

| No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | President | CA Subhash Saraf |
| 2 | Vice President | Smt. Nirupa Quenim |
| 3 | Vice President | Shri Vijay Kenkre |
| 4 | Vice President | Shri Anil B. Pai Kakode |
| 5 | Chairman | Smt. Smita Partagalkar |
| 6 | Vice Chairman | Shri Rajendra Pai |
| 7 | Jt. Secretary | Shri Jitesh Sawant |
| 8 | Jt. Secretary | Smt. Sharmila Redkar |
| 9 | Jt. Treasurer | Shri Bhushan Moye |
| 10 | Jt. Treasurer | Shri Samir Kamat |
| 11 | Member | Shri Shirish Borkar |
| 12 | Member | Shri Omprakash Pilgaonkar |
| 13 | Member | Adv. Mahadji Prabhudesai |
| 14 | Member | Smt. Medha Keni-Gaitonde |
| 15 | Member | Smt. Rashmi Halarnkar |
| 16 | Member | Smt. Rajani Lotlikar |

गोमंत तरंग (त्रैमासिक) अंक दुसरा : जुलै ते सप्टेंबर २०२६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | श्री. जितेश सावंत (संपादक) | ३ |
| २. | अध्यक्षांचे मनोगत | सी. ए. सुभाष सराफ (अध्यक्ष) | ४ |
| ३. | दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती | श्रीमती निरुपा केणी (उपाध्यक्षा) | ५-६ |
| ४. | रंगभूमी ते ऑस्कर : सुबोध खानोलकर यांची विशेष मुलाखत | मुलाखतकार: श्री. जितेश सावंत | ७-१३ |
| ५. | मुंबईत दिसणारा गोवा | समीर परांजपे, मुख्य उपसंपादक, दैनिक लोकमत | १५-२० |
| ६. | त्या तरुतळी विसरले गीत : जेजेतील किपलिंग बंगल्याची कहाणी | अपर्णा पाटील, वरिष्ठ पत्रकार | २१-२४ |
| ७. | दुहीच्या भिंती की संवादाचे सेतू ? | कविता आमोणकर, लेखिका, पत्रकार, कवयित्री | २६-२७ |
| ८. | संवादाच्या सावल्या | कवी -प्रथमेश किशोर पाठक | २९-३१ |
| ९. | स्मरण, नटवर्य परशुराम सामंत | सुरेश तेलंग, पत्रकार ,समीक्षक | ३२ |
| १०. | 'खडाष्टक': संस्थेच्या रंगभूमीवरील सुवर्णयुगाची नांदी | जितेश सावंत | ३३-३४ |
| ११. | नाटक वाचवा: जिवंत कलेसाठी एक मनापासून आवाहन | प्रदीप मधुकर सावर्डेकर | ३५-३६ |
| १२. | डिजिटल फुटप्रिंट : न्यायव्यवस्थेतील नवा साक्षीदार | जितेश सावंत | ३८-४० |
| १३. | सोबीत सुंदर गोंय | अनघा विठ्ठलकृष्ण कामत | ४१-४२ |
| १४. | 'गोमंत तरंग' प्रथम अंक प्रकाशन सोहळा | | ४३ |
| १५. | आदरांजली | | ४४-४८ |
| १६. | Mala 'Rahvatach' nahi | Hari Kotian, Communication Course Leader | ४९-५० |
| १७. | Stories in Stoneë Part 1, Mythology in Hoysala Sculptures | Prajakti Pai | ५१-५२ |
| १८. | Where is God ?? | Adv. Mahadji S. Prabhudesai | ५३-५४ |
| १९. | To Retire or Not? | Nilesh G Hunswadkar | ५५-५६ |
| २०. | शुभेच्छा & अभिप्राय (Messages, Wishes & Feedback) | | ५७-६३ |


## अस्वीकरण (Disclaimer)

या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मते आणि विचार हे सर्वस्वी संबंधित लेखकांचे असून, त्याच्याशी 'धि गोवा हिंदु असोसिएशन' किंवा संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनातील सत्यता, संदर्भ आणि तथ्यांची सर्व जबाबदारी संबंधित लेखकाची राहील. प्राप्त झालेले साहित्य संपादित करण्याचा किंवा नाकारण्याचा सर्वाधिकार संपादकीय मंडळाकडे राखीव आहे.

या अंकातील मजकुराचा अनधिकृत वापर किंवा पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.

◆◆◆◆◆◆

**मुखपृष्ठ सजावट आणि अंकाची मांडणी - श्री. महेश दिपक गावडे**
**(www.growbizmediatech.com)**

◆◆◆◆◆◆

**प्रकाशक: धि गोवा हिंदु असोसिएशन, मुंबई.**

**प्रस्तुत त्रैमासिक केवळ संस्थेचे सभासद आणि हितचिंतकांसाठी खाजगी वितरणाकरिता (For Private Circulation Only) असून ते विक्रीसाठी नाही.**

# संपादकीय

नमस्कार,

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर 'गोमंत तरंग'चा पहिला अंक आपल्या हाती सोपवताना जो आनंद आणि हुरहुर होती, त्याचे रूपांतर आज एका मोठ्या समाधानात झाले आहे. पहिल्या अंकाला आपण सर्वांनी दिलेला उदंड प्रतिसाद, कौतुकाची थाप आणि मौलिक प्रतिक्रिया आमच्यासाठी केवळ दाद नसून, ती एका नव्या ऊर्जेची शिदोरी आहे.

आपल्या या पहिल्या अंकाचे प्रकाशन मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील दिग्गज व्यक्तिमत्त्व माननीय पद्मश्री, महाराष्ट्र भूषण श्री. अशोक सराफ आणि अभिनेत्री श्रीमती निवेदिता सराफ यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. त्यांच्या उपस्थितीने या सोहळ्याला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. त्यांनी व्यक्त केलेल्या शुभेच्छा या आमच्या संपूर्ण संपादकीय टीमसाठी एका मोठ्या पुरस्कारापेक्षा कमी नाही.

पहिल्या अंकात आपण दिग्गज दिग्दर्शक श्री. विजय केंकरे यांची मुलाखत वाचली. ह्या मुलाखतीला वाचकांनी भरभरून पसंती दिली. त्याबद्दल मी सर्व वाचकांचे आभार मानतो. तोच दर्जेदार वारसा पुढे चालवत, या अंकातही आपण कला क्षेत्रातील एका तरुण मान्यवर व्यक्तिमत्त्वाची विशेष मुलाखत वाचणार आहोत. त्यांचा जीवनप्रवास आणि अनुभव निश्चितच तुम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल.

विशेष म्हणजे, अंकात आपल्याला विविध क्षेत्रांतील नामवंत लेखकांचे अभ्यासपूर्ण लेख वाचायला मिळणार आहेत. तसेच, पहिल्या अंकाप्रमाणेच अनेक मान्यवरांनी पाठवलेले 'शुभेच्छापर संदेश व अभिप्राय' हे देखील या अंकाचे दुसरे महत्त्वाचे आकर्षण आहे, जे आमचा उत्साह द्विगुणित करणारे ठरले आहेत.

'धि गोवा हिंदु असोसिएशन'ची १०६ वर्षांची गौरवशाली पार्श्वभूमी जपतानाच, नव्या पिढीला जोडणारा एक सशक्त सेतू म्हणून हे त्रैमासिक नावारूपाला येत आहे, याचे आम्हाला समाधान आहे.

अध्यक्ष श्री. सुभाष सराफ आणि उपाध्यक्षा श्रीमती निरुपा केणी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेला हा 'शब्दप्रवास' आपल्या सहकार्यामुळे अधिक समृद्ध होत आहे. हा अंकही आपल्याला तितकाच आवडेल आणि आपल्या अपेक्षांची पूर्तता करेल, असा दृढ विश्वास आम्हाला आहे.

वाचनसंस्कृतीत वाढ करण्याच्या या विधायक उपक्रमात ज्यांना सहभागी व्हायचे आहे, त्यांचे आम्ही मन:पूर्वक स्वागत करतो. मी आपल्याला एवढेच सांगेन 'गोमंत तरंग' फक्त वाचू नका, त्याचा भाग बना.

आपल्या प्रतिक्रियांची आम्ही नेहमीप्रमाणेच आतुरतेने वाट पाहत आहोत.

आपला,
**जितेश सावंत,**
संपादक, गोमंत तरंग

## अध्यक्षीय संदेश

आपल्या संस्थेच्या या दुसऱ्या त्रैमासिकाच्या प्रकाशन समारंभी आपल्याशी सवांद साधताना मला अतिशय आनंद होत आहे. मी, धि गोवा हिंदु असोसिएशनच्या सर्व सभासदांचे मनापासून स्वागत करतो.

गेल्या शतकाहुन अधिक काळापासून आपली संस्था समाजसेवेच्या कार्यात अखंडपणे योगदान देत आहे आणि ही परंपरा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आजवर गेल्या १०० हुन अधिक वर्षातील संस्थेच्या कार्यकारी मंडळांनी व स्वयंसेवकांनी निरलस वृत्तीने केलेल्या सेवेमुळे आपण ही वाटचाल करू शकलो आणि तशीच कार्यकारिणी आज संस्थेला लाभली हे आम्ही आमचे भाग्य समजतो.

समाजाशी जवळीक साधण्यासाठी आणि आमचे विचार व्यापक स्तरावर पोहोचवण्यासाठी हे त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर समाजातील मान्यवर व्यक्तींचे विविध विषयावरील लेख या मासिकात समाविष्ट करावेत हा आमचा उद्देश्य आहे.

आजच्या जागतिक परिस्थितीत यद्ध, संघर्ष व अस्थिरता यांचा समाजावर परिणाम होत आहे. अशा काळात नागरिक म्हणून आपली जबाबदारी अधिक वाढते. आपल्या कुटुंब व समाजाच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी आवश्यक काळजी व खबरदारी घेऊया.

होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य देण्याची आपली प्रथा निरंतर सुरु आहे. त्याच्या जोडीने दर महिन्याला काही गरजू व पात्र व्यक्तींना वैद्यकीय मदत देण्यात येते. सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून जर निधी उपलब्ध करण्यात आला तर या दोन्ही उपक्रमासाठी त्याचा विनियोग करण्यात येऊ शकेल.

गोवा हिंदु असोसिएशनचे नाव घेतले कि लोकांना आठवतात ती संस्थेने सादर केलेली संगीत नाटके तसेच विविध विषयावरील आशयघन नाटके. त्या परंपरेला साजेसे असे एक रहस्यमय नवीन नाटक “सुभेदार गेस्ट हाऊस” संस्थेने रंगभूमीवर सादर केले आहे आणि त्याचा रौप्यमहोत्सवी प्रयोग मुंबईत गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर पद्मश्री अशोक सराफ व सौ. निवेदिता सराफ यांच्या उपस्थितीत सादर केला.

आजही या नाटकाचे प्रयोग जोरात चालू आहेत. महाराष्ट्राच्या मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली, कराड, सोलापूर या शहरात त्याचे प्रयोग झाले आहेत आणि लवकरच गोव्यामध्ये या नाटकाचे प्रयोग करण्याचा आमचा मानस आहे.

आपण सर्व सदस्य, स्वयंसेवक व शुभेच्छुकांचे मन:पूर्वक आभार व असेच प्रेम व सहाय्य संस्थेला लाभावे ही इच्छा.

**– सुभाष सराफ**
अध्यक्ष, धि गोवा हिंदु असोसिएशन

# दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती - २

**लेखिका : सौ. निरूपा केणी**
(उपाध्यक्षा, धि गोवा हिंदु असोसिएशन)

मागील अंकात आपण.......

'धि गोवा हिंदू असोसिएशन'च्या गौरवशाली परंपरेचा वेध घेताना, संस्थेच्या स्थापनेचा काळ, सुरुवातीच्या वाटचालीचा इतिहास आणि सांस्कृतिक विश्वात संस्थेने उमटवलेली पहिली प्रभावी पावले यांचा प्रेरणादायी प्रवास अनुभवला.

आता वाचूया या प्रवासाचा पुढील अध्याय...

संगीत आणि नाटकाबद्दल प्रेम, आकर्षण आणि रंगभूमीची ओढ असलेल्या आपल्या तरुण व कलासक्त सभासदांना आणि कार्यकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी संस्थेने 'खडाष्टक' हे शं. प. जोशी लिखित व मास्टर दत्ताराम दिग्दर्शित, नव्या धर्तीचे, उपहासात्मक/विडंबनात्मक नाटक, मुंबई राज्य नाट्य स्पर्धेत सादर केले. यांतील सर्व कलाकार संस्थेचे सभासद व कार्यकर्ते होते. हे नाटक प्रथम पारितोषिकास पात्र ठरले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा, सभासदांचा, कार्यकर्त्यांचा आनंद तर द्विगुणित झालाच पण व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करायची प्रेरणा आणि उर्मी अंगांत संचारली. या नाटकाने संस्थेच्या पुढील उत्कर्षाची पायाभरणी केली असं म्हणणे वावगे ठरणार नाही

१९५६ साली कलाविभागाची स्थापना केली गेली . त्याच साली गो.ब. देवल लिखित व गोपिनाथ सावकार दिग्दर्शित 'संगीत संशय कल्लोळ' हे नाटक मुंबई राज्य नाट्य स्पर्धेत सादर केले गेले आणि या नाटकाला ही प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. १९५७ साली मामा वरेरकरांचे 'करिन ती पूर्व' आणि १९५९ साली गो. ब. देवल लिखित 'संगीत शारदा' अशी दोन नाटके मुंबई राज्य नाट्य स्पर्धेत सादर केली गेली आणि तिसऱ्या आणि पहिल्या पारितोषिकांची मानकरी ठरलीं. या दोन्ही नाटकांचे दिग्दर्शक गोपिनाथ सावकार होते.

या यशाने कलाविभागाच्या पदाधिकाऱ्यांचा उत्साह वाढला आणि व्यावसायिक रंगभूमी खुणावू लागली. परंतु, व्यावसायिक रंगभूमीचा तेवढा अभ्यास आणि अनुभव नसल्या कारणाने, व्यवसायिक रंगभूमीवर पदार्पण करणे जोखीमीचे होते हे कलाविभागाच्या पदाधिकाऱ्यांनी जाणले. त्याच वेळी, सभासदांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहास बाधा न आणता त्यांना कार्यरत ठेवण्यासाठी कलाविभागाने सन १९६० मध्ये शरदचंद्र निफाडकर लिखित व नंदकुमार रावते दिग्दर्शित 'युध्दस्य कथा रम्या' आणि त्याच वर्षी भालचंद्र मडकईकर लिखित व रघुवीर नेवरेकर दिग्दर्शित 'मरणात खरोखर जग जगते' या दोन कलाकृती रंगभूमीवर सादर केल्या.

१९६१ साल उजाडले. यावर्षी कलाविभागा तर्फे दोन नाटकांची निर्मिती झाली. चिं. य. मराठे लिखित व गोपिनाथ सावकार दिग्दर्शित 'सं. होनाजी बाळा' आणि गो.ब. देवल लिखित व 'नंदकुमार रावते दिग्दर्शित' 'सं.मृच्छकटीक'. व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करण्या अगोदर निर्मित केलेल्या नाटकांचे प्रयोग कलाविभाग तर्फे केले गेले. पण प्रत्येक नाटकाच्या प्रयोगांची संख्या खास अशी नव्हती. हे प्रयोग करण्यामागे कलाविभागाचा उद्देश फक्त अर्थार्जन नव्हता तर आनंद आणि अनुभव मिळावा हि त्यामागची भावना होती. त्यामुळे आनंद तर प्राप्त झालाच पण मुख्य म्हणजे अनुभव, प्रयोग करण्याची कार्य पद्धती, त्यांतले बारकावे आत्मसात करता आले. सराव, व्यक्तीला परिपूर्ण बनवतो त्याचा प्रत्यय अनुभवामुळे आला हे मुख्य. मागच्या पिढीने पुढच्या पिढीला घालून दिलेला हा एक अर्थपूर्ण धडा होता आणि आहे.

**व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण**

१९६२ साल, कलाविभागाच्या कारकीर्दीतील अविस्मरणीय वर्ष म्हटल्यास वावगे ठरणार नाही. व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करण्याची वेळ आली

होती. कलाविभागाच्या दृष्टीने हे स्वनापूर्तीचे हे वर्ष होते. नाटक होते ’रायगडाला जेव्हा जाग येते’ आणि नाटककार प्रा. वसंतराव कानेटकर. हौशी रंगभूमीवरील एक प्रतिथयश नाटककार म्हणून त्यांचा लौकिक होता. वेड्याचे घर उन्हांत, प्रेमा तुझा रंग कसा अश्या त्यांच्या नाट्य कलाकृती मुंबई राज्य नाट्य स्पर्धेत सादर झालेल्या होत्या. विविध विषय हाताळण्याची क्षमता, आशय घनता, घटनांची सुबक मांडणी, मनाला भिडणारे संवाद हि वसंतराव कानेटकरांच्या लेखणीची किमया होती. ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ हे नाटक लिहिण्याची प्रक्रिया तर १९५९ पासून सुरु झाली होती. वसंतराव कानेटकरां सारख्या सिद्धहस्त लेखकाकडून हे नाटक लिहून घ्यायचे हे निश्चित झाल्यानंतर, शिक्षणतज्ज्ञ, रंगकर्मी व संस्थेचे सभासद श्री. भिकू पै आंगले यांनी कानेटकरांसोबत रायगडाला भेट दिली आणि त्या भेटीत वसंतरावांना नाटकाचा सूर सांपडला. त्यानंतर, नाट्यलेखन, वाचन, कलाकारांची निवड, तालमी, अशी वाटचाल करत ऑक्टोबर १९६२ साली संस्थेच्या कलाविभागानं या नाटकाद्वारे व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवले. संस्थेचा लौकिक सर्वदूर झाला.

“सह्याद्रीच्या कुशीत निजल्या रायगडा हो जागा
शिवरायांच्या हृदयांतरीचे शल्य मला सांगा”.

स्नेहल भाटकर यांच्या धीरगंभीर पार्श्वसंगीताच्या सुरावटीवर आधारलेल्या या मनोवेधक भूपाळीने व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या या मनोविश्लेषणात्मक नाटकाने, शुभारंभाच्या प्रयोगांतच रसिकांना जिंकले. त्याचप्रमाणे, श्री वसंतराव कानेटकरांना व्यावसायिक रंगभूमीवरचे प्रतिथयश नाटककार म्हणून प्रसिद्धी मिळाली. मास्टर दत्तारामांचे दिग्दर्शन, त्यांनी साकारलेली छत्रपती शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा, काशिनाथ घाणेकरांचा - संभाजी आणि इतर कलाकारांच्या अभिनयाने नाटकाला अत्युच्च पातळीवर नेऊन ठेवले. रायगडने ६६६ प्रयोगांचा विक्रम केला. . . . . . . . . . . . क्रमश:

# रंगभूमी ते ऑस्कर

## बालनाट्याच्या रंगमंचापासून ऑस्करच्या शर्यतीपर्यंत : सर्जनशीलतेचा बहुआयामी प्रवास घडवणारे सुबोध खानोलकर यांची विशेष मुलाखत

**मुलाखतकार : जितेश सावंत**
संपादक, 'गोमंत तरंग'



'गोमंत तरंग'च्या पहिल्या अंकाच्या उत्स्फूर्त यशानंतर, दुसऱ्या अंकात आम्ही घेऊन आलो आहोत एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व सुबोध खानोलकर. शालेय बालनाट्ये आणि प्रायोगिक रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज ऑस्कर २०२६ च्या 'कंटेन्शन लिस्ट 'मधील 'दशावतार' या चित्रपटापर्यंत पोहोचला आहे. पं. सत्यदेव दुबे, चेतन दातार आणि अरुण काकडे यांसारख्या दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली घडलेली त्यांची कलादृष्टी, आज जाहिरात आणि चित्रपटसृष्टीत स्वत:चा वेगळा ठसा उमटवत आहे. जागतिक स्तरावर मराठी चित्रपटसृष्टीची मान उंचावणाऱ्या या सृजनशील प्रवासाचा घेतलेला हा विशेष मागोवा.....

**प्र.: शालेय जीवनापासूनच वक्तृत्व आणि अभिनयाची आवड जोपासत तुम्ही रंगभूमीकडे वळलात. त्या सुरुवातीच्या काळातील अनुभवांनी तुमच्या व्यक्तिमत्त्वावर कसा प्रभाव टाकला?**

शाळेत अगदी पहिली दुसरीत असतानाच कदाचित खूप बडबड्या असल्याने आमच्या सौ. श्रद्धा पुळेकर बाईंनी मला नाटकात भाग घ्यायला लावला आणि तिथूनच सगळं बदलत गेलं असावं. मुलांची उर्जा कुठे वळवावी ह्याचं भान असलेले शिक्षक मला शालेय जीवनात लाभले. पित्रे बाई, खेडकर बाई, पाटील सर ह्यांसारख्या शिक्षकांमुळे मी अगदी पहिलीपासून ते दहावीपर्यंत सातत्याने नाटकात कामं करत होतो. माझ्या आजोबांना स्व.म.भा. खानोलकर ह्यांना लेखनाचं उत्तम अंग होतं, ते सुरुवातीच्या काळात मला वक्तृत्व स्पर्धेसाठी भाषण लिहून देणं, माझी तयारी करुन घेणं अगदी आवडीने करायचे. ह्या साऱ्यांमुळे रंगमंचावर शेकडो प्रेक्षकांसमोर उभं राहण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. स्वत:चे विचार सुस्पष्टपणे मांडण्याची बैठक तयार झाली आणि मूळात नाटकाचं, performing art चं वेड लागलं.

**प्र. : दूरदर्शनच्या 'किलबिल' कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या त्या लहान मुलापासून ते आज ऑस्करच्या शर्यतीत स्थान मिळवणाऱ्या दिग्दर्शकापर्यंतचा हा प्रवास या दोन टप्प्यांमध्ये तुम्हाला कोणतं साम्य जाणवतं?**

शालेय जीवनात असताना शाळेतर्फे आमची बालनाट्यं अनेकदा 'किलबिल' ह्या दूरदर्शनवरच्या कार्यक्रमात सादर व्हायची. दूरदर्शनचा तो स्टुडियो, ते मोठाले कॅमेरे, लाईट्स, कंट्रोल रुम हे सगळं पाहून अचंबित झाल्याचं आठवतंय. आपणही पुढे जाऊन कधी ना कधी हे सगळं करायला हवं असंही तेव्हा वाटून गेलं होतं. नाटकात काम करतानाच सोबतच सर्वांचे संवाद तोंडपाठ करणं, शिक्षकांनी नाटक बसवताना ते लक्षात ठेवून इतर मुलांच्या तालमी घेणं वगैरे ओघानेच करु लागलो होतो. नाटकातील पात्रांचे संवाद कसे असावेत, ते कसे म्हटले जावे, हातवारे कृती कशी असावी वगैरे बाबत माझी मतंही देऊ लागलो होतो. संघाचं नेतृत्व आणि जबाबदारी घ्यायला आवडायला लागली. (तो आगाऊपणाच जास्त होता) पण ह्यातूनच कदाचित दिग्दर्शनाची सुरुवात झाली असावी. ते नेमकं काय असतं ह्याची मात्र तेव्हा कल्पना नव्हती. एवढंच कळत होतं की हे सगळं करताना खूप मजा येतेय आणि कितीही कष्ट पडले तरी कंटाळा येत नाहीये. आज जेव्हा चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आणि ऑस्करच्या शर्यतीपर्यंत पोहोचलो तेव्हा लक्षात येतंय की शालेय जीवनातला आत्मविश्वास, जबाबदारी घेण्याची आवड आणि गोष्ट सांगण्याचं, सादरीकरणाचं वेड हे अजूनही तितकच सारखं आहे. बालनाट्य करताना जितकी मजा येत होती, तितकीच मजा 'दशावतार' करतानाही आली आणि पोटात येणारा गोळाही सारखाच होता.

**प्र.: रुपारेल महाविद्यालयातील एकांकिका स्पर्धा आणि आविष्कार संस्थेशी जोडले जाणे हा टप्पा तुमच्या कारकिर्दीत किती निर्णायक ठरला?**

शाळेत असतानाची माझी नाटकाची आवड बघून माझ्या मोठ्या बहिणीने माझ्या आईबाबांना सुचवलं की ह्याला जर नाटकाची आवड असेल तर अश्याच महाविद्यालात शिकायला पाठवूया जिथे नाटकाची दीर्घ पार्श्वभूमी असेल आणि नाटकाची चळवळ जोमात असेल. म्हणूनच मी माटुंग्याच्या डी.जी. रुपारेल महाविद्यालयात दाखल झालो. प्रवेश घेतला वाणिज्य शाखेत, पण तो नावापुरताच लक्ष होतं नाटकाकडे. रुपालेलची नाट्य चळवळ जोरदार सुरु होती. ५०-६० जणांचा नाटकाचा ग्रुप होता. मी अकरावीतच त्यात सामील झालो. दीपक राजाध्यक्ष आमचा पहिला दिग्दर्शक. प्रियदर्शन जाधव, गिरिश ढोके हे सहाय्यक दिग्दर्शक आणि सिद्धार्थ जाधव, अद्वैत दादरकर, नंदिता पाटकर, केतन करंडे, नाट्यनिर्माता राहुल भंडारे हे सगळे सहकलाकार. त्या पहिल्या वर्षातच नाटकाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलून गेला. वाचन वाढलं, शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, सिंफनी ह्यांची ओळख झाली. एकांकीकांचे प्रयोग करत आम्ही भरपूर हिंडू लागलो, वेगवेगळया स्पर्धात सहभाग घेतला, वेगवेगळया विचारसरणीची नाटकं केली, भरपूर पारितोषिकं मिळवली, अभिनयासाठी कौतुक झालं, नाटकाचं मॅनेजमेंट शिकता आलं, नवनवीन मित्र झाले, शालेय जीवनात असलेलं अवकाश एकदम रुंदावलं आणि एका महासागराची ओळख झाली. ज्यात पोहायला आवडणार होतं. ह्याच काळात आविष्कार संस्थेशी जोडला गेलो.

**प्र.: पं. सत्यदेव दुबे, चेतन दातार आणि अरुण काकडे यांसारख्या दिग्गजांकडून शिकण्याचा अनुभव कसा होता? त्यांनी तुम्हाला कलाकार आणि माणूस म्हणून काय दिलं?**

आविष्कार संस्थेचा आणि रुपारेलच्या नाटकाच्या ग्रुपचा जवळचा संबंध होता. रुपारेलची नाट्य चळवळ ही प.सत्यदेव दुबेजींच्या विचारधारेवरच आधारित होती. आविष्कार मध्ये चालणाऱ्या कार्यशाळांत भाग घेतला. काकदे काका, चेतन दातार, रवी सावंत, रसिक राणे ह्यांसारखे नाटकावर प्रेम करणारे दिग्गज तिथे लाभले. आविष्कारच्या नाटकात कामं करु लागलो, पार्श्वसंगीत द्यायला पिटात बसू लागलो, सेट रंगवण्यापासून ते गाडी भरण्यापर्यंत सगळया अनुभव मिळाला. नाटकाचे दौरे करता आले. त्याच काळात प्रदीप मुळेंच्या व्यावसायिक बालनाट्यात ‘राजा सिंह’ मध्ये काम केलं आणि नाटकाचं सौंदर्यशास्त्र, शिस्त, बारकाईने तपशिलात जाऊन काम करणं हे सगळं शिकलो. त्यानंतर दुबेजींनी रुपारेल कॉलेजच्या मुलांसाठी वर्कशॉप घेण्याचं आणि नाटक बसवण्याचं ठरवलं. ती सगळीच प्रोसेस आमच्यासाठी महत्वाची होती. दुबेजींचा सहवास कमी लाभला, पण त्यांच्या विचारांवर, नाट्यपद्धतीवर आणि झोकून देऊन काम करण्यावर माझ्या सर्जनशिलतेचा पाया रचला गेला.

**प्र.: प्रायोगिक रंगभूमीने तुमच्या विचारसरणी आणि सर्जनशीलतेला नेमकी कोणती दिशा दिली?**

प्रायोगिक रंगभूमीने कुठल्याही फळाशिवाय प्रामाणिकपणे काम करायला शिकवलं. कमीत कमी संसाधनात सुद्धा तुमची प्रतिभा पणाला लावता येते हे शिकवलं. नाटक किंवा कुठलंही performing art हे कोणा एकट्याचं नसतं, सांघिक बळ काय असतं हे शिकवलं आणि सर्वात महत्वाचं म्हणजे, एकाच गोष्टीचा विविध अंगांनी विचार करायला आणि ‘प्रयोग’ करायला शिकवलं. आत्ताही कुठल्याही क्षेत्रात काम करताना हीच प्रयोगशिलता आणि मेहनत कामाला येतेय.

**प्र.: आपल्या मते, प्रत्येक कलाकाराने आपल्या कारकिर्दीत किमान एकदा तरी रंगभूमीचा अनुभव घेणं आवश्यक आहे का? की आज विविध माध्यमांच्या वाढत्या संधींमुळे इतर माध्यमांतूनही तितक्याच प्रभावीपणे स्वत:ला घडवता येतं?**

माझ्या मते रंगभूमीला पर्याय नाही. रंगभूमीवर काम करताना प्रेक्षकांशी थेट संबंध येतो. रंगमंचीय अवकाशाच्या मर्यादा असूनही 'make believe' पद्धतीने जगातली कुठलीही घटना सादर करता येते. प्रत्येक सादरीकरण हा नवा अनुभव ठरतो. 'प्रयोग' करता येतात. त्याच वेगवेगळया प्रयत्नांमधून स्वत:ला सुधारण्याची संधी मिळत राहते. इतर कोणत्याही माध्यमात हा अनुभव घेता येत नाही. नाटक सादर होत असताना नाट्यगृहात प्रेक्षक आणि कलाकार एकाच वेळी श्वास घेत असतात, उर्जांचं आदान-प्रदान होतं, हा अनुभव इतर माध्यमांत अशक्य आहे. Live performances ला मरण नाही ! त्यांच्याशिवाय गत्यंतर नाही !

**प्र.: दि. बा. मोकाशी यांच्या 'पालखी'वर आधारित नाटकाचे लेखन आणि अभिनय हा अनुभव कसा होता ?**

महाविद्यालयीन शिक्षण संपता संपता आम्हा रुपारेल महाविद्यालयातल्या मित्रांना असं वाटू लागलं की सातत्याने नाटक करता येईल अशी स्वत:ची एक संस्था आपण सुरु करावी. महाविद्यालयातील एकांकीकां पलिकडे जाऊन दोन अंकी नाटक सादर करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठीच आम्ही 'मिथक' ही संस्था स्थापन केली. त्या संस्थेतर्फे पहिलं नाटक कुठलं असावं ह्यावर विचार सुरु होता. आमच्या एका एकांकीकेला लेखक विजय तेंडुलकर आले होते, दि.बा. मोकाशी ह्यांचं 'पालखी' हे प्रवासवर्णनात्मक पुस्तक त्यांच्या आवडीचं होतं. त्यावर काही करता येतंय का बघा असं तेंडुलकरांनी आम्हाला पूर्वी सुचवलंही होतं. त्यामुळे 'पालखी' पुस्तक शोधून पदवी परिक्षा दिल्यानंतरच्या सुट्टीत नाटक लिहिण्याचा प्रयत्न करुन पाहिला. अद्वैत दादरकर आणि इरावती कर्णिक ह्यांची साथ होती. आणि मग त्यातूनच ६ जून २००६ रोजी 'मिथक' संस्थेची सुरुवात 'पालखी' ह्या नाटकाने झाली. तुफान प्रतिसाद मिळाला. मी त्या नाटकात एक छोटीशी भूमिकाही सादर केली. पुढे अशोक हांडे ह्यांच्या 'चौरंग' ह्या संस्थेने मिथक सोबत हे नाटक सादर केलं आणि जवळपास ८५ प्रयोग महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही सादर केले. ह्या नाटकामुळेच खरंतर लेखक म्हणून माझा प्रवास सुरु झाला.

**प्र.: 'हापूस' आणि 'संदूक' या चित्रपटांपासून ते लोकप्रिय मालिकांपर्यंत लेखन करताना माध्यमानुसार तुमची शैली कशी बदलते ?**

पालखी नाटकानंतर मी महाविद्यालयीन विश्वात अडकून न पडता जाहिरात व मार्केटिंग क्षेत्रात पदव्युत्तर शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. ते एका बाजूला सुरु असतानाच पालखी मुळेच माझ्याकडे लेखनाच्या कामांसाठी विचारणा होऊ लागली. तोवर नाटकात आणि एकांकीकांमध्ये प्रामुख्याने अभिनय करणा-या मला लेखन क्षेत्र खुणावू लागलं आणि मी मालिका लेखनाचा प्रयत्न करुन पाहिला. पटकथा म्हणजे काय हेही माहित नव्हतं. पण धडपड सुरु ठेवली. आणि अभिजीत साटम साठी 'हापूस' चित्रपटाची कथा लिहिली. त्यावर सिनेमा करण्याचं नक्की झालं आणि सौरभ भावे ह्या माझ्या मित्रासोबत पटकथा लिहिली. सौरभ FTII सारख्या नामांकित संस्थेतून लेखनाचं प्रशिक्षण घेऊन आला होता. त्यामुळे त्याच्याकडून पटकथा लेखन शिकता आलं. 'हापूस' च्या यशानंतर संगीत कुलकर्णी ह्या मालिका विश्वातल्या ज्येष्ठ निर्माता-दिग्दर्शकांसोबत मालिका लेखनाचा प्रवास सुरु झाला. मालिका लेखनाचे धडे गिरवले ते संगीत दादांकडेच. सागर दादा, किरण येले, अमोल पणशीकर अशी मनापासून काम करणारी आणि मालिका निर्मिती सचोटीने करणारी माणसं लाभली आणि करु त्यात पूर्ण प्रामाणिकता असेल तर चांगलं फळ मिळतच हे पुन्हा एकदा समजलं. तिथून मग जो मालिका लेखनाचा आणि चित्रपट लेखनाचा प्रवास सुरु झाला, तो आजवर सुरुच आहे. अतुल काळे सारख्या प्रतिभावान दिग्दर्शकासाठी 'संदूक' हा चित्रपट लिहिला, तोही अनुभव समृद्ध करणारा होता. त्याच काळात झी मराठी वाहिनीसाठी अनेक मालिकांचं लेखन आणि नंतर क्रिएटिव्ह डिरेक्टर म्हणून काम केलं. निलेश मयेकरशी गाठ पडली, ज्याने मालिका लेखन कसं करावं, पात्र निर्मिती कशी करावी आणि गोष्ट कशी सांगावी हे शिकवलं, ज्याचा उपयोग आजवरच्या

प्रत्येक कामात होतोय. 'तुझ्यात जीव रंगला' ही स्मृती शिंदे ह्यांची निर्मिती असलेली मालिका हा माझ्या मालिका क्षेत्रातल्या कामाचा महत्वाचा टप्पा ठरला. १२०० हून अधिक भाग ह्या मालिकेचे झाले आणि ती मालिका करताना लेखनासोबतच, क्रिएटिव्ह डिरेक्टर आणि टिम हेड म्हणून जबाबदारी घेता आली. ह्या विविध प्रकल्पांमुळे, माणसांमुळे मी घडत गेलो, तंत्रशुद्ध शिक्षण घेतलेलं नसूनही अनुभवातून शिकत गेलो.

**प्र.: मराठी रंगभूमीच्या जडण घडणीत आणि संवर्धनात धि गोवा हिंदु असोसिएशन सारख्या प्रदीर्घ परंपरा लाभलेल्या प्रतिष्ठित संस्थांचा वाटा आपण कसा पाहता?**

रंगभूमी टिकून रहावी आणि त्यात सातत्याने नवनवीन प्रयोग होत रहावे, नवनवीन माणसं घडत रहावी ह्यासाठी ज्या संस्था दीर्घकाळ काम करत आल्या आहेत, त्यात धि गोवा हिंदू असोसिएशन ही अत्यंत महत्वाची संस्था आहे. प्रतिभावान दिग्दर्शक, लेखक, कलाकार आणि संगीतकारांची मांदियाळी ह्या संस्थेला लाभली आहे. आणि हे सारं असतानाही कुठलाही अभिनिवेश न बाळगता ही संस्था सातत्याने काम करत राहिली आहे. मराठी रंगभूमीच्या इतिहासात धि गोवा हिंदु असोसिएशन चं मानाचं पान आहे. नाटक करणाऱ्या प्रत्येकाला एकदा तरी ह्या संस्थेशी आपण जोडले जावो अशी इच्छा असतेच. अश्या संस्था काळाच्या ओघात टिकून राहणं, सशक्त होणं आणि दिशादर्शक म्हणून कार्यरत राहणं आवश्यक आहे.

**प्र.: कॉपीरायटरपासून स्वत:ची 'ओशन फिल्म कंपनी' स्थापन करण्यापर्यंतचा प्रवास कसा घडला? जाहिरात क्षेत्रात टिकून राहण्यासाठी 'क्रिएटिव्हिटी' आणि 'कन्सिस्टन्सी' यामधला समतोल कसा साधता?**

पालखी ह्या नाटकामुळे आणि जाहिरात क्षेत्रातल्या शिक्षणामुळे माझ्या आयुष्यात आलेली अजून एक महत्वाची व्यक्ती म्हणजे जाहिरात क्षेत्रातलं मोठं नाव, ज्येष्ठ कलादिग्दर्शक विकास गायतोंडे. त्यांनी सर्वप्रथम माझ्यातला लेखक ओळखला, जेव्हा मी केवळ २१-२२ वर्षांचा होतो. जाहिरातींच्या कॉपी रायटिंगची कामं दिली. चित्रपट लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिलं आणि कुठलाही अनुभव नसातानाही आमच्यावर विश्वास टाकून जाहिरात निर्मिती करायला दिली. त्यांनीच मला आणि सुजय हांडे, ओंकार काटे ह्या आम्हा तीन मित्रांना एकत्र येऊन 'ओशन फिल्म कंपनी' ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन करायला लावली. त्या कंपनीच्या लोगोपासून ते आम्हाला जाहिरात कशी असावी, लेआऊट्स कसे असावे, ग्राहकाची गरज आणि जाहिरातीचा फोकस कसा असावा असं सारं काही शिकवलं. चुकलो तिथे मार्गदर्शन केलं, मार्ग दाखवला. आजही विकास गायतोंडे आमचे गुरु आणि मार्गदर्शक म्हणून आम्हाला योग्य दिशा दाखवत असतात. त्यांनीच दाखवलेल्या मार्गावर जाहिरात क्षेत्रात आम्ही काम करतो. चांगली संकल्पना असून उपयोग नाही, तिचं सादरीकरणही तितकंच उत्तम असायला हवं हे गायतोंडे ह्यांनीच शिकवलं, ज्याचा उपयोग जाहिरात क्षेत्रातच नव्हे तर 'दशावतार' सारखा चित्रपट करतानाही झाला. 'क्रिएटिव्हिटी' आणि 'कन्सिस्टन्सी' ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कामात सातत्य नसेल तर नवनवीन विचार सुचणारच नाहीत.

**प्र.: 'भागो मोहन प्यारे' पासून 'कमळी' सारख्या मालिकांपर्यंत निर्मिती करताना आशय आणि प्रेक्षक यांच्यातील नातं कसं जपता?**

मालिका लेखन करत होतोच, सोबतच 'ओशन फिल्म कंनी' ही जाहिरात संस्था चालवत होतो. त्यातूनच मालिका निर्मिती क्षेत्रात आलो. भागो मोहन प्यारे ही अतुल परचुरे ह्यांची प्रमुख भूमिका असलेली मालिका ही आमची पहिली मालिका ठरली. तेव्हापासून आजवर गाजलेल्या अनेक मालिकांची निर्मिती करता आली. मालिका करणं म्हणजे काहितरी कमी दर्जाचं काम असतं असं अनेकांना वाटतं, पण माझ्यामते प्रेक्षकांना दररोज २२ मिनिटं टिव्ही समोर गुंतवून ठेवणं

आणि उद्याचा भाग बघण्यासाठी उत्सुकता निर्माण करणं हे सोपं नसतं. त्यासाठी महाराष्ट्रभरातल्या प्रेक्षकांची नस ओळखणं गरजेचं असतं. वेगवेगळया आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक स्तरातून आलेल्या प्रेक्षकांना लसावि काढून त्यातून मालिका नेमकी कशी सादर करायची हे ठरवणं आव्हानात्मक असतं. पण हे सगळं करातानाही आपल्या मालिकांचा समाजमनावर काय परिणाम होऊ शकतो ह्याचं भान ठेवत आलो आहोत. आपल्या मालिकांमधून मनोरंजनाबरोबरच समाज प्रबोधन व्हावं ह्याचीही काळजी घेत आलो आहोत. मालिका ह्या प्रेक्षकांच्या रोजच्या आयुष्याचा भाग असतात. त्यामुळे आम्हीही प्रेक्षकांच्या आयुष्यांशी जोडले गेलेलो आहोत हे सुखद आणि त्याच वेळी जबाबदारीची जाणीव करुन देणारं वाटतं.

**प्र.: वानखेडे स्टेडियममधील मुंबई क्रिकेट म्युझियमसारख्या प्रकल्पांवर काम करताना आपला कामाप्रती दृष्टीकोन काय असतो?**

जाहिरात क्षेत्रात काम करतानाच 'अटल स्मृती उद्यान' ह्या अटल बिहारी वाजपेयींच्या पहिल्या संग्रहालयासाठी काम करण्याची संधी आम्हाला मिळाली. ओशन फिल्म कंपनीचं ब्रीदवाक्यच आहे, कोणत्याही माध्यमात गोष्ट सांगायला आम्हाला आवडतं! हे नवं माध्यम गोष्ट सांगण्यासाठी खुणावू लागलं आणि त्यातूनच पुढे अनेक संग्रहालयं आणि अनुभव केंद्रांच्या निर्मितीत आमचा सहभाग वाढला. मुंबई ही क्रिकेटची पंढरी मानली जाते. मुंबईत क्रिकेटशी संबंधित संग्रहालय असावं अशी संकल्पना समोर आली आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन ने त्या कामाची जबाबदारी आमच्या कंपनीवर सोपवली. 'मुंबईकरांसाठी क्रिकेट हा धर्म आहे आणि मुंबईची नाळ क्रिकेट खेळाशी जोडलेली आहे' हीच मुख्य धारा धरुन आम्ही ह्या संग्रहालयाची निर्मिती केली. मुंबई क्रिकेटची गोष्ट सांगितली. आणि आज भारतभरातून व परदेशातूनही दरोरोज शेकडो लोक हे संग्रहालय पहायला येतात.

**प्र.: 'दशावतार'सारखी कलाकृती साकारताना अनेक स्तरांवर आव्हाने आली असतील. या सगळयांना एकत्र गुंफताना तुम्हाला कोणती प्रमुख आव्हाने जाणवली? या चित्रपटाद्वारे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून केलेली नवी सुरुवात हा अनुभव कसा होता? आणि कथानक लिहिताना तुम्ही नेमका कोणता धागा प्रथम पकडला? दशावतार'ला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या प्रतिसादानंतर, प्रादेशिक कथांना जागतिक व्यासपीठावर नेण्याच्या दृष्टीने तुम्ही या अनुभवाकडे कसं पाहता?**

आमच्या कंपनीचं नावच 'ओशन फिल्म कंपनी' असल्याने कधी ना कधी स्वत:चा चित्रपट करायचा असा विचार होताच. त्याच दृष्टीने विचार सुरु केल्यावर अनेक वर्षांपासून मनात असलेली 'दशावतार' ही लोककला आणि कोकणातला पर्यावरणाचा प्रश्न ह्या दोहोंचा संगम करुन एक कथा सुचली. त्या निमित्ताने दशावतारी लोककलेचा, त्यात काम करणाऱ्या कलाकारांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास झाला. २-३ वर्षं हा अभ्यास आणि चित्रपटाच्या दृष्टीने चाचपणी केल्यावर शेवटी २०२४ मध्ये आम्ही ह्या चित्रपटाची निर्मिती हाती घेतली. हा चित्रपट लिहिताना त्याचं दिग्दर्शन मीच करेन असं ठरलेलं नव्हतं, पण तो लिहून झाल्यावर तो ज्या प्रकारे मला दिसत होता तसाच इतर कुणाला दिसेल का ही शंका असल्याने दिग्दर्शनाचा प्रयत्न करायचं ठरवलं. माझे मित्र आणि सहकारी सुजय, ओंकार, आदित्य जोशी अश्या सा-यांचं पाठबळ मिळालं. तयारी करतानाच लक्षात येतं होतं की ह्या चित्रपटाचा कॅनव्हास मोठा आहे. चित्रपटाला स्वत:ची चित्रभाषा असावी व ती प्रखरपणे प्रेक्षकांसमोर आणताना कोणतीही तडजोड केली जाऊ नये अशी आमची इच्छा होती. त्यामुळे चांगली गोष्ट सांगायला जे जे आवश्यक ते ते करण्याचा आम्ही प्रयत्न केला. मराठी चित्रपटांच्या तुलनेत तिप्पट खर्च होणार होता. पहिल्याच मराठी चित्रपटाच्या निर्मितीसाठी आम्ही कर्ज काढलं.

अशोक हांडे, नितीन व मृणाल सहस्त्रबुद्धे, विनायक जोशी, संजय दुबे असे सहनिर्माते पाठीशी उभे राहिले. क्रियेटिव्ह प्रोडयुसर म्हणून अजित भुरे तर ब्रँड कन्सल्टिंट म्हणून सुगंध लोणीकर मदतीला आल्याने झी स्टुडिओ आणि त्याचे प्रमुख बवेश जानवेलकर हयांची खंबीर साथ लाभली.

दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, रवी काळे, सुनील तावडे ह्यासारखे ज्येष्ठ कलाकार, तर सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शिनी इंदलकर, अभिनय बेर्डे, आरती वडगबाळकर असे तरुण कलाकार जमा झाले. कोकणातले मित्र, आप्तेष्ट, कुडाळ जवळच्या गावांमधले ग्रामस्थ मदतीला आले. आणि सलग ६० दिवस चित्रीकरण करुन आम्ही हा चित्रपट तयार केला. रोजचा दिवस नवीन आव्हानांचा होता. पण संपूर्ण टिममध्ये एक चांगला चित्रपट तयार करण्याची जीद्द होती, ज्या जोरावरच चित्रीकरण सुरळीत पार पडलं. त्यानंतर झी स्टुडियो सारखी महत्वाची संस्था चित्रपट प्रदर्शित करायला सोबत आली. आणि गेल्या वर्षी १२ सप्टेंबर २०२५ ला हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि त्यानंतर महाराष्ट्रासोबतच, देशभरात आणि जगभरात गाजला. चांगली गोष्ट सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न जर केला गेला तर मायबाप प्रेक्षक त्याला नक्की प्रतिसाद देतात हे लक्षात आलं. मराठी चित्रपट म्हणजे कमी बजेटचा, फक्त दिवाणखान्यात चित्रीत होणारा किंवा तांत्रिक दृष्टया कमी दर्जाचा चित्रपट अशी जी प्रतिमा तयार होत होती ती 'दशावतार' ने मोडण्याचा प्रयत्न केला. आपल्या मातीतल्या कथा सांगितल्या तर त्या जगात सर्वदूर पोहोचू शकतात हा विश्वास ह्या निमित्ताने बळकट झाला. आणि देशभरातल्या प्रेक्षकांचं मराठी चित्रपटांकडे लक्ष वेधून घेता आलं. चित्रपट बिनचूक झाला असं अजिबात नाही, त्यात दोष उणीवा नक्कीच असतील, पण तो प्रेक्षकांच्या हृदयापर्यंत पोहोचला आणि तो त्यांचा झाला हे मात्र खरं.

**प्र.: चित्रपट, मालिका आणि जाहिरात या तिन्ही माध्यमांमध्ये काम करताना तुम्हाला सर्वात मोठा फरक कोणता जाणवतो?**

चित्रपट, मालिका आणि जाहिरात ह्या तीनही क्षेत्रात गोष्टच सांगायची असते. पण गोष्ट सांगायचं व्याकरण मात्र वेगवेगळ असतं. जाहिरातीत केवळ ३० सेकंदात गोष्ट सांगून प्रेक्षकांना वस्तू विकत घेण्यासाठी तयार करायचं असतं. मालिकेत दरोरोज २२ मिनिटं प्रेक्षकांना खिळवून ठेवायचं असतं. तर चित्रपटात २ तासांच्या अवकाशात एक नवीन विश्व तयार करुन, प्रेक्षकांना त्या विश्वात नेऊन, त्या विश्वावर व त्यातल्या पात्रांवर विश्वास ठेवायला भाग पाडायचं असतं. तीनही क्षेत्रं मजेदार आणि आव्हानात्मक आहेत. पण तिन्ही क्षेत्रांचा गाभा एकच आहे, गोष्ट सांगणं!

**प्र.: OTT आणि डिजिटल माध्यमांच्या प्रभावामुळे आशय मांडण्याच्या शैलीत आणि रचनेत कोणते मूलभूत बदल घडले आहेत, असं तुम्हाला वाटतं?**

कोविड नंतर जगभरातल्या विविध क्षेत्रांवर परिणाम झाला, तसाच तो मनोरंजन क्षेत्रावरही झाला. OTT मुळे घरात बसून टिव्ही अथवा मोबाईलवर जगभरातला 'कंटेंट' पाहता येणं सोपं झालं. जगभरातल्या विविध प्रकारच्या गोष्टी पाहता येऊ लागल्याने प्रेक्षकांची अभिरुची झपाट्याने बदलू लागली. अपेक्षा वाढल्या. जागतिक दर्जाचंच मनोरंजन देणं गरजेचं झालं. त्यातही घरबसल्या पाहता येईल असे चित्रपट पहायला प्रेक्षक सिनेमागृहात येईनासे झाले. त्यामुळे ह्यापुढे सिनेमागृहातच येऊन चित्रपट पहावा लागेल अश्या आशयाचे आणि दृष्यभाषेचे चित्रपट बनवणं आवश्यक झालं आहे. मोबाईलवरील समाज माध्यमांमुळे प्रेक्षकांची एकाग्रता कमी झाली आहे. त्यामुळे सतत हलती दृश्ये, वेगवान कथानक, कमीत कमी वेळात जास्तीत जास्त दाखवण्याचा प्रयत्न असे बदल चित्रपटात होऊ लागले आहेत. स्थैर्य आणि शांतता कमी झाली आहे. पण मला वाटतं की ह्याही आव्हानांवर मात करुन चांगली गोष्ट सांगण्याचा प्रयत्न सातत्याने केला तर तो यशस्वी होईलच.

**प्र.: नवोदित कलाकार, लेखक आणि निर्मात्यांनी या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कोणत्या गोष्टींवर भर द्यावा?**

हे क्षेत्र अत्यंत बेभरवश्याचं आणि तणावात्मक क्षेत्र आहे. त्यात काम करण्यासाठी मनावर ताबा हवा, अपयश

पचवण्याची तयारी हवी आणि सातत्याने पुन्हा पुन्हा चांगलं काम करण्याचा प्रयत्न करण्यासाठी चिकाटी हवी.

या साऱ्यांसोबतच आपली नेमकी क्षमता काय आहे ह्याची जाणही हवी. काम करण्यात प्रामाणिकता आणि मेहनत घेण्याची तयारी ह्याला पर्याय नाही. पण त्याही पलिकडे जाऊन तुम्ही जे काम करणार आहात त्यावर तुमचं प्रेम हवं. इतर कुठल्याही गोष्टीचा त्याग करुन, अडचणींचा सामना करुन तुम्हाला काम करावं लागलं तर ते काम करण्यासाठी मूळात त्या क्षेत्रावर वेड्यासारखं प्रेम हवं. हे सारं असेल तर यशस्वी व्हालच!

**प्र.: 'गोमंत तरंग' सारख्या त्रैमासिक उपक्रमांमुळे सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी किती मदत होईल, असं तुम्हाला वाटतं? 'गोमंत तरंग'च्या वाचकांसाठी आणि नव्या पिढीसाठी तुमचा विशेष संदेश काय आहे?**

'गोमंत तरंग' सारखी त्रैमासिकं ही समाजाचा आरसा असतात. आपली संस्कृती, आपला इतिहास, आपले लोक आणि आपला समाज ह्यात घडत असलेल्या आणि पूर्वी घडलेल्या महत्वाच्या घटनांबद्दल, घडामोडींबद्दल, व्यक्तींबद्दल सातत्याने माहिती देण्याचं व त्याचं दस्तावेजीकरण करण्याचं महत्वाचं काम ही मासिकं करत असतात. त्यांच्या वाचनातून आपण समृद्धच होत जातो. नव्या पिढीसाठी हाच संदेश देईन की, जास्तीत जास्त वाचत रहा, पाहत रहा, ऐकत रहा आणि भरपूर फिरा. ह्यातून माणूस खऱ्या अर्थाने समृद्ध होतो. आणि जे काही कराल ते मनापासून करा.







SVC CO-OPERATIVE BANK LTD.
(Formerly The Shamrao Vithal Co-op Bank Ltd.)
119
Empowering minds, financing futures!
SVC BANK's
EDUCATION LOAN
For Higher Education in India or Abroad.
Max. tenure up to 15 years.* Easy EMIs.*
Moratorium up to 6 months* after course completion.
Scan this QR Code to know more.
Visit nearest SVC Bank Branch
or call 24/7 on 1800 313 2120
*T&C Apply.
SVCBankIndia
svc-bank
SVC_Bank
svc_bank
svc.bank.in

# मुंबईत दिसणारा गोवा

**-समीर परांजपे,**
मुख्य उपसंपादक, दैनिक लोकमत, सेंट्रल डेस्क, मुंबई



मुंबई हे कधीच न थांबणाऱ्या लाटांसारखं शहर. आणि गोवा हे लाटांच्या सळसळीतही एक शांत लय जपणारी भूमी. या दोन समुद्रकिना ऱ्यांच्या प्रदेशांमध्ये केवळ अंतर नाही, तर एक अदृश्य सांस्कृतिक प्रवाह आहे. हा प्रवाह केव्हा, कुठे वळण घेत गेला, आणि कसा मुंबईच्या रस्त्यांत, रंगमंचांमध्ये, सुरांत, आणि स्वयंपाकघरांत विरघळला याचा मागोवा घेताना "मुंबईत दिसणारा गोवा" ही संकल्पना केवळ निरीक्षण राहत नाही; ती एक अनुभवयात्रा बनते आणि त्या प्रवासात हिंदू, ख्रिस्ती, सर्व गोमंतकीय परंपरा एकमेकांत मिसळून एक बहुरंगी सांस्कृतिक पट तयार करतात.

मुंबई आकाराला येण्यामध्ये गोवेकरांचा खूप मोठा सहभाग आहे. रामा कामती हे १८ व्या शतकात गोव्याहून मुंबईत आलेले व्यापारी होते. त्यांनी व्यापार, बांधकाम आणि समाजकार्याद्वारे प्रारंभीच्या मुंबईच्या आर्थिक घडणीत योगदान दिले. स्थानिक समाजात ते प्रतिष्ठित आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात असे. गोव्याचे एक सुपुत्र डॉ भाऊ दाजी लाड (१८२२-१८७४) हे वैद्यक, पुरातत्त्व आणि समाजसुधारणेत अग्रगण्य होते. मुंबईतील भायखळा भागातील वीरमाता जिजाबाई उद्यानातील (पूर्वीचा राणीचा बाग) डॉ भाऊ दाजी लाड संग्रहालय हे त्यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आले आहे. हे वैद्यक, पुरातत्त्व आणि समाजसुधारणेत अग्रगण्य होते. गोवेकरांनी मुंबई घडविण्यात केवळ योगदानच नव्हे तर शहर कसे डोळसपणे पाहावे याचे प्रशिक्षणही आपल्या लेखनातून दिले. त्याचे सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे गोविंद नारायण माडगावकर. १९व्या शतकात त्यांनी "मुंबई वर्णन" हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी तत्काली. मुंबईचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक चित्र जिवंत शब्दांत मांडले. मराठीतील आरंभीच्या शहरी इतिहासलेखनात त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

**पत्रकारितेतही अमीट ठसा**

मुंबईतील पत्रकारितेच्या क्षेत्रात फ्रँक मोराईस यांचे नाव मोठे होते. त्यांनी टाइम्स ऑफ इंडियाचे ते पहिले भारतीय संपादक. त्यांनी निर्भीड लेखन आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून पत्रकारितेला नवे परिमाण दिले. त्यांचे बंधू डॉम मोराईस हे आंग्लभाषिक कवी, लेखक व पत्रकार होते. त्यांचा जन्म १९३८ मध्ये झाला. तरुण वयातच त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. "ए बिगिनिंग" या कवितासंग्रहासाठी त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाला. भारत आणि परदेशातील संस्कृती, राजकारण व समाज यांवर त्यांनी प्रभावी लेखन केले होते. मात्र त्यांना गोव्याचा अर्थ अभिमान होता.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात, विशेषत: पोर्तुगीज सत्तेखालील गोव्यातील मर्यादित संधींमुळे, अनेक गोमंतकीयांनी मुंबईकडे वाटचाल सुरू केली. ब्रिटिशकालीन मुंबई वेगाने वाढत होती. बंदर, रेल्वे, व्यापार आणि शिक्षण यामुळे ती संधींचं केंद्र बनली होती. या पार्श्वभूमीवर गोव्यातील सुशिक्षित, इंग्रजी जाणणारा आणि विविध कौशल्यांनी युक्त समाज मुंबईत सहज रुळला. सुरुवातीला नोकरी, लिपिकीय कामे, संगीत, आणि सेवा क्षेत्रात त्यांनी स्थान मिळवलं; पण त्याचबरोबर ते आपली सांस्कृतिक ओळख विसरले नाहीत.

**मुंबईत वेगळी जीवनशैली विकसित**

वांद्रे, माहिम, माझगाव, भायखळा, दादर, वसई या भागांत गोमंतकीय कुटुंबांनी स्थायिक होण्यास सुरुवात केली. या वसाहतींमध्ये एक वेगळीच जीवनशैली आकार घेत गेली. सकाळी चर्चच्या घंटा, घरांच्या भिंतींवरचे हलके पेस्टल रंग, अंगणात उभे असलेले क्रॉस, आणि स्वयंपाकघरातून दरवळणारा कोकम-व्हिनेगरचा वास या सगळयातून गोव्याची

आठवण जागी राहिली. पण त्याचवेळी, बाहेरच्या रस्त्यावरची धावपळ, लोकल ट्रेनचा आवाज, आणि रोजच्या संघर्षाची जाणीव ही मुंबईची होती. या दोन भिन्न जगांचा संगम म्हणजेच 'मुंबईत दिसणारा गोवा.'

**गोव्यातील पाळेमुळे व मुंबईतील कुड**

गोमंतकीय ख्रिस्ती (विशेषत: गौड सारस्वत ख्रिस्ती) समाज स्थलांतर करून मुंबईत आला तेव्हा 'कूड' किंवा 'गावाची खोला' ही संकल्पना त्यांनी या शहरातही जपली. या खोल्या प्रामुख्याने त्या भागांत होत्या जिथे गोमंतकीय वसाहती तयार झाल्या. त्यातील प्रमुख ठिकाणे याप्रमाणे होती.

धोबीतलाव – येथे जुने गोमंतकीय ख्रिस्ती मोठ्या प्रमाणात राहत; अनेक चर्चजवळ सामुदायिक खोल्या होत्या.

गिरगाव – सुरुवातीच्या स्थलांतरितांचे केंद्र; 'गावाची खोली' प्रकारचे सामूहिक निवास होते. माझगाव आणि भायखळा – जुने कॅथोलिक भाग; इथेही अशा खोल्यांची परंपरा होती. दादर आणि माटुंगा – नंतरच्या काळात गोमंतकीय लोकांनी वसवलेल्या कॉलनींमध्ये सामुदायिक जागा होत्या. . विलेपार्ले, अंधेरी येथेही काही 'कूड' स्वरूपाच्या खोल्या/ हॉल समाजासाठी वापरल्या जात.

आजची स्थिती - आज "कूड" या नावाने फार कमी ठिकाणी या खोल्या शिल्लक आहेत. पण काही ठिकाणी: चर्चशी जोडलेले पॅरिश हॉल, समाजाच्या कम्युनिटी रूम्स, किंवा जुन्या इमारतींमधील गावाची खोली या स्वरूपात ही परंपरा अजूनही काही प्रमाणात टिकून आहे. थोडक्यात, कूड ही केवळ राहण्याची जागा नव्हती तर ती मुंबईत नव्याने आलेल्या लोकांसाठी "आपलेपणाचा आधार" होती.

गोवा, मुंबईला जोडणाऱ्या संस्थांचे जाळे गोवा, मुंबईच्या संगमाला संस्थात्मक आधार देणाऱ्या काही महत्त्वाच्या संस्था उभ्या राहिल्या. १९१९ साली स्थापन झालेली गोवा हिंदू असोसिएशन ही त्यापैकी एक अग्रगण्य संस्था. गोमंतकीय हिंदू समाजाला एकत्र आणणं, त्यांच्यातील सांस्कृतिक एकात्मता टिकवणं, आणि नव्या पिढीला आपली परंपरा समजावून देणं हे या संस्थेचं प्रमुख उद्दिष्ट होतं. स्थापनेनंतरच्या पहिल्या काही दशकांत या संस्थेने वाचनालये, नाट्यप्रयोग, आणि सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून एक सांस्कृतिक व्यासपीठ उभं केलं. त्या काळातील नाटकांत स्थलांतरितांच्या भावविश्वाचा, ओळखीच्या शोधाचा, आणि परंपरा-जतनाच्या संघर्षाचा सूक्ष्म वेध घेतला गेला. सदर संस्थेने १९२७ सालापासून आपल्या कार्यक्रमांत नाटके सादर करण्यास सुरुवात केली. पुढे १९५५ पासून राज्य नाट्य स्पर्धेत नियमित सहभाग घेत अनेक पारितोषिके मिळवली. या यशस्वी प्रवासानंतर संस्थेने व्यावसायिक नाटके रंगभूमीवर आणत एक भक्कम परंपरा निर्माण केली आणि ती परंपरा आजही तितक्याच उत्साहाने सुरू आहे सध्या या संस्थेतर्फे 'सुभेदार गेस्ट हाऊस' हे नवे कोरे रहस्यमय नाटक सध्या रंगभूमीवर सादर होत आहे.

गोव्यात पाळेमुळे असलेले मोहनदास सुखठणकर, अशोक सराफ, वंदना मिश्र (पूर्वाश्रमीच्या सुशीला लोटलीकर) सतीश दुभाषी, आशालता वाबगावकर, वर्षा उसगावकर अशा अनेक दिग्गज कलाकार मंडळींनी मराठी, हिंदी सिनेमा, नाटक, मालिका अशी माध्यमे आपल्या उत्तमोत्तम भूमिकांनी गाजवली. गोव्यातील असे आणखी दिग्गज कलाकार आहेत. सर्वांचीच नावे देणे शक्य नाही. पण गोव्याशी निगडित युवा कलावंत आता ओटीटीचे माध्यमही गाजवत आहेत. या कलाकारांपैकी वंदना मिश्र यांनी लिहिलेले मी मिठाची बाहुली हे आत्मचरित्र गोवा आणि मुंबई यातील स्नेह अधिक वृद्धिंगत करणारे आहे.

१९२०च्या दशकात स्थापन झालेली बॉम्बे गोअन असोसिएशन ही संस्था कॅथोलिक गोमंतकीय समाजासाठी केंद्रबिंदू ठरली. या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांगीतिक उपक्रम राबवले गेले. १९४० ते १९७० या काळात त्यांनी आयोजित केलेले बॉल डान्स, कोंकणी नाटके, आणि संगीत मैफिली अत्यंत लोकप्रिय ठरल्या. चर्चमधील कोरस परंपरा, वेस्टर्न म्युझिकची जाण, आणि स्थानिक कोंकणी संस्कृती यांचा संगम या कार्यक्रमांत

दिसत असे. या सगळयाचा परिणाम असा झाला की, मुंबईच्या संगीतविश्वात एक वेगळा 'गोअन टोन' तयार झाला जो पुढे हिंदी चित्रपटसंगीतातही झिरपला.

**चित्रपट क्षेत्रातही मोलाची कामगिरीही**

ख्रिस पेरी हे गोव्यातील संगीतकार. त्यांनी कोंकणी आणि पाश्चात्य संगीताचा संगम साधत लोकप्रिय गाणी दिली. मुंबईत त्यांनी बँड संस्कृती आणि लाईव्ह संगीत परंपरेत मोठे योगदान दिले. याच सेतुला जोडणारे अँथनी गोन्सालवीस हे प्रसिद्ध व्हायोलिनवादक व संगीतकार. त्यांनी हिंदी चित्रपटसंगीतात पाश्चात्य ऑर्केस्ट्रेशन आणले. अनेक संगीतकारांचे गुरु म्हणून ते ओळखले जातात; त्यांच्या शैलीने संपूर्ण संगीत क्षेत्र प्रभावित झाले होते. तर के. वैकुंठ हे चित्रपट छायाचित्रकार. त्यांनी मुंबईतील चित्रपटसृष्टीत काम करताना दृश्यभाषेत नवे प्रयोग केले. त्यांच्या कामामुळे सिनेमॅटोग्राफी अधिक अभिव्यक्त आणि प्रभावी झाली. तसेच रेमो फर्नांडिस हे गोव्यातील प्रसिद्ध गायक, संगीतकार आणि गीतकार आहेत. त्यांनी पॉप, रॉक आणि कोंकणी संगीताला नवे रूप दिले. "बॉम्बे सिटी" सारखी गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या संगीतामध्ये सामाजिक संदेशही आढळतो.

एन. दत्ता हे हिंदी चित्रपटसंगीत दिग्दर्शक. गोव्याहून मुंबईत येऊन त्यांनी भावपूर्ण, साधे आणि सुरेल संगीत दिले. त्यांच्या रचनांमध्ये सामाजिक आशय आणि लोकसंगीताचा प्रभाव दिसतो तर दत्ताराम हे तबलावादक व संगीतकार होते. त्यांनी शंकर-जयकिशन यांच्यासोबत काम करून हिंदी चित्रपटसंगीतात ठसा उमटवला. लयबद्धतेतील नावीन्यामुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली.मुंबईतील चित्रपटसृष्टीत गोव्यातील अनेक लोक सक्रिय होते. त्या सर्वांची नावे देणे इथे शक्य नाही. के. वैकुंठ हे चित्रपट छायाचित्रकार. त्यांनी मुंबईतील चित्रपटसृष्टीत काम करताना दृश्यभाषेत नवे प्रयोग केले. त्यांच्या कामामुळे सिनेमॅटोग्राफी अधिक अभिव्यक्त आणि प्रभावी झाली.

**खवय्यांना खूष ठेवणारे गोवेकर**

खानपानाच्या क्षेत्रात मुंबईत गोमंतकीय प्रभाव अधिक ठळकपणे जाणवतो. चर्चगेट, बोरीबंदर, गिरगाव, वांद्रे, माहिम, आणि अंधेरी परिसरात सुरू झालेल्या छोट्या खानावळी पुढे प्रसिद्ध रेस्टॉरंट्समध्ये रूपांतरित झाल्या. दुकळे बंधू हे २०व्या शतकातील गोवन उद्योजक. त्यांनी मुंबईत खानावळी व हॉटेल व्यवसाय उभारून गोवन खाद्यसंस्कृती लोकप्रिय केली. त्यांच्या उपक्रमांमुळे स्थलांतरित गोवेकर समाजाला आर्थिक आधार व ओळख मिळाली. मुंबईतील गोमंतकीय जेवण देणाऱ्या खानावळी, हॉटेलपैकी ग्रँटरोड येथील यशवंताश्रम, गिरगाव येथील अनंताश्रम, दादरचे शिवाजी मंदिर समोरचे गोमंतक हॉटेल, दादर पोतुर्गिज चर्च जवळील मरियम हॉटेल, माहीम येथील गोवा पोर्तुगीझा, सोल फ्रायसारख्या ठिकाणी केवळ "फिश करी-राइस" किंवा "सॉरपोटेल" मिळत नाही, तर एक सांस्कृतिक अनुभव मिळतो. यातले गिरगावच्या खोताच्या वाडीतील अनंताश्रम बंद झाले होते ते पुन्हा सुरू करण्यात आले. मुंबईतील जुहू येथे गुलमोहर रोडवर गोमंतक भवन होते. येथील कँटीनमध्ये गोव्याच्या पद्धतीचे उत्तम जेवण मिळायचे. काही वर्षापूर्वी हे भवन पाडले. तिथे पुन्हा ते कॅन्टीन सुरूच झाले नाही. भिंतीवरचे गोव्याचे फोटो, पार्श्वभूमीला वाजणारे कोंकणी गाणे हे सगळं मिळून ग्राहकाला काही काळासाठी मुंबईच्या गोंधळापासून दूर नेतं. पण बाहेर पडताच पुन्हा मुंबईची गती जाणवते आणि तेव्हा लक्षात येतं की हा 'गोवा' प्रत्यक्षात मुंबईतच आहे.

**असे डोकावते मुंबईत गोवा**

मुंबईतील मढ बेट, पालघर जिल्ह्यातील वसई या भागांमध्ये हा अनुभव अधिक दृश्य स्वरूपात दिसतो. पोर्तुगीज प्रभाव असलेली घरे, चर्चभोवती तयार झालेल्या वसाहती, आणि सण-उत्सवांची पद्धत हे सगळ गोव्याशी असलेलं नातं जिवंत ठेवतं. १९८० नंतर या भागांमध्ये पर्यटन वाढलं, आणि 'मिनी गोवा' ही संकल्पना लोकप्रिय झाली. मात्र, याचबरोबर व्यापारीकरणही वाढलं. मूळ सांस्कृतिक स्वरूप थोडंसं बदललं, आणि काही ठिकाणी ते केवळ 'अनुभव विकणं' इतकंच उरलं. हा बदल चिकित्सक दृष्टीने महत्त्वाचा आहे, कारण तो दाखवतो की संस्कृती जपताना ती बाजारपेठेचा भागही बनते.

१९६१ साली गोवा मुक्त झाल्यानंतर स्थलांतराची दिशा बदलली असली, तरी मुंबईत स्थिरावलेल्या गोमंतकीय समाजाने आपल्या संस्थांना अधिक बळकट केलं. १९६०-७० च्या दशकात यंग गोअन्स असोसिएशन सारख्या संघटनांनी नव्या पिढीला एकत्र आणलं. क्रीडा स्पर्धा, नाट्यप्रयोग, सांस्कृतिक महोत्सव या माध्यमांतून त्यांनी 'ओळख' हा प्रश्न जिवंत ठेवला. विशेष म्हणजे, या काळात आयोजित होणाऱ्या इंटर-गोअन नाट्यस्पर्धा ही केवळ मनोरंजनाची साधनं नव्हती; ती नव्या कलाकारांना घडवणारी प्रयोगशाळा होती.

**हे तर मंगेशाचे देणे...**

गोव्यातून महाराष्ट्रात विविध ठिकाणी स्थलांतरित झालेल्या व मग मुंबईत स्थिरावलेल्या मंगेशकर कुटुंबाचा इतिहास म्हणजे गोवा आणि मुंबई यांच्यातील एका अदृश्य पूलाची कथा आहे. दीनानाथ मंगेशकर यांनी गोव्याच्या नाट्यसंगीताची बीजे मुंबईसह महाराष्ट्रात रोवली, आणि त्यातून फुललेले स्वर पुढे लता, आशा भोसले, हृदयनाथ मंगेशकर यांच्या रूपाने संपूर्ण देशभर पसरले. ही तर साक्षात मंगेश व शांतादुर्गा यांचा आशीर्वादच होता.

केसरबाई केरकर (१८९२–१९७७) या जयपूर-अत्रौली घराण्याच्या दिग्गज गायिका. गोव्याहून मुंबईत येऊन त्यांनी शास्त्रीय संगीताला उच्च शिखरावर नेले. त्यांचा गहन, शिस्तबद्ध आणि भावपूर्ण गायनशैलीसाठी लौकिक होता. त्याचप्रमाणे मोगूबाई कुर्डीकर (१९०४–२००१) या जयपूर घराण्याच्या श्रेष्ठ गायिका. त्यांनी कठोर साधना आणि शास्त्रीय परंपरेचे जतन केले. मुंबईत त्यांचे कार्य मोठे असून त्यांनी अनेक शिष्य घडवले, ज्यात पुढे किशोरी आमोणकर यांच्यासारखे नामवंत कलाकार निर्माण झाले.

कला ही लोकांसाठी असते. त्याच संवेदनशीलतेचा एक वेगळा आविष्कार किशोरी आमोणकर यांच्या गायनात दिसतो. त्यांच्या अंतर्मुख सुरांत एक प्रकारची आध्यात्मिकता आहे जी गोव्याच्या देवळांत आणि चर्चमध्ये एकसारखीच अनुभवता येते. त्यांच्या एका मैफलीतील प्रसंग जिथे त्यांनी वातावरणातल्या असंवेदनशीलतेमुळे गाणं थांबवलं. हा केवळ कलाकाराचा हट्ट नव्हता; तो कलेच्या पावित्र्याचा आग्रह होता.

जितेंद्र अभिषेकी यांनी गोव्याच्या संगीतपरंपरेला मुंबईच्या रंगभूमीवर आणलं. त्यांच्या रचनांमध्ये भक्ती, नाट्य, आणि लोकजीवनाचा संगम दिसतो. त्यांचे संगीत हे जणू मंदिरातील आरती आणि चर्चमधील भजन यांच्या दरम्यानचा एक पूल आहे.

गोव्याच्या ख्रिस्ती परंपरेचा प्रभाव मुंबईत विशेषत: संगीत आणि शिक्षण क्षेत्रात प्रकर्षाने दिसतो. गोव्याच्या चर्चमधील कोरस परंपरा, पाश्चात्य संगीताची जाण, आणि शिस्तबद्ध सादरीकरण हे सगळं मुंबईच्या बँड संस्कृतीत आणि शालेय संगीत शिक्षणात दिसून येतं. अनेक गोवन ख्रिस्ती कुटुंबांनी मुंबईत येऊन पियानो, व्हायोलिन, आणि गायकवृंद यांची परंपरा रुजवली.

गोअन कॅथलिक असोसिएशन ही एक संस्था केवळ धार्मिक कार्यापुरती मर्यादित नाही. ती सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवते. ख्रिसमस सणाच्या वेळी आयोजित होणारे कार्यक्रम, कोरस स्पर्धा, आणि सामूहिक प्रार्थना हे सर्व केवळ धार्मिक विधी नसून सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक आहेत. तसेच वर्ल्ड गोअन ऑर्गनायझेशनच्या मुंबईतील शाखांनी गोवन डायस्पोराला एकत्र आणण्याचे काम केले. या संस्थांमधून गोव्याच्या परंपरा, भाषा, आणि इतिहास यांचा अभ्यास आणि प्रसार केला जातो. त्यांचे कार्यक्रम हे केवळ स्मरणरंजन नसतात; ते ओळख जपण्याचे प्रयत्न असतात.

**जीवनशैलीत परंपरांचे दर्शन**

बांद्रा, ऑर्लेम, माहिम या भागांमध्ये गोवन ख्रिस्ती समाजाची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. तिथल्या चर्च जसे माउंट मेरी चर्च हे केवळ धार्मिक स्थळ नाहीत सामाजिक आणि सांस्कृतिक केंद्रे आहेत. माऊंट मेरी फेस्टच्या वेळी तिथे गोव्याचीच झलक दिसते. गाणी, खाद्यपदार्थ, आणि एकत्र

येण्याची परंपरा याद्वारे. या ख्रिस्ती गोमंतकीय संस्थांचे कार्य अत्यंत चिकित्सक दृष्टीने पाहिल्यास, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते त्या केवळ परंपरा जपतात नाहीत, तर आधुनिकतेशी संवाद साधतात. शिक्षण, रोजगार, आणि सामाजिक मदत यांमध्ये त्या सक्रिय आहेत. अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, करिअर मार्गदर्शन, आणि सांस्कृतिक प्रशिक्षण देऊन त्यांनी नवीन पिढी घडवली.

**चित्रकलेने दिले मुंबईला नवे आयाम**

गोव्यातून मुंबईत आलेल्या चित्रकारांची परंपरा खूप समृद्ध आहे. मारिओ मिरांडा हे सर्वात प्रसिद्ध नाव असले तरी त्यांच्याबरोबर इतरही अनेक कलाकारांनी मोठे योगदान दिले.मारिओ मिरांडा हे नाव विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या रेखाटनांमध्ये मुंबईतील दैनंदिन जीवन, गजबज, विनोद आणि मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण दिसते. याशिवाय गोव्याच्या पारंपरिक कलेचा ठसा घेऊन आलेल्या अनेक कलाकारांनी चर्च, समुद्रकिनारे, निसर्ग आणि लोकजीवन या विषयांवर चित्रे काढत मुंबईतील कला दालनांना समृद्ध केले. त्यांनी स्थानिक आणि पाश्चात्य शैलींचा सुंदर संगम साधला. अँटोनियो झेवियर त्रिंदाद हे मूळचे गोव्याचे असून त्यांनी मुंबईत वास्तववादी शैलीत अप्रतिम चित्रनिर्मिती केली. त्यांना 'Indian Rembrandt" असेही म्हटले जाते. त्रिंदाद यांनी भारतीय आणि ख्रिस्ती आध्यात्मिकतेचा संगम घडवून एक वेगळी शैली विकसित केली.

दिनानाथ दलाल (१९१६–१९७१) हे प्रसिद्ध चित्रकार व व्यंगचित्रकार. त्यांनी मासिके, पुस्तकांची मुखपृष्ठे आणि जाहिरातींमधून एक वेगळी दृश्यशैली निर्माण केली. त्यांच्या कामामुळे मराठी प्रकाशनविश्वाला नवी ओळख मिळाली. मळ गोव्याचे असलेले रघुवीर मुळगावकर (१९१८–१९७६) हे अलौकिक प्रतिभेचे चित्रकार. त्यांनी भारतीय कला आणि लोकप्रिय संस्कृती यांना जोडणारे कार्य केले. त्यांच्या चित्रशैलीत भारतीयत्व आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम दिसतो.

फ्रान्सिस न्यूटन सोझा हे गोव्याचेच असून मुंबईत प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुपचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी भारतीय आधुनिक कलेला जागतिक पातळीवर नेले. लक्ष्मण पै हे देखील गोव्यातून मुंबईत आले. निसर्ग, मानवी भावना व भारतीय परंपरा यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या चित्रांत दिसतो. या सर्व चित्रकारांनी मुंबईच्या कला विश्वात नवे प्रयोग, नवी दृष्टी आणि आंतरराष्ट्रीय स्तराची गुणवत्ता आणली.

**गोव्याची संवेदनशीलता, मुंबईची उर्जा**

गोव्याची संवेदनशीलता आणि मुंबईची उर्जा यांचा संगम त्यांच्या कलेत स्पष्ट जाणवतो. त्याचवेळी, एक सूक्ष्म ताणही जाणवतो. परंपरा जपण्याचा आणि आधुनिक जीवनाशी जुळवून घेण्याचा. काही वेळा या संस्था केवळ सण-उत्सवापुरत्या मर्यादित राहतात, आणि त्यांच्या मूळ सामाजिक ध्येयांपासून दूर जातात. पण तरीही, त्या एक सांस्कृतिक आधार देतात जो स्थलांतरित समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. मुंबईतील गिरगाव, ग्रँटरोड, दादर, माटुंगा, माहिम, वांद्रे, खार, सांताक्रूझ, पार्ले आदी भागात गोवेकरांचे वास्तव्य लक्षणीय आहे. जोगेश्वरी भागात सारस्वत कॉलनी ही बंगल्यांची वसाहत आहे. तिथे गोवेकर मंडळींचे बंगले आहेत. त्या ठिकाणी असलेले देऊळ तुम्हाला थेट गोव्यात घेऊन जाते.

गोव्याची शांतादुर्गा, मंगेश अवतरले मुंबईत गोवेकर (विशेषत: गौड सारस्वत ब्राह्मण आणि इतर गोमंतकीय हिंदू) यांनी मुंबईत स्थलांतरानंतर आपली कुलदेवता व धार्मिक परंपरा जपण्यासाठी अनेक मंदिरे उभारली. ही मंदिरे केवळ पूजा करण्याची ठिकाणे नसून, गोवेकरांच्या ओळखीचे, परंपरेचे आणि सामुदायिक ऐक्याचे केंद्र आहेत. गोवेकर (विशेषत: जीएसबी) लोकांनी मुंबईत स्थलांतर केल्यानंतरआपले कुलदैवत (मंगेश, शांतादुर्गा, दामोदर, वेंकटेश) यांची मंदिरे स्थापन केली. त्यांच्या वसाहतींमध्ये (उदा. सारस्वत कॉलनी, माटुंगा, विलेपार्ले) मंदिर + सामुदायिक जीवन अशी एकत्र बांधणी केली. ते सण (गणेशोत्सव, नवरात्र) मोठ्या प्रमाणात साजरे करतात.

भुलेश्वर येथे गौड सारस्वत ब्राह्मण समुदायाचा गौड सारस्वत ब्राह्मण टेम्पल ट्रस्ट आहे. या टेम्पल ट्रस्टच्या माध्यमातून ज्या सारस्वतांना आपल्या देवांची नित्यपूजा किंवा सोवळ पाळणं शक्य नसेल त्यांना काही रक्कम देऊन त्यांच्या देवांची नित्य पूजा आणि अभिषेक करण्याची सोय उपलब्ध करून दिली जाते. गोव्याच्या सारस्वतांचे जे मठ आहेत त्यापैकी कवळे मठाचं शांतादुर्गेच मंदिर आजही वाळकेश्वर येथे आहे. गोवेकरांनी मुंबईत बांधलेल्या मंदिरांपैकी काही महत्त्वाची मंदिर याप्रमाणे आहेत.

**सरस्वती मंदिर, सारस्वत बाग (जोगेश्वरी)** – गोवेकरांनी स्थापन केलेले; सारस्वत समाजाचे प्रमुख सांस्कृतिक-धार्मिक केंद्र.

**श्री मंगेश मंदिर, विले पार्ले/सांताक्रूझ परिसर** – गोव्याच्या मंगेश देवाचे स्थानिक रूप; मंगेशकर कुटुंबाची परंपरा याच देवाशी जोडलेली.

**शांतादुर्गा मंदिर, दादर-माटुंगा परिसर** – गोमंतकीयांची कुलदेवता; गोव्याच्या मंदिराची आठवण जपणारे.

**श्री महालक्ष्मी/महालसा मंदिर** (विविध ठिकाणी, उदा. विलपार्ले, दादर) – गोमंतकीय देवतांचे स्थानिक रूप.

**श्री राम मंदिर वाळकेश्वर**
– वाळकेश्वर भागात गोवेकर समाजाचा मोठा प्रभाव आहे; येथे रामभक्तीशी संबंधित जुनी परंपरा आहे.

**श्री महालक्ष्मी मंदिर (जीएसबी संबंध)**
– मुख्य मंदिर प्राचीन असले तरी, महालक्ष्मी देवी ही गोवेकरांची कुलदेवी असल्यामुळे जीएसबी समाजाचा सहभाग मोठा आहे.

**श्री दामोदर मंदिर माटुंगा**
– गोवा-उत्पन्न कुटुंबांनी उभारलेले; श्री दामोदर (कृष्ण) यांची उपासना.

**श्री वेंकटेश मंदिर (जीएसबी) विले पार्ले**
– तिरुपती बालाजीचे स्वरूप; दक्षिण आणि गोवा परंपरेचा सुंदर संगम.

**श्री गणपती मंदिर खार (जीएसबी)**
– गोवेकर समाजातील गणपती उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी प्रसिद्ध.

**श्री नागेश मंदिर (जीएसबी समुदायाशी संबंधित)**
– नाग देवता आणि शिवपरंपरा; गोवा-उत्पन्न लोकांमध्ये श्रद्धा.

**श्री हनुमान मंदिर (सारस्वत कॉलनी)**
– सारस्वत वसाहतीतले छोटे पण श्रद्धास्थान.

'मुंबईत दिसणारा गोवा' हा केवळ आठवणींचा किंवा परंपरांचा विषय नाही; तो एक जिवंत, बदलत राहणारा, आणि स्वत:ला सतत नव्याने घडवणारा अनुभव आहे. मंगेशकर कुटुंबाच्या सुरांपासून ते गोवा हिंदु असोसिएशनच्या रंगमंचापर्यंत, आणि गोअन कॅथलिक असोसिएशनच्या कोरसपर्यंत प्रत्येक ठिकाणी गोवा आहे. मुंबईच्या गोंगाटात जेव्हा एखादा घंटानाद आणि कोकणी सुर एकत्र ऐकू येतात, तेव्हा जाणवते. ही केवळ दोन संस्कृतींची भेट नाही; हा एक सुसंवाद आहे.

# त्या तरुतळी विसरले गीत : जेजेतील किपलिंग बंगल्याची कहाणी



मुंबईच्या वारसा वास्तूंकडे पाहताना आपण अनेकदा फक्त इमारती पाहतो; पण त्या भिंतींमध्ये जिवंत असतात असंख्य स्मृती, इतिहास आणि सांस्कृतिक संदर्भ. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टच्या परिसरात उभं असलेलं 'किपलिंग हाऊस' ही अशीच एक वास्तू. लॉकवूड किपलिंग, रुडयार्ड किपलिंग आणि मुंबईच्या सांस्कृतिक इतिहासाशी जोडलेल्या या बंगल्याची ही कहाणी.

**– अपर्णा पाटील, वरिष्ठ पत्रकार**

मुंबई... स्वप्नांचं शहर. इथे एकदा आलेला माणूस या शहराच्या कायमस्वरूपी प्रेमात पडतो. शहराची रचना, इथल्या वास्तू आणि इथे राहणारी, वावरणारी माणसं, हे या शहराचं वैभव आहे. पण मुंबईत माणूस रोज हजारो इमारतींच्या बाजूने जातो; त्यांच्याकडे पाहायला मात्र त्याच्याकडे वेळ नसतो. शहर धावत राहतं आणि इतिहास शांतपणे मागे उभा राहतो.

या शहराचं अंतरंग समजून घ्यायचं तर, आधी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या स्थानकात यावं लागतं. या स्थानकाच्या परिसरात एक-एक ग्रंथ लिहून व्हावा, अशा असंख्य वास्तू आहेत. ब्रिटिश काळात बांधलेल्या इमारती अजूनही आपला दिमाख टिकवून आहेत. त्याखाली मांडलेले बाजार त्या इमारतींना अवकळा आणणारे आहेत. पण पोट भरायला आलेला माणूस काय इतिहास वाचणार आणि कसं या इमारतींचं सौंदर्य पाहणार ?

स्थानकात येणारा माणूस इंटिकेटरवर कोणत्या फलाटावर कोणती गाडी लागली, ती फास्ट आहे का स्लो, याच विचारात घुटमळतो. पण रविवारी किंवा कधी-कधी रात्री उशीरा रिकाम्या असलेल्या स्थानकाच्या दगडी भिंतींमध्ये किती सुंदर आकार लपले आहेत, ते अचानक नजरेस पडतं. युरोपातल्या चर्चमध्ये असतात तशा रंगीत बिलोरी काचा, कोरीव देखणी शिल्पं आणि दगडी कमानी लक्ष वेधून घेतात. पण हे सौंदर्य त्यालाच दिसतं, ज्याला या वास्तू आणि त्यामागच्या इतिहासाची आस्था आहे. इतरांसाठी हे फक्त गाडी पकडण्याचं किंवा गाडीतून उतरण्याचं स्थानक मात्र.

मुंबई पाहायला येणारा माणूस क्वचित या वास्तूचं देखणेपण अनुभवतो. गाडीतून उतरल्या-उतरल्या तो एकच प्रश्न विचारतो क्रॉफर्ड मार्केट कुठे आहे ? पण याच ऐतिहासिक स्थानकासमोर मुंबई महापालिकेचं मुख्यालय, टाइम्स ऑफ इंडियाची इमारत, अंजुमन-ए-इस्लाम शाळा आणि त्याच्या शेजारी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट अशा वारसा वास्तू उभ्या आहेत. स्थानकापासून काही मिनिटांच्या अंतरावर असलेल्या या इमारतींना जोडणारा एक समान धागा म्हणजे जॉन लॉकवूड किपलिंग.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि महात्मा ज्योतिबा फुले मंडई या दोन्ही वास्तूंच्या सजावटीत लॉकवूड किपलिंग यांचं मोठं योगदान होतं. सर जे.जे. School of Artes ते पहिले अधिष्ठाता. ब्रिटनमधील यॉर्कशायर येथे मेथोडिस्ट धर्मोपदेशकाच्या घरात जन्मलेले लॉकवूड भारतात १८६५मध्ये आले. पण त्यापूर्वीच भारतीय कलेनं त्यांना मोहिनी घातली होती.

१८५१मध्ये क्रिस्टल पॅलेसमध्ये भरवलेल्या 'द ग्रेट एक्झिबिशन'मध्ये त्यांनी भारतीय हस्तकलेचे उत्कृष्ट नमुने पाहिले आणि ते भारतीय कलेच्या प्रेमात पडले. त्या प्रदर्शनात ब्रिटिशांनी 'इंडियन पॅव्हेलियन' उभारलं होतं. भारतीय कला आणि हस्तकलेचं वैभव पाहून लॉकवूड प्रभावित झाले. नंतर ते लंडनच्या साउथ केन्सिंग्टन म्युझियममध्ये दाखल झाले; पण भारतातल्या कलाठेव्याचा विचार त्यांच्या डोक्यातून जात नव्हता. त्यामुळेच वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी पत्नी ॲलिससह त्यांनी मुंबई गाठली.

त्या काळात मुंबईचा नवा अध्याय लिहिला जात होता. कापूस निर्यातीतून आलेल्या मुबलक पैशाने मुंबईच्या क्षितिजरेषा बदलण्यात ब्रिटिश मग्न होते. अनेक इमारती उभारून शहर वसवलं जात होतं. एकापेक्षा एक सुंदर इमारता उभारण्यासाठी वास्तुकला आणि शिल्पकलेचा मुक्त वापर केला जात होता. या सजावटीसाठी लॉकवूड यांची निवड होऊ लागली. त्यामुळेच मुंबई रेल्वे स्थानक आणि क्रॉफर्ड मार्केटच्या इमारतींवर त्यांचा कलात्मक ठसा उमटला.

भारतीयांना योग्य प्रशिक्षण मिळालं तर ते कलाक्षेत्रात असाधारण उंची गाठू शकतील, या अपेक्षेने सुप्रसिद्ध व्यापारी सर जमशेटजी जीजीभॉय यांनी ही कलाशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. १८५७ मध्ये त्यांनी स्कूल ऑफ आर्ट अँड इंडस्ट्रीच्या स्थापनेसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली. पुढे त्यांच्या स्मृत्यर्थ संस्थेला 'सर जे.जे. School of Art' हे नाव देण्यात आलं. सुरुवातीच्या वर्षांमध्ये ही संस्था तात्पुरत्या तंबूवजा इमारतीत सुरू होती. पुढे ती मुंबईच्या कलासंस्कृतीचं महत्त्वाचं केंद्र बनली.

जेजेच्या मोठ्या प्रवेशद्वारातून आत शिरलात की झाडं, दगडी शिल्पं, मोठे लाकडी दरवाजे, घोटीव शिल्पं आणि लांबच लांब वरांडे दिसतात. दुपारच्या उन्हात जुन्या दगडी भिंतींवर उतरलेला प्रकाश, शांत पडलेले व्हरांडे आणि हवेत दरवळणारा जुन्या लाकडाचा वास हा परिसर अजूनही वेगळा भासवतो. यानंतर नजर पडते ती एका भग्न बंगलीवर.

परिसरातल्या त्या हिरव्या-निळया रंगाच्या लाकडी बंगल्याची पडझड झाली आहे. छताला कवेत घेणारी वृक्षराजी, वेली आणि फांद्यांनी वेढलेल्या या बंगल्याच्या भिंतींचे रंग उडाले आहेत. लाकडी सज्जे जीर्ण झाले आहेत. हाच तो 'किपलिंग हाऊस' लॉकवूड किपलिंग यांचं निवासस्थान. गेली अनेक वर्षे जेजेच्या अधिष्ठात्यांचं अधिकृत निवासस्थान असलेला हा बंगला म्हणजे लॉकवूड यांच्या अस्तित्वाची शेवटची निशाणी.

या बंगल्याच्या व्हरांड्यात एका उंच चौथऱ्यावर काळवंडलेला अर्धपुतळा आहे. त्याखालच्या फलकावर लिहिलं आहे "रुडयार्ड किपलिंग, नोबेल पुरस्कार विजेते लेखक, यांचा जन्म ३० डिसेंबर १८६५ रोजी येथे झाला." 'द जंगल बुक' सारखं अजरामर पुस्तक लिहिणारे आणि सर्वात तरुणवयात साहित्याचं नोबेल मिळवणारे रुडयार्ड हे लॉकवूड यांचे सुपुत्र. मात्र हा बंगला १८८२मध्ये बांधला गेला. त्यामुळे अनेक अभ्यासकांच्या मते रुडयार्ड यांचा जन्म जेजेच्या सुरुवातीच्या तात्पुरत्या वास्तूत झाला असावा. १९३०च्या दशकात जेजेला दिलेल्या भेटीत त्यांनी स्वत: तसा उल्लेख केल्याचं सांगितलं जातं.

जॉन लॉकवूड आणि ॲलिस यांची पहिली भेट इंग्लंडमधील रुडयार्ड तलावावर झाली होती. त्या जागेची आठवण कायम राहावी म्हणून त्यांनी आपल्या पहिल्या मुलाचं नाव 'रुडयार्ड' ठेवलं. लग्नानंतर लगेचच ते भारतात आले आणि जेजेच्या परिसरातच वास्तव्यास राहिले.

रुडयार्ड किपलिंग यांनी आपल्या Something of Myself या आत्मचरित्रात बालपणीच्या मुंबईचं अत्यंत जिवंत वर्णन केलं आहे. 'पहाटेची वेळ, धुरकट प्रकाश आणि झाडांना लगडलेली सोनेरी-जांभळी फळंठ ही त्यांच्या स्मृतीतील पहिली प्रतिमा होती. आयासोबत आणि नंतर बहिणीसह पहाटेच्या वेळी फळबाजारात मारलेले फेरफटके, समुद्रकिनाऱ्यावरील संध्याकाळच्या सैर आणि ताडाच्या झाडांच्या सावल्या त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने टिपल्या आहेत. 'रात्री ताडाच्या किंवा केळीच्या पानांतून वाहणाऱ्या वाऱ्याची गाज आणि बेडकांचे आवाज, हे माझं प्रेम राहिलं आहे,' असं ते लिहितात.णि सूर्यास्ताच्या वेळी प्रार्थनेसाठी पाण्यातून चालत जाणारे पारशी लोक, अशा प्रतिमाही त्यांच्या लेखनात दिसतात.

रुडयार्ड फक्त पाचव्या वर्षापर्यंत मुंबईत राहिले; पण त्या बालस्मृती त्यांच्या मनात कायम राहिल्या. दुपारच्या वेळी

आया त्यांना भारतीय गोष्टी आणि बालगीतं सांगत असे. स्थानिक भाषेत विचार करणाऱ्या त्या मुलांना नंतर आई-वडिलांशी इंग्रजीत बोलण्याची ताकीद दिली जाई.ते लिहितात, 'ज्या स्थानिक भाषेत आम्ही विचार करायचो आणि स्वप्नं पाहायचो, त्याचं अडखळत इंग्रजीत भाषांतर केलं जायचं.' रुडयार्डचं बालपण ब्रिटिश घरातलं असलं, तरी त्यांच्या स्मृतींची भाषा भारतीय होती.

वयाच्या सहाव्या वर्षी त्यांना इंग्लंडला पाठवण्यात आलं. तिथे त्यांना मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागला. अनेक वर्षांनी ते पुन्हा भारतात आले, तेव्हा मुंबईतल्या आठवणींनी त्यांना वेगळाच दिलासा दिला. १८८२मध्ये ते अल्पकाळासाठी मुंबईत आले होते. त्या क्षणाविषयी लिहिताना ते म्हणतात, 'मी माझ्या ज मोत्यासारख्या पाण्यावर दूरवर जाणारी अरबी जहाजं आान्मगावी उभा होतो. तिथले गंध आणि आठवणी पुन्हा जाग्या होत होत्या.'

जेजेच्या परिसरातल्या आठवणींत त्यांनी एक गंमतीदार प्रसंगही लिहिला आहे. घराभोवतीच्या हिरव्यागार मोकळ्या जागेपलीकडे त्यांच्या वडिलांचं कलागृह होतं. तिथे रंग, तेल आणि मातीचा सुगंध दरवळत असे. एकदा तिथे जात असताना एका मोठ्या कोंबडीने त्यांच्यावर हल्ला केला आणि ते घाबरून पळाले. नंतर त्यांच्या वडिलांनी त्या प्रसंगावर कविता लिहून त्यांची समजूत काढली. त्या आठवणींमधून जेजेचा परिसर किती जिवंत, मोकळा आणि निसर्गरम्य होता, याची कल्पना येते.

आज मात्र त्या परिसरात उभं राहिलं की, "त्या तरुतळी विसरले गीत, हृदय रिकामे घेउनि फिरतो," अशी अवस्था होते. किपलिंग हाऊस भग्नावस्थेत उभं आहे. भिंतींवर काळाचे ठसे उमटले आहेत. एकेकाळी जिथे कला, साहित्य आणि स्मृतींचं जग जिवंत होतं, तिथे आता शांतता आणि पडझड दिसते.

जगभरात लेखकांची मूळ घरं शोधून जतन करण्याचं काम केलं जातंय. आपल्याकडे मात्र अशा कामाबाबत उदासीनता दाखवली जाते. या बंगल्याच्या भग्नस्थितीलाही राज्यकर्ते जबाबदार आहेत. अधूनमधून या बंगल्याच्या पुनर्विकासाचा मुद्दाही मांडण्यात आला. पण त्याच्या संरक्षणाची जबाबदारी कोणी घेतली नाही. त्यामुळे ही वास्तू काळाच्या ओघात नष्ट होईल, अशी चिंता होती.

किपलिंग पिता-पुत्रांच्या साम्राज्यवादी विचारांमुळे त्यांचं स्मरण करावं का, असा प्रश्न उपस्थित केला जातो. मात्र लॉकवूड यांनी भारतीय कलांचं जतन आणि संवर्धन यासाठी केलेलं काम आणि रुडयार्ड यांच्या लिखाणातून अजरामर झालेली भारतभूमी यामुळे इतिहासाकडे व्यापक दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

मुंबईत अशा अनेक वास्तू आहेत, ज्यांच्यासोबत शहराचा इतिहास जोडलेला आहे. काही इमारती पडल्या, काही पाडल्या गेल्या आणि त्यांच्यासोबत इतिहासही काळाच्या उदरात गडप झाला. ब्रिटिश तटबंदी, अपोलो गेट, एस्प्लेनेड मॅन्शन अशा अनेक वास्तू काळाच्या ओघात हरवल्या. "इथे कधीकाळी आर.के. स्टुडिओ होता," असं कोणी म्हणालं की त्या जागेखाली अर्ध्या सिनेसृष्टीचा इतिहास गाडला गेल्याची खंत वाटते.

मुंबईची ओळख फक्त गगनचुंबी इमारतींनी बनत नाही; ती स्मृती जपणाऱ्या जागांनी बनते. विकासाच्या ओढीत बरंच काही नष्ट झालं; थोडंच शिल्लक राहिलं आहे. त्यातला एक महत्त्वाचा ठेवा म्हणजे जेजे परिसरातील किपलिंग बंगला.

सुदैवाने आता या १४४ वर्षे जुन्या बंगल्याच्या जतन आणि दुरुस्तीच्या कामाला राज्य सरकारने प्रशासकीय मान्यता दिली आहे. सुमारे ९ कोटी ९५ लाख रुपयांच्या या प्रकल्पासाठी पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने २३ एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णय जारी केला आहे. वारसा

दर्जा असलेला आणि राज्य संरक्षित स्मारक म्हणून ओळखला जाणारा हा बंगला लॉकवूड आणि रुडयार्ड किपलिंग यांच्या भारताशी असलेल्या नात्याची स्मृती जपणारा ठेवा ठरेल.

काही वास्तू या फक्त दगड-मातीच्या नसतात; त्या शहराच्या स्मृती असतात. त्या नष्ट होतात तेव्हा फक्त इमारती नाहीशा होत नाहीत, तर त्यांच्यासोबत एक काळ, एक संस्कृती आणि असंख्य आठवणीही हरवतात. आजही त्या भग्न व्हरांड्यात उभं राहिलं, की एखाद्या जुन्या दुपारचा वारा तिथून वाहत असल्याचा भास होतो. जेजेच्या झाडांच्या सावलीत अजूनही एखाद्या हरवलेल्या बालपणाची चाहूल ऐकू येते.








# दुहीच्या भिंती की संवादाचे सेतू ?

**- कविता आमोणकर**
लेखिका, पत्रकार, कवयित्री.



कोणत्याही भाषेला हिणवणे किंवा तिची टवाळी करणे, हे केवळ त्या भाषेचा अपमान नसून त्या संपूर्ण संस्कृतीचा आणि त्या भाषेतून व्यक्त होणाऱ्या पिढ्यानपिढ्यांच्या भावनांचा अपमान आहे. या वादात 'मजा' पाहणाऱ्या प्रवृत्तींबद्दल किव करावीशी वाटते.

जे लोक एका भाषेला श्रेष्ठ ठरवण्यासाठी दुसऱ्या भाषेला हिणवतात, ते स्वत:च्या भाषेचे प्रेम व्यक्त करत नसून आपला 'अहंकार' प्रदर्शन करत असतात. कोणतीही भाषा ही संवाद साधण्यासाठी, दोन मनामधला सेतू बांधण्यासाठी असते, भिंती उभारण्यासाठी कदापी नाही.... जेव्हा आपण दुसऱ्या भाषेला कमी लेखतो, तेव्हा आपण स्वत:च्या विचारांची संकुचितता जगासमोर मांडत असतो..

ज्यांना या विषयाशी काहीही देणेघेणे नाही, असे काही लोक सोशल मीडिया किंवा इतर माध्यमांतून या वादाला फोडणी देऊन 'मजा' बघण्यात आसुरी आनंद मानतात. वाद जितका विकोपाला जाईल, तितकी त्यांची करमणूक मात्र होते. पण या वादात नुकसान मात्र त्या प्रादेशिक अस्मितेचे आणि भाषिक सौंदर्याचे होत असते, हे कधी कळणार ? ?..

मराठी आणि कोकणी संस्कृतीमध्ये इतके साम्य आहे की, त्यांना एकमेकांपासून वेगळे करणे अशक्य आहे. सण-उत्सव, खाद्यसंस्कृती, लोककला आणि अगदी कौटुंबिक नातेसंबंधांमध्ये या दोन्ही भाषा गुंफलेल्या आहेत. जेव्हा लोक एकमेकांना हिणवतात, तेव्हा ही सांस्कृतिक नाते कच्चे होते आणि समाजात विनाकारण तेढ निर्माण होते.

एखादी भाषा दुसऱ्या भाषेला कमी लेखून मोठी होत नसते. ती तिच्या साहित्याने, तिच्या वापराने आणि त्या भाषेतील लोकांमधील माणुसकीने मोठी होते. कोकणीत असलेला गोडवा आणि मराठीत असलेली खोली या दोन्ही गोष्टी आपल्या राज्याची आणि कोकण किनारपट्टीची श्रीमंती आहे. ही श्रीमंती जपणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

गोव्यात 'कोकणी' ही संवादाची आणि हृदयाची भाषा असली, तरी 'मराठी' ही अनेक गोमंतकीयांसाठी ज्ञानाची, साहित्याची आणि लेखनाची भाषा आहे. या दोन्ही भाषांचे अस्तित्व एकमेकांना पूरक आहे. गोव्यातील अनेक साहित्यिक दोन्ही भाषांमध्ये सारख्याच ताकदीने लेखन करतात. त्यामुळे 'मराठीचा वापर होत नाही' ही केवळ एक अफवा आहे. कारण आज गोव्यात दैनिक गोमंतक सहित प्रस्थापित पाच प्रमुख दैनिके आणि इतर इपेपर ही मराठी भाषेत प्रसिद्ध होत आहेत ती केवळ मराठी वाचकांमुळेच. इतक्या मोठया प्रमाणात इतर कोणत्याही भाषेतील दैनिके गोव्यात प्रसिद्ध होत नाहीत. त्यामुळे गोव्यात मराठी भाषेचा अनादर करून भाषेला हिणवणे कदापी योग्य नाही. जेव्हा एका भाषेला दुसऱ्या भाषिकांकडून अतिशय खालच्या पातळीवर जाऊन हिणवले जाते, तेंव्हा हिणवऱ्यांच्या भाषेवरून त्यांची मानसिकता प्रत्ययास येते.

गोव्यातील मराठी भाषेचा होत असलेला हा सढळ वापर पाहता गोव्यात मराठीचा वापर होत नाही, असे म्हणणे म्हणजे गोव्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वास्तवाकडे पूर्णपणे डोळेझाक करण्यासारखे आहे. केवळ एका भाषेचा सन्मान करण्यासाठी दुसऱ्या भाषेच्या अस्तित्वालाच नाकारणे, ही एक चुकीचीच प्रवृत्ती आहे.

जर आज आपण एकमेकांच्या भाषांचा असा अपमान करत राहिलो, तर आपली येणारी पुढील पिढी कोणत्याही एका भाषेचा आदर करणार नाही. त्यांना भाषेपेक्षा त्यावरून होणारे वादच आठवतील आणि मग ती पिढी अधिक वेगाने परकीय भाषांचा स्वीकार करेल. यात तर शंकाच नाही.

भाषेचा वाद हा वैचारिक असू शकतो, पण तो खालच्या स्तरावर जाऊन एकमेकांना हिणवण्यापर्यंत पोहोचणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण नाही. 'माझी भाषा मला प्रिय आहेच, पण तुझ्या भाषेचाही मला आदर आहे' ही भूमिका जेव्हा प्रत्येकजण घेईल, तेव्हाच या वादात मजा पाहणाऱ्यांची तोंडे बंद होतील.

मराठी आणि कोकणी या दोन्ही भाषांचे रक्षण करणे म्हणजे आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे आहे. आपण एकमेकांचे हात धरले, तरच आपली संस्कृती जागतिक नकाशावर ताठ मानेने उभी राहील. बघा जरा विचार करून!....





Opulus | Capital
Finance.Simplified.

## Let Us Handle Your Finances

- Virtual CFO Services
- Accounting & Tax Advisory
- Treasury & Investment Management
- Fund Raising : SME IPO Debt Syndication

WWW.OPULUSCAPITAL.COM
+91 9930692624
SIDDHARTH SARAF

# संवादाच्या सावल्या

**- प्रथमेश किशोर पाठक**

(लेखक हे कवी असून कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकरांच्या साहित्याचे चाहते आहेत.)



शाळेत असताना कुठल्याश्या वक्तृत्व स्पर्धेत आणि नंतर जागतिक मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमात कुसुमाग्रजांवर भाषण केले होते. टाळया मिळाव्या म्हणून त्यांच्या पुस्तकांची नावे एका दमात म्हणून दाखवायचो. जीवनलहरी ते अक्षरबाग. मग पुढे नाटककार म्हणून वि वा शिरवाडकर यांच्या पुस्तकांची नावे दणदण करत सांगत दूरचे दिवे ते कैकेयी (अर्थात नटसम्राट वगळून कारण त्याच्या उल्लेख करताना 'नटसम्राट तर मराठी रंगभूमीवरील ताजमहालच' असं म्हणून अजून टाळया घेत असत). हे सगळं करतांना त्यांची नाटकं वाचली नाहीत याचे शल्य तेव्हा बोचत नव्हते. मग इतक्या वर्षांनी ध्यानीमनी नसताना शिरवाडकर यांची ७ नाटके वाचायचा योग आला. कुसुमाग्रज जन्मशताब्दी वर्षानिमित्त सगळया नाटकांचे पुनर्मुद्रण पॉप्युलर प्रकाशनने केले आणि त्याला मिळालेला उत्तम प्रतिसाद बघून यावर्षी त्याच्या विशेष आवृत्या ज्यात मूळ संचातील कलाकारांची मनोगते तसेच छायाचित्र आहेत ते प्रकाशित झाले. योग अप्रतिम होताच पण त्याहूनही एक महत्त्वाचे कार्य तो साधून गेला तो म्हणजे कुसुमाग्रज किंवा वि वा शिरवाडकर किंवा तात्याआजोबा यांच्याशी असलेले माझे नाते अजून दृढ करून गेला. ही सात नाटके आहेत- मुख्यमंत्री, विदूषक, एक होती वाघीण, महंत, आनंद, चंद्र जिथे उगवत नाही आणि कैकेयी. म्हटलं या निमित्ताने थोडेसे लिहूयात. इथे सुरवातीलाच स्पष्ट करू इच्छितो की वाचक किंवा रसिक म्हणून मला आवडलेल्या/न आवडलेल्या गोष्टी प्रामाणिकपणे मांडत आहे. अभ्यासकांच्या भूमिकेत नं मी शिरलो आहे आणि तशी इच्छाही नाही.

वर नमूद केलेली सगळी नाटके १९७३ नंतरची आहेत थोडक्यात ही सगळी नाटके 'नटसम्राट' नंतरची आहेत. सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील. एक बाब विशेष करून नमूद करावीशी वाटते, जी या पुस्तकातून समजली, बहुतांश कलाकार ज्यांनी यात मनोगते लिहिली आहेत सगळेच कलाकार 'वि वा शिरवाडकर' या नावाच्या अगाध दडपणाखाली आणि प्रेमळ परंतु थोर जबाबदारीने भारावलेल्या अवस्थेत होते. ही बाब अत्यंत स्वाभाविक आहे, कारण ही सगळी नाटके वाचत असताना शिरवाडकर यांच्या लिखाणाचा गुण लक्षात घेतल्यास प्रत्येक कलाकाराला त्याची 'अभिनयक्षमता' दाखवायची संधी असते. आणि जर त्या संधीचे सोने केले तर झालंच. प्रत्येकच वेळेस शारीरिक किंवा कथानकरूप विशेष घडावे असे गरजेचे नसते. किंबहुना बहुतांश वेळला पात्रांच्या तोंडी असलेले अलंकारिक, लांबसडक, पल्लेदार आणि काव्यमय वाक्य पात्रासाठी खूप काही देत असतात. आनंद नाटक ज्यात तर मुख्य पात्र कवीच आहे त्याची स्वगते अर्थात कविता वाचताना तर मला क्षणभर वाटून गेलं की वि वा शिरवाडकर नाटक लिहीत असताना कुसुमाग्रजांना रहावलेच नाही आणि ते येऊन मध्ये मध्ये चांदण शिंपडून गेले. अनेक आधीपासूनच माहीत असलेल्या कविता ह्या मूळ नाटकांतील आहेत हे मला उशीरा समजले जसे की माझ्या आनंदलोकात किंवा काही बोलायचे आहे किंवा सर्वात्मका शिवसुंदरा किंवा पुरे झाले चंद्र सूर्य (प्रेम कर भिल्लासारखे). कथानकाच्या पार्श्वभूमीवर त्या कविता वाचल्या की त्यांची गोडी अजून वाढते असे जाणवले मला.

नाटक बघणे आणि नाटक वाचणे यात खूपच फरक असतो. दिग्दर्शक आणि नट यासाठी थोर असतात कारण नाटक पुस्तकरूपाने वाचताना देखील ते रंगमंचावर घडताना दिसत असते. नाटक लिखाणाचे यश असते ते म्हणजे नाटक वाचताना अगदी नटांच्या/पात्रांच्या अगांवरील कपड्यांचा

रंगही दिसला पाहिजे वाचकाला. 'चंद्र जिथे उगवत नाही' किंवा 'विदूषक' किंवा 'मुख्यमंत्री' नाटकांमध्ये तो खरोखरच दिसतो. यापैकी बरीचशी नाटके ही मूळ दुसऱ्या कलाकृतीवर बेतली आहेत. रेसरेक्शन-लिओ टॉलस्टॉय-चंद्र जिथे उगवत नाही, आनंद - हृषीकेश मुखर्जी, बेकेट- ज्या आनुई- महंत. माझ्या सुदैवाने मी त्या मूळ कलाकृती वाचल्या नसल्याने मला अगदी आहे ते आणि तसे बघता आले. त्याचा फायदा असा झाला की मी ते कथानक स्वतंत्रपणे अनुभवू शकतो.

एरु गोष्ट नमूद करतो ती सध्याच्या पिढीच्या आणि काळाच्या अनुषंगाने. हल्ली आम्हाला इतक्या जास्त वेगात फिरणाऱ्या आणि दर १५ मिनिटाला एक धक्का देणाऱ्या मालिका आणि चित्रपट बघायची सवय झाली आहे की हळुवार फुलवत नेलेला विषय कंटाळवाणा वाटू शकतो. आणि म्हणूनच ही सगळी नाटके वाचत असताना मी सतत ती ज्या काळात लिहिली गेली तो डोळयांसमोर ठेऊन वाचायचा प्रयत्न करत होतो. हे विशेष करून नमूद करावे लागते कारण काही पात्र उदाहरण मुख्यमंत्री मधील मुख्यमंत्री आणि सोनिया, चंद्र जिथे उगवत नाही मधील रूपा, विदूषक मधील बगाराम आणि अंजली, एक होती वाघीण मधली जयवंतराव ... ह्या पात्रांना आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाला त्या काळच्या समाजकालीन सद्द्विवेकाचे आवरण आणि बहुतांशी कुंपण आहे. २०२६ मध्ये ही पात्रं अशी लिहिणं सोडाच विचारातही घेतली जाऊ शकत नाही. मुख्यमंत्री नाटकात मुख्य भूमिकेत डॉ श्रीराम लागू आहेत आणि त्या पुस्तकात त्यांच्या 'लमाण' आत्मचरित्रातील अंश दिला आहे. आणि डॉ लागू यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की ह्या नाटकाचे अधिक प्रयोग होणार नाही हे ठाऊकच होते कारण राजकीय नाटकांचा एक साचा ठरलेला होता त्याकाळी आणि अशा काळात गांधीवादी नैतिक अधिष्ठान असलेला राजकारणी दाखवणे हे दुर्मिळ. म्हणूनच मलाही वाटले की प्रत्येक नाटक त्या त्या काळाशी अनुसरून वाचले पाहिजे.




शिरवाडकर फक्त कथानक पुढे नेत नसतात तर पात्रही फुलवत असतात. त्यांचे पात्र रंगमंचावरून विंगेत गेले तरीही वाचकाच्या डोक्यात ते काहीतर करत असतातच. उगाचच प्रवेश उगाच परतणे हे दिसत नाही. एखादा प्रवेश इतक्या मोक्याच्या जागी संपतो की तत्कालीन प्रेक्षकांना पुढच्या प्रवेशाची किती हुरहूर लागली असेल याची कल्पना येते (विदूषक, एक होती वाघीण, महंत). त्या पात्रांमधील नाते सरळसोट नसते. त्याला कंगोरे असतात. एक होती वाघीण, मुख्यमंत्री

आणि कैकेयी तर उत्तम उदाहरणे. 'पुढे काय?' ही उत्सुकता किती आणि कशी ताणून धरायची हे शिरवाडकर यांच्यासारख्या निष्णात लेखकाला गवसले आहे याचे प्रमाणपत्र मी द्यायची गरज नाही पण एक नक्की २०२६ मध्ये वाचताना नक्कीच काही वेगळे करता येऊ शकते का हा विचार डोकावतो. ह्या सगळयाच नाटकांचे खूप प्रयोग झाले नाहीत असं पुस्तकातील मनोगतांतून वाचनास आले. काही कारणे समजू शकतो काही अनाकलनीय. कैकेयी हे शिरवाडकर यांचे शेवटचे नाटक. थोडक्यात माझी शिरवाडकरांशी एक नाटककार म्हणून ओळख उलट्या दिशेच्या प्रवासाची आहे.

एक सामान्य वाचक म्हणून या सात नाटकांतील कथावस्तूच्या अनुषंगाने 'चंद्र जिथे उगवत नाही' आणि 'विदूषक'या कथा म्हणून विशेष भावल्या. (विदूषक वाचत असताना समकालीन काही उदाहरण द्यायचे असेल तर 'मटरु की बिजली का मंडोला' मधील पंकज कपूर आणि इम्रान खान ही पात्रे अनुक्रमे रायसाहेब आणि बगाराम यांच्यावरुन प्रेरित वाटतात. अगदी तेच कथानक रायसाहेब किंवा मंडोला रोज रात्री दारू पिऊन एक वेगळाच माणूस बनतात चांगला आणि सकाळी विसरतात आणि मूळ वाईट माणूस बनतात आणि या सगळया परिवर्तनात जो माणूस रखडला जातो तो मटरु किंवा बगाराम.) पात्रांच्या बाजूने विचार करावयाचा असल्यास 'महंत', 'एक होती वाघीण' मधील पात्र विशेष भुरळ पाडतात. भाषा आणि संवाद या आघाडीवर 'आनंद'चा हात कुणीही धरू शकत नाही. 'मुख्यमंत्री' नाटक लक्षात राहते ते शेवटच्या प्रवेशात चित्रा सोबत आणि गांधीजींच्या तसबीरीसोबत असलेल्या संवादामुळे. प्रतिभेची उंची दिसते आपल्याला तिथे. डॉ लागू तिथे काय डोळयांचं पारणं फेडत असतील याची कल्पनाच येऊ शकते फक्त.

नाटक वाचन हा एक वेगळाच अनुभव असतो. अनेक प्रसिद्ध नट ज्यांनी ह्या भूमिका साकारलेल्या असतात त्यांचे चेहरे आपल्याला दिसतात, त्यांच्या आवाजात संवाद ऐकू येतात, आपलं भारावलेपण शब्दरूपातून चेतना जागृतीचा प्रवास सुरु करतात. काही प्रसंग काही वाक्य आयुष्यभर मनात घर करून जातात. पॉप्युलर प्रकाशन प्रकाशित या पुस्तकांनी मला पुन्हा एकदा तात्याआजोबांच्या पायाशी नेऊन बसवलं आणि त्यांच्यातला नाटककार त्यांच्या विशेष अशा खर्जातल्या पण मृदू आवाजात ह्या गोष्टी सांगत आहेत आणि त्या संवादातल्या सावल्या आजन्म आपल्याला साथ करत आहेत.

(पुस्तके खरेदी करण्यासाठी संपर्क - ९८६७२४२४०७)

# स्मरण

## नटवर्य परशुराम सामंत

## जन्म - २ फेब्रुवारी १९०९ | निधन - २५ जुलै १९९३

– **सुरेश तेलंग**
पत्रकार व समिक्षक



मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ गुणी कलाकार परशुराम सामंत यांचा जन्म प्राचीन कुडाळ प्रांतातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली पासून काही मैलावर असलेल्या हरकुळ बुद्रुक या गावी २ फेब्रुवारी१९०९ रोजी झाला.

लहानपणापासून त्यांचा स्वभाव खेळकर व गमतीचा होता. त्यामुळे सर्वांना ते खूप आवडत. त्यावेळी खेड्यात शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे इच्छा असूनही त्यांना शिक्षण घेता आले नाही. जेमतेम मराठी चौथी इयत्तेपर्यंत त्यांचे शिक्षण कणकवली येथे झाले. बऱ्यापैकी जमीन असून परशुरामसह चार भावंडांचे पालनपोषण त्यांच्या वडिलांनी केले.

परशुराम सामंतांचा पिंडच नटाचा. लहानपणापासून नाटकाचा छंद हे लक्षात घेऊन वडीलबंधू दत्तोपंतांनी त्यांना वयाच्या १७ व्या वर्षी नव्यानेच सुरुवात होत असलेल्या 'बळवंत संगीत मंडळीत' दाखल केले. कोकणी बोली बोलणाऱ्या या मुलाला मालकाने नाटकाच्या जाहिरातीचा गाडा फिरविण्याचे काम दिले. परंतु आपले जीवन जाहिरातीचा गाडा ढकलण्यात ते तयार नव्हते. त्यांना 'नटवर्य' म्हणून नाव कमवायचे होते. त्यामुळे महत्त्वाकांक्षा स्वस्थ बसू देईना. जिद्दी मन व मेहनत घेण्याची त्यांची तयारी होती. नटवर्य चिंतामणराव कोल्हटकरांच्या तालमी पाहून त्याचा अभ्यास केला आणि नाटकाच्या नकला पाठ करणे सुरू केले. हे सर्व नाट्य मंडळीच्या मालकाच्या नजरेस आले. त्यामुळे त्यांनी परशुरामला नाटकातून लहान भूमिका देण्यास सुरुवात केली. स्वच्छ व स्पष्ट वाणी, वेडसरवृत्ती, सुदृढ शरीर व अखंड मेहनत या सर्व गुणांच्या बळावर 'भावबंधनातील' सर्व भूमिका, 'वेड्याचा बाजार' मधील अण्णासाहेब, 'राजसंन्यास' मधील देऊची भूमिका सामंतांना मिळाल्या. त्यानंतर रणदुंदुभी, संन्यस्त खड्ग, ब्रह्मकुमारी इत्यादी नाटकातून नायकाच्या भूमिका त्यांना देण्यात आल्या. दोन-चार संगीत भूमिकाही त्यांनी यशस्वी केल्या. रंगभूमीवर जी भूमिका करणार त्याची अथपासून इतीपर्यंत खड्या आवाजात नक्कल म्हणून मग ते नाट्यगृहाकडे जाण्यासाठी बाहेर पडत. हे एक त्यांच्या रंगभूमीवरील यशाचे अंग होते.

१९३२/३३ च्या सुमारास सर्वच नाट्य कंपन्यांना फारच वाईट दिवस आले. त्याचा परिणाम बळवंत नाटक मंडळीने पिक्चर कॉर्पोरेशन काढली. परंतु तिथेही कालांतराने अंत झाल्यावर जिद्दी नाट्य कलावंत सामंतांनी बळवंत नाटक मंडळीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झाला नाही.

शेजारी, संत सखू, डॉ. कोटणीस, जुने ते सोने, मराठ्याची मुलगी, चूल आणि मूल, साखरपुडा, मोलकरीण आदि चित्रपटातून त्यांनी लक्षवेधी भूमिका केल्या. परंतु त्यांचे ते विश्व नव्हते. प्रेक्षकांसमोर स्टेजवर उभे राहून निरनिराळया भूमिका गाजविणाऱ्या परशुराम सामंतांना कॅमेऱ्याचा भास सहन होईना. तसेच त्यांचे मन रमेना. त्यामुळे सामंत पुन्हा रंगभूमीवरील नव्या जुन्या नाटकातून नाट्य व्यवसायात रमू लागले. 'धि गोवा हिंदु असोसिएशन' या नाट्यसंस्थेतून प्रा. वसंत कानेटकर लिखित 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'मत्स्यगंधा' या नाटकातून अनेक प्रयोगातून भूमिका केल्या. मा. दीनानाथ मंगेशकर, चिंतामणराव कोल्हटकर, शंकरराव मोहिते, नानासाहेब फाटक, कृष्णराव कोल्हापुरे आदि अनेक नामवंत कलाकारांबरोबर त्यांनी भूमिका केल्या.

सहा तपे (७२ वर्षे) मराठी रंगभूमीवरील नाट्य सेवेच्या योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार व मानसन्मान मिळाले. त्यांचे २५ जुलै १९९३ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त हीच पूर्ण श्रद्धांजली.

# 'खडाष्टक': संस्थेच्या रंगभूमीवरील सुवर्णयुगाची नांदी



"गोमंत तरंग"च्या या विशेष मालिकेतून आपण "धि गोवा हिंदु असोसिएशन" च्या रंगभूमीवरील प्रवासाचा मागोवा घेणार आहोत. या प्रवासाची सुरुवात झाली ती एका खास नाटकापासून **'खडाष्टक'**.

**१९५५ ते २०२६...** ही केवळ वर्षांची नोंद नाही; ती रंगमंचावरून काळाच्या पडद्यावर उमटत गेलेल्या एका सांस्कृतिक परंपरेची अखंड गाथा आहे. 'खडाष्टक' पासून सुरू झालेली ही वाटचाल काळाच्या प्रवाहात अधिकाधिक समृद्ध होत गेली. अनेक कलाकारांची स्वप्ने, रंगकर्मींची निष्ठा आणि कलेवर निरपेक्ष प्रेम करणाऱ्या पिढ्यांचे योगदान यांतून ही परंपरा आकार घेत राहिली.

काळ बदलला, पिढ्या बदलल्या, रंगभूमीचे स्वरूपही बदलत गेले; पण 'धि गोवा हिंदु असोसिएशन"च्या रंगभूमीवरील कलेची ओढ आणि तिच्याशी असलेली नाळ मात्र तितकीच घट्ट राहिली. त्या पहिल्या पावलातून सुरू झालेला प्रवास आज एका समृद्ध सांस्कृतिक वारशात रूपांतरित झाला आहे.

**"काही क्षण हे केवळ यशाचे नसतात; ते एका परंपरेच्या जन्माचे साक्षीदार असतात."**

आज १०६ वर्षांचा सामाजिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रातील प्रदीर्घ आणि अभिमानास्पद प्रवास पूर्ण करताना "धि गोवा हिंदु असोसिएशन"च्या वाटचालीकडे पाहिले, तर त्यात केवळ एका संस्थेचा इतिहास दिसत नाही, तर

– **जितेश सावंत**
संपादक, गोमंत तरंग

गोमंतकीयांच्या सांस्कृतिक जडणघडणीचा एक सजीव दस्तऐवज उलगडताना दिसतो. १९१९ साली रुजलेले हे बीज आज एक भक्कम वटवृक्ष बनले आहे ज्याच्या छायेखाली अनेक पिढ्यांचे कलावंत घडले, फुलले आणि रंगभूमीला समृद्ध करत राहिले.

गोमंतकीयांच्या जीवनात नाट्यकलेचे स्थान विशेष आहे. ती केवळ करमणुकीचे माध्यम नसून, अभिव्यक्तीची, संवेदनांची आणि परंपरेची जपणूक करणारी एक सशक्त कला आहे. याच सांस्कृतिक जाणिवेचा एक भाग म्हणून संस्थेच्या वार्षिक संमेलनांमधून सादर होणारे नाट्यप्रयोग आणि संगीत मैफिली यांमधून अनेक हौशी कलाकारांना व्यासपीठ मिळाले. १९२७ साली सादर झालेले 'मोगाचे लग्न' हे कोकणी नाटक (शेण गोयंबाब, वामनराव वर्दे वालावलकर या संस्थेच्या संस्थापक सदस्याने लिहिलेले कोकणी नाटक) आणि १९५२ चा रौप्य महोत्सव या टप्प्यांनी संस्थेच्या सांस्कृतिक वाटचालीला अधिक दृढ पाया दिला. या पायावर उभे राहत असताना एक क्षण असा आला, ज्याने या प्रवासाला नवं वळण मिळालं. संस्थेने मराठी रंगभूमीवर पहिले ठाम पाऊल टाकले ते १९५५ साली.

मुंबई राज्य नाट्यस्पर्धेत संस्थेच्या हौशी कलाकारांनी प्रथमच सहभाग नोंदवला. शं. प. जोशी लिखित आणि मा. दत्ताराम यांच्या दिग्दर्शनाखाली सादर झालेले 'खडाष्टक' हे नाटक हा केवळ एक प्रयोग नव्हता; तो संस्थेच्या सांस्कृतिक ध्यासाचा आणि कलाप्रेमाचा पहिला मोठा आविष्कार होता.

रंगमंचावर साकारलेला प्रत्येक प्रसंग, प्रत्येक संवाद हा केवळ अभिनय नव्हता - तो एक अनुभव होता. कलाकारांचा आत्मविश्वास, दिग्दर्शनातील नेमकेपणा आणि सादरी करणातील प्रभावीता यामुळे 'खडाष्टक'ने प्रेक्षक आणि परीक्षक दोघांचीही मनं जिंकली. आणि मग आला तो

ऐतिहासिक क्षण या नाटकाने प्रथम पारितोषिकासह मानाची चांदीची ढाल पटकावली. यासोबतच अभिनय आणि इतर क्षेत्रांतील अनेक वैयक्तिक पारितोषिकांनी या यशाला अधिक उजाळा दिला. पहिल्याच प्रयत्नात मिळालेल्या या यशाने संस्थेच्या रंगभूमीवरील क्षमतेची ठळक नोंद निर्माण केली.

'खडाष्टक' हे केवळ एक नाटक नव्हते; ते 'धि गोवा हिंदु असोसिएशन"च्या मराठी रंगभूमीवरील पहिल्या पावलाचे प्रतीक होते. त्या एका पावलाने केवळ यशाचा मार्ग खुला केला नाही, तर एका समृद्ध सांस्कृतिक परंपरेची मुहूर्तमेढ रोवली.

आज देखील या प्रवासाकडे पाहताना, त्या पहिल्या टाळयांचा निनाद अजूनही ऐकू येतो प्रेरणा देणारा, उर्जा देणारा आणि पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शक ठरणारा.

**'खडाष्टक' – नाट्यप्रयोगाची माहिती**

लेखक: शं. प. जोशी
दिग्दर्शक: मा. दत्ताराम
रंगभूषा: सीताराम मराठे

**कलाकार:**

भिकू पै आंगले (अभिनयाचे पारितोषिक)
सतीश म्हापसेकर
तेजस्विनी महात्मे (देऊळकर) (अभिनयाचे पारितोषिक)
प्रफुल्ला डहाणूकर (जोशी)
राया प्रभू
उपेन्द्र नायक
रंजना काश्यप (सांगेकर)
दुर्गाराम शिरोडकर (अभिनयाचे पारितोषिक)
मनोरमा वागळे (तेलंग) (अभिनयाचे पारितोषिक)

**पारितोषिके**

राज्य नाट्यस्पर्धा प्रथम पारितोषिक
मानाची चांदीची ढाल
अनेक वैयक्तिक पारितोषिके व प्रशस्तिपत्रके





# नाटक वाचवा : जिवंत कलेसाठी एक मनापासून आवाहन



माझ्यासाठी नाटक ही केवळ आवड नाही, तर ती माझ्या रक्तातली परंपरा आहे. नाटक, सिनेमा, दूरदर्शन, केबल टीव्ही, इंटरनेट, ओटीटी, नेटफ्लिक्स अशी अनेक माध्यमे आली, काळ बदलला, मनोरंजनाची रूपे बदलली; पण माझ्या मनात नाटकाचे स्थान आजही सर्वोच्च आहे. कारण नाटक ही जिवंत कला आहे. पडदा उघडला की रंगमंचावर कलाकार आपल्या डोळ्यासमोर एक नवे जग उभे करतात. हा अनुभव कोणत्याही स्क्रीनवर मिळत नाही.

आज नाटकाला कठीण दिवस आले आहेत, हेही सत्य आहे. मोबाईल, सोशल मीडिया, वेगवान जीवनशैली आणि घरबसल्या मिळणारे मनोरंजन यामुळे प्रेक्षकांची सवय बदलली. एकेकाळी नाटकासाठी रांगा लागत; आज अनेक नाट्यगृहे रिकामी दिसतात. तरीही खरी कला कधी मरत नाही.

जगातील अनेक आधुनिक देश आजही नाटक आणि जिवंत सादरीकरणाला मान देतात. Broadway, West End, Sydney Opera House, La Scala यांसारखी ठिकाणे त्यांच्या सांस्कृतिक अभिमानाची प्रतीके आहेत. लोक आजही अभिमानाने तिकीट काढून नाटक, ऑपेरा, संगीत कार्यक्रम पाहायला जातात.

वेदना याची वाटते की आपलेच अनेक लोक परदेशात ऑपेरा शो पाहायला अभिमानाने जातात, पण आपल्या शहरातील, आपल्या भाषेतील नाटकासाठी तितकाच उत्साह दाखवत नाहीत. दूरचे आकर्षण मोठे वाटते, जवळचे मौल्यवान कमी वाटते. ही मानसिकता बदलली पाहिजे.

माझ्यासाठी हा विषय अधिक भावनिक आहे, कारण नाटक ही माझ्या घराण्याची परंपराही आहे. माझ्या आजोबांनी अनेक नाटके लिहिली होती, त्यात संगीत नाटकांचाही समावेश होता. त्या काळी नाटक हे समाजप्रबोधन, संस्कृती आणि कलेचे सामर्थ्यवान माध्यम होते. त्यांच्या प्रतिभेने अनेक कथा, गीते आणि विचार रंगमंचावर आणले.

परंतु काळाच्या ओघात बरीच हस्तलिखिते, प्रती आणि आठवणी हरवत गेल्या. आज दुर्दैवाने माझ्याकडे त्यांच्या लिखाणांपैकी फक्त एकच प्रत उरली आहे - त्यांच्या संगीत नाटकाची, जी जवळपास शंभर वर्षांपूर्वी छापली गेली होती. ती प्रत माझ्यासाठी केवळ जुने पुस्तक नाही, तर माझ्या कुटुंबाचा जिवंत सांस्कृतिक वारसा आहे. त्या पानांमध्ये त्या काळाचा श्वास आहे, भाषेची माधुरी आहे, आणि रंगभूमीची परंपरा आहे.

नाटक हे फक्त रंगमंचावर दिसणारी दोन-तीन तासांची करमणूक नाही. त्यामागे असंख्य लोकांचे रक्त, घाम आणि प्रेम असते. लेखक कथा घडवतो, दिग्दर्शक त्याला जीवन देतो, कलाकार ते जगतात. नेपथ्य, प्रकाशयोजना, ध्वनी, वेशभूषा, मेकअप, रिहर्सल - प्रत्येक गोष्ट प्रचंड मेहनतीने उभी राहते.

पण इतका परिश्रम घेऊनही जर प्रेक्षकच आले नाहीत, तर ते नाटक हळूहळू थांबते. आर्थिक नुकसान तर होतेच, पण त्याहून मोठं म्हणजे एक जिवंत कला शांत होऊ लागते. म्हणून नाटक ही केवळ कलाकारांची जबाबदारी नाही - ती समाजाची जबाबदारी आहे.

हेच खरं वास्तव आहे - नाटक ही जिवंत परंपरा आहे, जिवंत आत्मा आहे. आणि हा आत्मा जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे की नाटक हे सर्वश्रेष्ठ कला माध्यमांपैकी एक आहे. ते फक्त मनोरंजन नाही; ते समाजप्रबोधन आहे, विचारांची जागृती आहे, आणि संस्कृतीचा श्वास आहे.

जर लोकांनी नाटकाला साथ दिली नाही, तर ती कला बंद पडते. आणि एकदा रंगमंच शांत झाला, की समाजाचा एक महत्त्वाचा आरसा हरवतो.

म्हणून माझी मनापासून विनंती आहे - नाटक पाहा, कलाकारांना दाद द्या, रंगमंच जिवंत ठेवा. कारण प्रत्येक टाळी ही त्या कलेला जगवणारा श्वास असतो.

नाटक वाचवा: जिवंत कलेसाठी एक मनापासून आवाहन

**– मधुकर सावर्डेकर**



श्रीशांतादुर्गा विजयते.

संगीत

नामप्रभाव

अर्थात्

पतितोद्धार

नाटक

— लेखक —

श्रीधर मुकुंद शेणवी नाडकर्णी सांवर्डेकर
उर्फ बाबासाहेब, सांवर्डे-गोवा.

[ विसाव्या शतकांतील राधामाधव, भावार्थलहरी-गीताटीका,
देवीभागवत प्राकृत प्रथमस्कंध इत्यादी पुस्तकांचे कर्ते ]

—मुद्रणस्थल—

'संगमोदय छापखाना' सांगें.

श्रीरामनवमी श. १८५२

किंमत १ रुपया.




3D
THREE-D
RECREATION LLP
Specialization In : MSME & RETAIL LOANS
Turning Financial Dreams
into Reality
Mrs. Diksha Bhushan Moye
(Founder & CEO)
9076205539
OUR SERVICES
HOUSING LOAN
Make your dream home a reality
LOAN AGAINST PROPERTY
Unlock the value of your property
MORTGAGE LOAN
Simple solution for your big needs
BALANCE TRANSFER & TOP-UP LOAN
Lower your EMI, fulfill your dreams
BUSINESS LOAN ASSISTANCE
Empowering your business to grow more
WE DEAL WITH
ALL NATIONALISED BANKS,
PRIVATE BANKS,
CO-OP BANKS &
NBFCs
WIDE NETWORK.
BETTER OPTIONS.
STRONG PARTNERSHIPS.
BETTER SOLUTIONS.
WHY CHOOSE US?
EXPERT ADVICE
from experienced professionals
FAST & EASY PROCESSING
Quick approvals & hassle-free documentation
BEST DEALS
Competitive interest rates from leading banks & NBFCs
TRUSTED SUPPORT
End-to-end support till loan disbursal
EXPANDED FINANCIAL SOLUTIONS FOR YOUR GROWTH
WORKING CAPITAL FINANCE
Fuel your daily operations & business growth
START-UP FUNDING
Empowering startups to turn ideas into reality
BUSINESS EXPANSION LOAN
Support for expansion, modernization & scaling up
INVOICE FINANCE
Improve cash flow with quick invoice discounting
MULTIPLE LOAN OPTIONS
Customized solutions to match your needs
MINIMUM DOCUMENTATION
Hassle-free process with simple paperwork
100% TRANSPARENT PROCESS
No hidden charges, complete clarity
RIGHT SOLUTION FOR EVERY NEED
Personalized guidance at every step
Office No. 219, 2nd Floor, Corporate Avenue Co.-op. Premises Society Ltd., Sonawala Road, Near Mewad Bhavan, Goregaon (East), Mumbai - 400 063
3.drecreation2023@gmail.com
your wish is our command

# डिजिटल फुटप्रिंट : न्यायव्यवस्थेतील नवा साक्षीदार

आजच्या काळात प्रत्येक डिजिटल क्लिक, चॅट किंवा व्यवहार हा एक कायमस्वरूपी 'डिजिटल पुरावा' असतो. त्यामुळे तंत्रज्ञान वापरताना आपण काय आणि कशी माहिती शेअर करतो, याबाबत कमालीची सजगता बाळगणे अनिवार्य आहे, कारण आपला 'डिजिटल फुटप्रिंट' हाच भविष्यातील सर्वात मोठा साक्षीदार ठरू शकतो.

**– जितेश सावंत**
(शेअर मार्केट, सायबर लॉ, डेटा प्रोटेक्शन लॉ आणि डिजिटल एव्हिडन्स तज्ज्ञ)

आजच्या डिजिटल युगात सत्य केवळ शब्दांत किंवा कागदपत्रांत बंदिस्त राहिलेले नाही; प्रत्येक क्लिक, प्रत्येक कॉल, प्रत्येक लोकेशन आणि प्रत्येक डिजिटल संवाद हा एखाद्या गुन्ह्याचा, व्यवहाराचा किंवा कटाचा मूक साक्षीदार बनला आहे. मोबाईलमधील चॅट्स, CCTV मधील काही सेकंदांचे फुटेज, सोशल मीडियावरील पोस्ट किंवा एका साध्या ईमेलमधील माहिती हे सर्व न्यायालयात एखाद्याचे भविष्य ठरवू शकतात. त्यामुळे "पुरावा" ही संकल्पना आता पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन डिजिटल स्वरूपात अधिक प्रभावी, अधिक अचूक आणि अधिक निर्णायक बनली आहे.

'Evidence" हा शब्द लॅटिन 'evidere" पासून उद्भवलेला असून त्याचा अर्थ "स्पष्टपणे दाखवणे" (to show clearly / to make visible) असा होतो. प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ Jeremy Bentham यांनी म्हटल्याप्रमाणे, 'साक्षीदार हे न्यायाचे डोळे आणि कान आहेत" ('Witnesses are the eyes and ears of justice'), म्हणजेच न्यायालय स्वत: घटना पाहत नाही, तर साक्षीदार, पुरावे आणि तथ्यांच्या माध्यमातूनच सत्यापर्यंत पोहोचते. भारतीय न्यायव्यवस्थेतील विरोधी (Adversarial) पद्धतीमध्ये न्यायालय निर्णय देण्यापूर्वी तथ्यांची शहानिशा करते आणि त्या प्रक्रियेत पुरावे हीच सर्वात महत्त्वाची कडी ठरते.

भारतीय न्यायव्यवस्थेचा पाया दीर्घकाळ Indian Evidence Act, 1872 या कायद्यावर आधारित होता. सर जेम्स फिट्झजेम्स स्टीफन यांनी तयार केलेला हा कायदा त्या काळातील न्यायप्रक्रियेसाठी अत्यंत प्रभावी आणि प्रगत मानला जात होता. १९व्या शतकातील न्यायव्यवस्था मुख्यत: कागदपत्रे, स्वाक्षऱ्या, प्रत्यक्ष साक्षीदार आणि भौतिक पुराव्यांवर आधारित होती. त्या काळात संगणक, इंटरनेट किंवा डिजिटल तंत्रज्ञानाचा उदय झालेला नसल्यामुळे इलेक्ट्रॉनिक पुराव्यांसाठी या कायद्यात स्वतंत्र तरतुदी नव्हत्या. मात्र पुढे माहिती तंत्रज्ञान आणि इंटरनेटचा झपाट्याने वाढलेला वापर पाहता न्यायप्रक्रियेसमोर नव्या प्रकारची आव्हाने उभी राहिली आणि कायद्यात एक प्रकारची तांत्रिक व कायदेशीर पोकळी निर्माण झाली १९९१ मधील आर्थिक उदारीकरण (Liberalization, Privatization, Globalization Reforms), माहिती तंत्रज्ञानाचा वाढता प्रसार आणि भारतातील IT उद्योगाचा झपाट्याने झालेला विकास यामुळे कायद्यामध्ये बदल करणे अपरिहार्य झाले. Infosys, TCS आणि Wipro यांसारख्या कंपन्यांमुळे भारत जागतिक तंत्रज्ञान केंद्र बनू लागला. या पार्श्वभूमीवर Information Technology Act, २००० लागू करण्यात आला, ज्याने इलेक्ट्रॉनिक व्यवहारांना आणि डिजिटल रेकॉर्ड्सना कायदेशीर मान्यता दिली. याच काळात भारतीय पुरावा कायद्यात सुधारणा करून सेक्शन 65B समाविष्ट करण्यात आले, ज्यामुळे इलेक्ट्रॉनिक पुरावे न्यायालयात ग्राह्य धरण्यासाठी प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले.

तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे पुन्हा एकदा कायद्यात व्यापक बदल करण्याची गरज निर्माण झाली आणि १ जुलै २०२४ पासून Bharatiya Sakshya Adhiniyam, २०२३ लागू करण्यात आला. या नव्या कायद्याने डिजिटल पुराव्यांना

अधिक स्पष्ट आणि आधुनिक चौकट प्रदान केली आहे. “Electronic Records” आणि 'Electronic Oral Statements” यांना स्पष्ट मान्यता देण्यात आली असून प्राथमिक आणि दुय्यम पुराव्यांमधील फरक अधिक स्पष्ट करण्यात आला आहे. मूळ उपकरण जसे मोबाईल, संगणक किंवा सर्व्हर न्यायालयात सादर केल्यास तो प्राथमिक पुरावा मानला जातो; मात्र स्क्रीनशॉट्स, प्रिंटआउट्स किंवा इलेक्ट्रॉनिक प्रती या दुय्यम पुरावे ठरतात, ज्यासाठी कायद्यानुसार प्रमाणपत्र आवश्यक असते. तसेच हॅश तंत्रज्ञानाद्वारे डेटाची अखंडता तपासली जाते, ज्यामुळे पुराव्यामध्ये फेरफार झाला आहे का हे ओळखणे शक्य होते.

डिजिटल पुराव्यांच्या वैधतेसंदर्भात भारतीय न्यायालयांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. State (NCT of Delhi) V. Navjot Sandhu या संसद हल्ला प्रकरणात कॉल रेकॉर्ड्स आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे निर्णायक ठरले होते. पुढे Anvar P.V. V. P.K. Basheer या निर्णयाने इलेक्ट्रॉनिक पुराव्यांसाठी प्रमाणपत्राची आवश्यकता अधोरेखित केली, तर Arjun Panditrao Khotkar v. Kailash Kisanrao Gorantyal या निकालाने या तत्त्वाला अंतिम स्वरूप दिले.

डिजिटल फॉरेन्सिक हा या संपूर्ण प्रक्रियेचा वैज्ञानिक कणा आहे.. तपास प्रक्रियेत ओळख, संपादन, जतन, विश्लेषण आणि अहवाल या टप्प्यांतून डेटा हाताळला जातो. डेटामध्ये कोणताही बदल होऊ नये म्हणून विशेष तांत्रिक साधनांचा वापर केला जातो, तर हॅश तंत्रज्ञानाद्वारे डेटाची सत्यता आणि अखंडता तपासली जाते; तसेच आधुनिक डिजिटल फॉरेन्सिक साधनांच्या मदतीने हटवलेला किंवा लपवलेला डेटा शोधून तपास अधिक अचूक आणि विश्वासार्ह बनवला जातो. डिजिटल पुरावे गोळा करताना विशेष संरक्षणात्मक साधनांचा वापर करून उपकरणांवर बाह्य सिग्नल्सचा परिणाम होऊ दिला जात नाही.

आज डिजिटल पुरावे विविध स्वरूपात उपलब्ध आहेत, ईमेल्स, सोशल मीडिया चॅट्स, CCTV फुटेज, GPS लोकेशन डेटा, ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग, बँकिंग व्यवहार आणि क्लाउड स्टोरेज. त्यामुळे तपासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. 'Chain of Custody' ही संकल्पना येथे अत्यंत महत्त्वाची ठरते, कारण पुरावा कोणी, केव्हा आणि कसा हाताळला याची संपूर्ण नोंद ठेवली गेल्यास न्यायालयात त्याची विश्वासार्हता अधिक बळकट होते.

आज सोशल मीडिया देखील आधुनिक काळातील एक महत्त्वाचा “डिजिटल साक्षीदार” बनला आहे. WhatsApp, Facebook, Instagram किंवा X (Twitter) यांसारख्या प्लॅटफॉर्मवरील पोस्ट्स, चॅट्स आणि डिजिटल संवाद न्यायालयात इलेक्ट्रॉनिक पुरावे म्हणून सादर केले जात आहेत. अनेक प्रकरणांमध्ये लोकेशन डेटा, कॉल रेकॉर्ड्स आणि सोशल मीडिया ॲक्टिव्हिटीमुळे गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे. त्यामुळे “Digital Footprint” ही संकल्पना तपास प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची ठरू लागली आहे.

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे डिजिटल फॉरेन्सिकचे महत्त्व अधिक वाढले आहे. ऑनलाइन फसवणूक, हॅकिंग, ओळख चोरी, (Identity Theft) आर्थिक गुन्हे, डेटा चोरी आणि बौद्धिक संपदा उल्लंघन (Intellectual Property - IP) यांसारख्या प्रकरणांमध्ये डिजिटल पुरावे हे तपासाचे प्रमुख साधन बनले आहेत. नेटवर्क लॉग्स, Metadata आणि व्यवहारांचा डेटा यांच्या आधारे तपास यंत्रणा गुन्हेगारांचा मागोवा घेतात.

तथापि, डिजिटल तपास प्रक्रियेत अनेक गंभीर आव्हाने देखील आहेत. एन्क्रिप्शनमुळे डेटा मिळवणे कठीण होते, RAM मधील डेटा 'Volatile' असल्यामुळे तो लगेच नष्ट होतो, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर डेटा मिळवण्यासाठी जटिल कायदेशीर प्रक्रिया करावी लागते. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित Deepfake तंत्रज्ञानामुळे खोटे पुरावे तयार होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेसमोर सत्य आणि बनावटपणा यामधील फरक ओळखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

भविष्यात न्यायव्यवस्था अधिक डेटा-आधारित होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि क्लाउड फॉरेन्सिक्स यांसारख्या तंत्रज्ञानामुळे तपास अधिक वेगवान आणि पारदर्शक होईल; मात्र याचबरोबर गोपनीयता, डेटा सुरक्षा आणि नैतिकतेचे प्रश्न अधिक महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे कायदा आणि तंत्रज्ञान यांच्यात योग्य संतुलन राखणे अत्यावश्यक ठरेल.

अखेर, भारतीय पुरावा कायद्याची ही उत्क्रांती केवळ कायद्यातील बदल नाही; ती भारताच्या डिजिटल प्रवासाची साक्ष आहे. कागद आणि शाईवर आधारलेल्या न्यायप्रक्रियेपासून डेटा, सर्व्हर आणि अल्गोरिदम्सच्या युगापर्यंत पोहोचलेला हा प्रवास न्यायव्यवस्थेला अधिक अचूक, पारदर्शक आणि आधुनिक बनवत आहे.

आजच्या डिजिटल जगात प्रत्येक क्लिक, प्रत्येक लोकेशन आणि प्रत्येक ऑनलाइन संवाद नकळत एक पुरावा निर्माण करत आहे. भविष्यात न्यायालयात सर्वात प्रभावी साक्षीदार एखादा माणूस नसेल तर त्याचा स्वत:चा 'डिजिटल फुटप्रिंट' असेल.



# सोबीत सुंदर गोंय

– अनघा विठ्ठलकृष्ण कामत
आदर्श शिक्षिका पुरस्कार विजेत्या,
माजी सचिव, कोकणी लेखक संघ
परवरी - गोंय ८४०८०८४२७०



आमच्या गोंयांक 'धर्तरेवयलो सर्ग' अशें म्हणतात तें काय फट न्हय ! गोंयचे पांचवेचार दोंगर, वाऱ्यार धोलपी माड-माडयो, कुळागरां, मांडवी जुवारी अशा न्हंयांचो आनी वझ्ऱ्यांचो खळखळ, गोंयच्यो ओढलायण्यो दर्यादिगो अशा तरेकवार सैमाचे सुंदरकायेन आमचें गोंय नटलेलें आसा आनी हें पळोवन मन सामकें धादोशी जाता. म्हज्या भुरगेपणांत पळयिल्ले ते रेंदेर आजय म्हाका याद जाता. आज हें चित्र मातशें कमी जालां खरें, पूण तें गांवगिऱ्या वाठारांत आजय पळोवंक मेळटा. ते रेंदेर सूर काडपाक एकेका माडार माकडाभशेन दिसांतल्यान तीन-तीन फावटी चडटाले आनी मेकळा आवाजान कांतारां म्हणटाले तें अजूनय कानांत घुमतात.

गोंय म्हणलें काय पांचव्यो-निळो ल्हान-व्हड दोंगर दोंगुल्ल्यो दोळ्यांमुखार येतात. मळबाक तकली तेकोवपी लांब-लांब माड तर एक वेगळोच देखावो निर्माण करतात. तरेकवार झाडां आनी रूख, घळी, रानवटी जनावरां, जिवाणूं हें नदरे मुखार आयल्याशिवाय रावना. आमी भुरगेपणांत हें सगळे पळयला.

आमी सगळीं भुरगीं सांजेवेळचीं दोंगराार वतालीं. थंयच्या बोरांच्या झाडाचेर चडून आमच्यापैकीच एकलो झाड हालैतालो पिकिल्लीं बोरां टपाटप सकयल पडटालीं. तीं वेंचून खावपाक एक निर्मळ आनंद मेळटालो. त्यावेळार आयचेभशेन तीं धुवन बी खावपाक जाय हें कोणाच्याच लक्षान येनाशिल्लें. चारां, चुन्नां, काण्णां, कणेरां, जांबळां, चिंचेबोटां हांचोय आमी आस्वाद घेतालींच. चुन्नां बी काडटना हाताक कांटे लागताले रगत येतालें पूण पर्वा कोण करता ? आज हो रानमेवो आमी विकतो घेतात पूण त्या वेळावयली आपणें लुटिल्ल्या रानमेव्याची रूच ती वेगळीच.

खाजनांतल्या रेब्यांत न्हंयचे देगेर आंकूर मेळटात. थंय आशिल्ल्या झाडांक चिपां लागतात. थंयच्या शेतांच्या मेरांनी वचून उभे रावचें. पांचवें-पांचवें शेत पयसमेरेन पातळिल्लें शेत दोळयांक थंडाय दिता. एकाच पांचव्या रंगांत कितल्यो वेगवेगळो छटा आसतात, हें नदरेत भरल्याशिवाय रावना. वारें येतकच शेत जें सकळवटा तेन्ना एक काव्यमय वातावरण तयार जाता. हांगा थोडे लोक उशेल रोयतात. उशेलाक उदक मात भरपूर जाय आसता. पयलीं शेतांत रांदनीचेर व्हडल्यो-व्हडल्यो कायली दवरून गॉड तयार करताले. पातळ स्वरूपांत गॉड आसता तेन्ना ताका काकय म्हण्टात. घट्ट स्वरूपांतलें गॉड थंय गॉडच्यो ढेपी तयार करून दवरताले. येतल्या वेतल्यांक लिंबू बी घालून उसाचो रोस पियेवपाक मेळटालो. आज सगल्या उशेलांतलो ऊस साखर कारखान्यांत वता.

गोंयांत जाग्याकणकर्णी शेतांत कणगां, वांयगीं, भेंडे, दुदी, विरवीर, तांबडी भाजी, मुळो बी भरपूर प्रमाणांत रोयतात. ह्या भाज्यांची रूच आगळी! बारीक-मोठे अळसांदे, मेरुले, चंवळयो ह्योय वस्तू हांगा मळटात. गोंयाभायले लोक मापशेंच्या शुक्रारच्या बाजारांतल्यान अळसांदे, गांवठी आमटाण, भिंडांचीं सोलां, मेरुले तेफळां, भिंडांचें आगळ, माडयो अशो साबार वस्तू घेवन वतात.

गोंयची व्हडली परब म्हणल्यार चवथ. त्यावेळार लोक लाडु, नेवऱ्यो मोदक करून गणपतीची वाट पळतात. कोणागेर दीड दीस, कोणागेर पांच दीस, कोणागेर अकरा तर कोणागेर एकवीस दीस गणपती दवरून पुजा करतात. चवथीक साबार जिनसांबरोबर पांचखाजी आनी तेफळां घालून केल्लें खतखतें म्हणल्यार एक पर्वणीच आनी पंचमी दिसा नव्यांची म्हणजे नव्या कणसाचो पायस करतात. पुरणाच्या नेवऱ्यो असतातच.

श्रावण म्हयन्यांत गोंयचें सैम फुलून येता. रस्त्यार दोनय वाटांनी पांचव्याचार झाडांभितर शेरवडाच्या धव्या पानांच्या आनी तांबड्या माणकुल्या फुलांच्या सुंदरकायेन भर घाल्ली आसता. हीं शेरवडाचीं पानां बायलां आयतार पूजताना मुद्दामच वापरतात. ह्या म्हयन्यांत नागपंचम, गोकुळाश्टम, सुतां पुनव ह्योय परबो लोक मोठया दबाज्यान मनयतात. ह्या म्हयन्यात लोकांचे देवभक्तीक ओतो येता.

गोंयचो किरिस्तांव लोक नातलां वेळार बिबिंका, दोदोल, दोश, कलकल, नेवऱ्यो बी मोठे उमेदीन करतात. मुसलमान लोक ईदा वेळार शिरखुर्मा करतात. सगळा धर्माचे लोक हांगा मिळून-मिसळून रावतात.

आमच्या गोंयचें एक आकर्षण म्हणल्यार देवळां आनी चर्चा. श्री मंगेश देवस्थान मंगेशी, श्री रामनाथ देवस्थान रामनाथी, श्री शांतादुर्गा देवस्थान कवळें, श्री महालसा नारायणी देवस्थान मार्दोळ, श्री दामोदर देवस्थान  जांबावले, श्री कामाक्षी देवस्थान शिरोडा, श्री लईराई देवस्थान शिरगांव, श्री बोडगेश्वर देवस्थान मापशें, श्री दत्त मंदीर सांखळे, श्री नरासिंह देवस्थान वेलंगा, श्री विमलेश्वर देवस्थान रिवणा, अशीं कितलींशींच देवळां पर्यटकांक भूल घालतात. गोंयाभायर आशिल्ल्या कितल्याशाच लोकांचे कुलदेव गोंयांत आसात. ते दर वर्सा आपल्या कुलदेवाचें दर्शन घेवपाक गोंयांत येतात. ओल्ड गोवा हांगा आशिल्लीबॉम जिसस बॅसिलिका चर्च ही आख्ख्या जगांत फामाद आसा. थंय आशिल्ल्या सेंट फ्रांसीस झेवियर हांच्या कुडीचें दर धा वर्सांनी लोकांखातीर दर्शन आसता. तें घेवपाक जगभरांतले लोक हांगा भेट दितात.

गोंयचें आनी एक मुखेल आकर्षण म्हणल्यार दर्यादेगो. मिरामार, कळंगूट, बागा, कोलवा, माजोर्डा, हणजुणा, वजऱ्या, बाणावले, पाळोलें, अशो कितल्योशोच दर्यादेगो आसात. दर वर्सा हजारांचे संख्येन पर्यटक मोठे उमेदीन देवळां चर्चांक भेट दितात तेचबरोबर दर्यादेगांनी भोंवन आपली मनरिजवण करतात.

गोंयचे लोक नुस्तेभक्त. नुस्त्याच्या वासाक कोंकणी मनीस ओडटा. थोड्या खारवी लोकांकडे व्हडलीं-व्हडलीं नुस्त्याचीं जाळीं आसतात तांतून ते नुस्तें धरतात आनी आपली उपजिविका चलयतात. थोडे लोक मजेखातीर गरयतात तांच्यो नुस्तें धरपाच्यो वेगवेगळो पद्धती आसतात. थोडे लोक न्हंयांनी देंवन तिसऱ्यो, खुबे, कोणोचो काडटात. थोडे लोक खडपांतलीं कालवां काडून विकतात. केन्नाकेन्नाय तांकां शिणाण्योय मेळटात. हालींसारक काय लोक बोटी घेवन नुस्तें मारुंक वतात. पावसांत थोडेच दीस ह्यो बोटी बंद आसतात तेन्ना हांगा घराघरांनी खायाचो पुरुमेंत आसता.

गोंयान देशाक आजमेरेन खूब कलाकार दिल्यात. खाप्रुमाम पर्वतकर, दिनानाथ मंगेशकर, लता मंगेशकर, उषा मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, आशा भोसले, पं. जितेंद्र अभिषेकी, गान तपस्विनी मोगूबाई कुर्डिकर, गानसरस्वती किशोरी आमोणकर, श्री दामू केंकरे, रामदास कामत, प्रभाकर कारेकर, सुदेश भोसले, तुळशीदास बोरकर, तुकाराम फोंडेकर, अजीत कडकडे अशा कितल्याशाच फांकिवंत कलाकारांचीं नांवां घेवं येतात. हालींसारक नवे-नवे कलाकारच आपलीं नांवां वयर काडूं लागल्यात.

गोंयांतले नामनेचे कवी आनी लेखक म्हणून शणै गोंयबाब, बा. भ. बोरकर, मनोहरराय सरदेसाय, लक्ष्मणराव सरदेसाय, रवींद्र केळेकार, दामोदर मावजो, महाबळेश्वर सैल, पुंडलीक नायक, रमेश वेळुस्कर हांचीं नांवां प्रामुख्यान घेवं येतात.

गोंयांक 'परशुराम भुमीठ म्हणून वळखतात. गोंयची परंपरा, लोकसंस्कृती आनी लोककला ही आमची आस्मिताय. तें आमचें दायज. गोंयांत फुगड्यो, धालो, घोडेमोडणी, रणमालें, जागर, शिगमो, वीरभद्र, कुणबी नाच, देखणी, दिवली नाच, गोफ, मुसळ नाच अशा वेगवेगळा लोककलांचे आनी लोकवेदाचे प्रकार अजूनय गांवगिऱ्या वाठारांनी आमकां पळोवपाक मेळटा. म्हणी, उखाणी हे सगळे लोकसाहित्याचे प्रकार आनी लोकजिविताचे हारशे आसात. गोंयांत 'शिगमो' हो उत्सव मोठ्या दबाज्यान मनयतात.

गोंयचें वर्णन करीत तितलें थोडेंच. गोंयची सैमीक सोबीतकाय भोव गिरेस्त आसा. हें ल्हानशें माणकुलें गोंय सगळा संवसारभर गाजता. गोंयची सोबीतकाय सगल्या जगार परजळटा. ह्यावेळार म्हाका एके कवितेच्यो कांय वळी हांगा याद जातात:

'हिऱ्या (Hirya) माणकांचें, भांगरा-रुप्याचें माणकुलें गोंय हें  
पांचव्या रानांचें, तांबडे मातयेचें आमगेलें गोंय हें  
कोलवें, मिरामार बाग कळगुटे नुस्त्या दर्याचे  
रेवेंत बसून रंग पळोवचे बुडत्या सूर्याचे  
म्होंवाळ फळांची वखदी रुखांची गर्दी कुळागरांत  
आंब्या पणसांची वासाळ फुलांची सावळी दारादारांत.'  
अशें हें सुंदर सोबीत गोंय सगलयांकच भावता.

# ‘गोमंत तरंग’ प्रथम अंक प्रकाशन सोहळा

पद्मश्री आणि महाराष्ट्र भूषण माननीय श्री. अशोक सराफ आणि विख्यात अभिनेत्री श्रीमती निवेदिता सराफ यांच्या शुभहस्ते दिमाखात संपन्न.

(गुरुवार, १९ मार्च २०२६ | दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले, मुंबई)

**सोहळयातील काही अविस्मरणीय क्षणचित्रे**

संस्थेच्या नव्या “सुभेदार गेस्ट हाऊस” या नाटकाच्या २५ व्या रौप्यमहोत्सवी प्रयोगावेळी ‘गोमंत तरंग’ या ऑनलाईन त्रैमासिकाच्या प्रथम अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले.














## आदरांजली

**विजया मेहता (बाई) (१९३४–२०२६)**



भारतीय रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीला आपल्या अद्वितीय दिग्दर्शनाने व अभिनयाने जागतिक ओळख मिळवून देणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी, राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या (NSD) माजी अध्यक्षा आदरणीय विजया मेहता यांचे वयाच्या ९२व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी आणि भारतीय रंगभूमीवरील एका सुवर्णयुगाचा अंत झाला आहे.

विजयाबाईंना मराठी नाट्यसृष्टीत 'बाई' या आदरयुक्त नावाने ओळखले जाई. १९६० च्या दशकात त्यांनी 'रंगायन' या संस्थेची स्थापना करून प्रायोगिक रंगभूमीची चळवळ सुरू केली. त्यांच्या नाटकातील शिस्त, अभ्यासू दिग्दर्शन आणि संवेदनशील मार्गदर्शनातून अनेक दिग्गज कलाकार घडले.

'धि गोवा हिंदु असोसिएशन' च्या नाट्यपरंपरेत विजयाबाईंचे योगदान ऐतिहासिक आणि अविस्मरणीय आहे.

"नाट्यसंसारातील माझी सहचारी नाट्यसंस्था म्हणजे गोवा हिंदु असोसिएशन," असे त्या प्रेमाने म्हणत असत. १९७३ साली सुरू झालेला त्यांचा संस्थेशी असलेला संबंध अखेरपर्यंत केवळ टिकून राहिला नाही, तर काळानुरूप अधिक दृढ आणि समृद्ध होत गेला. १९७३ साली 'संध्याछाया' या नाटकासाठी श्री. दामू केंकरे यांनी त्यांना संस्थेतर्फे निमंत्रित केले आणि तेथूनच त्यांचा संस्थेशी जिव्हाळ्याचा संबंध सुरू झाला. संस्थेसोबत त्यांनी अभिनेत्री आणि दिग्दर्शिका या दोन्ही भूमिका समर्थपणे पार पाडत संस्थेच्या नाट्यपरंपरेला आधुनिक आणि कलात्मक दिशा दिली. १९७३ साली जयवंत दळवी लिखित व माधव वाटवे दिग्दर्शित 'संध्याछाया' या नाटकात त्यांनी भूमिका साकारली. या नाटकाचे मराठी व हिंदी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रयोग झाले.

१९७४ साली वसंत कानेटकर लिखित व दामू केंकरे दिग्दर्शित 'अखेरचा सवाल' या नाटकात त्यांनी भूमिका केली. १९७७ साली 'बॅरिस्टर' या नाटकात त्यांनी दिग्दर्शन आणि अभिनय या दोन्ही जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. १९७९ साली त्यांनी 'अभिज्ञान शाकुंतलम' या नाटकाचे दिग्दर्शन केले. या नाटकाचे १९८५ मध्ये हिंदी भाषेतही प्रयोग झाले. पूर्व जर्मनी आणि भारत सरकार यांच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक करारांतर्गत या नाटकाचे अनेक प्रयोग भारताबरोबरच पूर्व जर्मनी व युरोपमध्ये जर्मन भाषेतही सादर करण्यात आले. या यशस्वी प्रवासात गोवा हिंदु असोसिएशनचा मोठा आधार लाभल्याचा उल्लेख त्यांनी स्वत: आपल्या लेखात केला आहे. १९८३ साली त्यांनी गिरीश कर्नाड लिखित 'हयवदन' या संस्थेच्या नाटकाचे दिग्दर्शन केले.

गोवा हिंदु असोसिएशनने आपल्या वर्धापन दिनानिमित्त २०२३ साली संस्थेचा मानाचा मास्टर दत्ताराम पुरस्कार प्रदान करून त्यांचा गौरव केला होता.

त्यांना पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कालिदास सन्मान, नाट्यदर्पण पुरस्कार, विष्णूदास भावे सुवर्णपदक, महाराष्ट्र शासनाचा नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार, चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार तसेच २०१८ मधील META Lifetime Achievement Award यांसह अनेक प्रतिष्ठेचे सन्मान प्राप्त झाले होते. अलीकडेच त्यांना Aditya Vikram Birla Kala Shikhar Puraskar हाही मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

# आदरांजली

प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीचा सुवर्णमध्य साधणाऱ्या, 'नाटकाचे चालते-बोलते विद्यापीठ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महान दिग्दर्शिकेला 'गोमंत तरंग' आणि 'धि गोवा हिंदु असोसिएशन' परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

## डॉ. जयंत विष्णू नारळीकर (१९३८ – २०२५)



धि गोवा हिंदु असोसिएशनशी स्नेहबंध जपणारे जागतिक कीर्तीचे खगोल भौतिकशास्त्रज्ञ, ज्येष्ठ साहित्यिक आणि विज्ञाननिष्ठ विचारवंत डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांच्या निधनाने विज्ञान, साहित्य आणि बौद्धिक विश्वाची मोठी हानी झाली.

'हॉयल-नारळीकर' सिद्धांताचे जनक तसेच पुण्यातील 'आयुका' (IUCAA) संस्थेचे संस्थापक संचालक म्हणून त्यांनी भारतीय विज्ञानविश्वाला अमूल्य योगदान दिले. विज्ञानकथा, लेखन आणि व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी मराठी साहित्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. 'पद्मविभूषण', 'महाराष्ट्र भूषण' आणि 'साहित्य अकादमी' पुरस्कारांनी सन्मानित या ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वाने ज्ञान आणि विज्ञानाचा दीप सतत प्रज्वलित ठेवला.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वतीने तसेच 'गोमंत तरंग' परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

## आशा भोसले (१९३३-२०२६)



भारतीय संगीतविश्वाला आपल्या स्वरांनी समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले देत यांच्या निधनाने एक अख्खे सुरेल पर्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेली सात दशके आपल्या वैशिष्टयपूर्ण चैतन्यमय आणि भावस्पर्शी गायकीने त्यांनी असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

विविध भाषांमध्ये हजारो गाणी गाऊन त्यांनी भारतीय संगीताला जागतिक स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या आवाजातील जादूने प्रेम, विरह, आनंद आणि जीवनातील असंख्य भावनांना सुरांचे अजरामर रूप दिले. त्यामुळेच अनेक पिढ्यांच्या सांगीतिक स्मृतींमध्ये त्यांचे स्थान सदैव अढळ राहिले.

'दादासाहेब फाळके पुरस्कार', 'पद्मविभूषण' यांसारख्या सर्वोच्च सन्मानांनी गौरविण्यात आलेल्या आशाताईंच्या निधनाने भारतीय संगीतविश्वातील एक तेजस्वी स्वर कायमचा हरपला आहे. मात्र त्यांच्या अजरामर गीतांमधून त्यांचे स्वर कायम रसिकांच्या हृदयात घुमत राहतील.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वतीने तसेच 'गोमंत तरंग' परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

# आदरांजली

**प्रसाद सावकार** (१९२८ – २०२६)



मराठी संगीत रंगभूमीला आपल्या प्रदीर्घ, निरंतर आणि तपस्वी सेवेने समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ गायक-नटांच्या मांदियाळीतील अखेरचा दुवा, पद्मश्री पं. प्रसाद सावकार यांच्या निधनाने एक समृद्ध नाट्ययुग काळाच्या पडद्याआड गेले आहे. वयाच्या ९८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अवघ्या पाचव्या वर्षी रंगभूमीवर पदार्पण करणाऱ्या प्रसादजींनी तब्बल आठ दशकांहून अधिक काळ आपल्या अद्वितीय कलेने असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

१९६० ते १९७० च्या दशकात मराठी संगीत रंगभूमीला पुनश्च वैभव प्राप्त करून देण्यात आणि तिच्या पुनरुज्जीवनात त्यांचा सिंहाचा वाटा होता. ग्वाल्हेर, जयपूर आणि किराणा घराण्यांच्या गायकीचे सखोल ज्ञान, स्वच्छ व शुद्ध वाणी , तसेच भरदार आणि श्रवणीय आवाज यांच्या बळावर त्यांनी मराठी संगीत रंगभूमीला नवी चेतना दिली.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या संगीत नाट्य प्रवासाशी त्यांचे अतूट आणि जिव्हाळयाचे नाते होते.

'सुवर्णतुला' 'संशयकल्लोळ', 'सौभद्र' ते 'कट्यार काळजात घुसली' 'मंदार माला' यांसारख्या अजरामर नाटकांमधून त्यांनी साकारलेल्या भूमिका रसिकांच्या स्मरणात कायम राहतील. 'पंडितराज जगन्नाथ' या नाटकातील "जय गंगे भागीरथी" हे त्यांचे अजरामर नाट्यपद मराठी संगीत रंगभूमीच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरले आहे.

दिल्लीतील एका प्रयोगानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी दिलेली उत्स्फूर्त शाबासकी हा आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा. नागरी सन्मान असल्याचे ते आवर्जून सांगत असत.

अफाट कीर्ती, असामान्य यश आणि असंख्य पुरस्कार लाभूनही ते अत्यंत सुस्वभावी, निगर्वी, विनम्र आणि सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले गेले.

भारत सरकारतर्फे 'पद्मश्री' पुरस्काराने तसेच महाराष्ट्र आणि गोमंतकातील अनेक सर्वोच्च सन्मानांनी गौरविण्यात आलेल्या सावकार बुवांच्या निधनाने भारतीय नाट्य व संगीतविश्वातील एक तेजस्वी सूर कायमचा हरपला आहे. त्यांच्या कलेचा वारसा आणि स्वरांची समृद्ध परंपरा भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वतीने तसेच 'गोमंत तरंग' परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

# आदरांजली



## सुमन कल्याणपूर
(१९३७– २०२६)

भारतीय संगीतविश्वाला आपल्या अत्यंत सुश्राव्य, भावमधूर आणि अभिजात स्वरांनी समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने स्वरांचे एक सात्त्विक आणि अलौकिक पर्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. पाच दशकांहून अधिक काळ आपल्या मधुर, भावस्पर्शी आणि रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरांनी त्यांनी मराठी व हिंदी चित्रपटसंगीत तसेच भावगीतविश्व समृद्ध केले. भक्तीरस, शृंगार आणि विरहाच्या विविध भावभावना आपल्या सुरांच्या जादूने अजरामर करत त्यांनी पिढ्यान्पिढ्यांच्या सांगीतिक स्मृतींमध्ये आपले स्थान अढळ ठेवले. 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित सुमनताईंच्या जाण्याने संगीत क्षेत्रातील एक शांत, संयमी आणि दैवी सूर हरपला आहे. त्यांच्या स्वरांची माधुरी आणि सांगीतिक वारसा रसिकांच्या हृदयात सदैव जिवंत राहील.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वतीने तसेच 'गोमंत तरंग' परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.



## पं. चंद्रकांत लिमये
(१९५१ – २०२६)

मराठी संगीत रंगभूमीचा एक देदीप्यमान आणि बुलंद आवाज पंडित चंद्रकांत लिमये यांच्या निधनाने कायमचा शांत झाला आहे. स्वरराज पं. वसंतराव देशपांडे यांच्या गायकीचा अधिकृत आणि खंदा वारसा समर्थपणे पुढे नेणारे ते पट्टशिष्य होते. 'कट्यार काळजात घुसली' या अजरामर नाटकात त्यांनी साकारलेली खाँसाहेबांची भूमिका आणि त्यांची प्रभावी गायकी ज्या ताकदीने रंगमंचावर जिवंत राहिली, तो इतिहास संगीत रसिक कधीही विसरू शकणार नाहीत. केवळ स्वत:च्या मैफली गाजविण्यावर समाधान न मानता, 'वसंतराव देशपांडे संगीत सभा' या संस्थेच्या माध्यमातून नव्या पिढीतील कलाकारांना शास्त्रीय संगीताचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे थोर कार्य त्यांनी केले.

आपल्या प्रदीर्घ सांगीतिक कारकिर्दीत त्यांना 'सूर संसद' संस्थेचा प्रतिष्ठेचा 'सूरमणी' पुरस्कार, शास्त्रीय संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल केंद्र सरकारची 'सीनियर फेलोशिप', तसेच 'महाराष्ट्र वैभव' पुरस्कारासह अनेक मानाचे सन्मान प्राप्त झाले. ठाण्यातील सिद्धकला संगीत अकादमीतर्फेही त्यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

आपल्या स्वरांनी देश-विदेशांतील रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या ऋषितुल्य कलावंताच्या जाण्याने संगीत विश्वाची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वतीने तसेच 'गोमंत तरंग' परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

**डॉ. आनंद नाडकर्णी**



ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ, ख्यातनाम लेखक आणि ‘आयपीएच’ (IPH) संस्थेचे संस्थापक डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या निधनाने वैद्यकीय, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्राची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे.

मानसिक आरोग्याचा विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आणि ’वेध’सारख्या उपक्रमांतून तरुण पिढीला दिशा देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. वैद्यकीय क्षेत्रासोबतच मराठी साहित्य आणि रंगभूमीवर त्यांचे निस्सीम प्रेम होते. त्यांच्या अनेक पुस्तकांनी, नाटकांनी आणि व्याख्यानांनी लाखो मनांना जगण्याची नवी उमेद दिली.’माणसाला ‘माणूस’ म्हणून समृद्ध करणारा एक मार्गदर्शक आज आपल्यातून निघून गेला आहे.

धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वतीने तसेच ‘गोमंत तरंग’ परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

## RAHVATACH NAAHI TAR GHADAVNAAR kasa kaay !!!! Loka aani paristithi Ghadavthay Tumhala, Tuuch tujhya JIVANACHA SHILPAKAAR hey PHAKT DIALOGUE BAAZI Zhaali !!!! Kashya huun, Kasa Kaay ???? arre ACCESS AAHE KA ???????


**– Hari Kotian**
Communication Course Leaders
At Landmark Worldwide.
Partner-DP's Fast food restaurant
(Dadar west, Matunga East, Mumbai)
Wok Hei , Pan - Asian , Chinese. (Chembur)




'What you cannot let 'BE' does not let you 'BE', What you can let 'BE' , allows you to 'BE', Free to 'BE', Free to Act' , If I can Allow myself the space to be the way 'I am' and actually allow myself to fully experience (will require Compassion and Generosity) the standards, morals, ethics I lay upon myself (given my conditioning myself or the society laying it upon me.) and what ensues is my laying it on those who interact with me (mostly unconsciously).

The Maliwada School of Human Development has a very different take on Integrity (AKHAND - AKHANDATHA- INTEGRATED) not broken, unimpaired in anyway-not mired in ethics, morality, standards and ideals. Oriented around the INTENT of the game, flowing with Ease - Grace - velocity with zero resistance. (Look this up on Google- Profound Humanness- Integrity- Maliwada School of Human Developmenpe).

The rituals and practices in our culture- Namaste - I am doing - NAMAN (Bowing) to the divinity in you and me. It signifies Listening and speaking from 'Ahm-Bhramasmi', where there is no one out there, It was always all yours- (your MAAP - DAND). it's all your creation, there is no-where to rush to, make happen something, you can intentionally serve the intent- with your daughter, your mother, your customer, your institution, organisation , society, humanity. This is coming in to life INCLUSIVE, not separate, responsible for the way all of 'IT', the way it is.

Is it really possible to 'Listen' (Call forth, evoke, elicit) to create v/s react, Resolve v/s Harden views, create NEWLY every time v/s discussing and describing profound or boring concepts and insights which do not move anything in reality. Tepid, lifeless, familiar and predictable listening & speaking v/s surprise, wonder and inspiring conversations- inclusive, not separate. I am not talking optimistic conversations, but authentically speaking and listening possible worlds which are REALLY real possibilities, not some positive, motivational pep-talk. Knowing yourself in communication as someone who relates to oneself from saying YES and meaning YES and saying NO and meaning NO, Not from any reaction but from a place of having full freedom to let 'be' (allow space for, not handle or fix)- my thoughts, feelings, emotions, assessments, prejudices, rationale and "CHOOSING" the declaration of yes/no I am making freely not from some "HAVE TO or SHOULD", also naturally having the grace to listen for the same from others, calling forth an authentic YES/NO from people, knowing them as capable of doing so.

While conducting the Communication Courses in Seoul, Bangkok, Sydney and all over India, I have often quoted and translated a famous saying by Sant Tukaram: TUKA MHANNE - UGHI RAHAAVE, ZE ZE HOIL TE TE PAHAAVE, THEVILI ANANTE, TAISECHI RAHAAVE, CHITHA ASUDYAVE SAMADHAANI.

From here, this context, why speak, why listen - Zar CHITHA SAMADHAANI AAHE aani ANANTACHA Anubhav aah tar mag- KAAY? Anhi Kashya saati Aiktoaahes ? atha kaay rahila

bolaila- from here, the ONLY reason for listening and speaking on the planet is CREATION. ( Kaay Ghadavto aahes, Kashya chya seveth aikat/ bolath aahes).

I say the context is decisive, "Sandharb Nirnayak hai". In Communication, there's an element of Rocketry- where you come from does determines where you land, two degrees tilt in take-off will result in a mile off-trajectory, and a few hundred miles off- target.

There's a world of Listening and Speaking to Master- inside listening and speaking consistently evoking, eliciting, calling forth a created future- not fettered and shaped by the past, circumstances or people., I led the Communication Curriculum for 15 years at Landmark Worldwide globally. This my 34th year of conducting Courses and being a part of Landmark Worldwide. I do so because I love that "it" is truly all malleable and ductile. ALL of "it" - including this thing that I refer to as "I".

# Stories in Stone: Part 1

## Mythology in Hoysala Sculptures

BY
**PRAJAKTI PAI**
www.prajakti.blog



I had visited two temples made in the Hoysala Style of Architecture back in 2018, and I was awestruck by their sculptural, artistic, architectural, and narrative richness. The narrative content of these temples, as most Indian Temples, have their sources in mythology.

Through this article, I hope to bring out a few such stories from the Indian Purakatha Tradition that are chiselled out of the soapstone of the HoysaleshwaraTemple at Halebidu in Karnataka, situated about 200 km from Bengaluru.

### SACRED ENSEMBLE OF HOYSALA

The HoysalaTemples of Halebidu and Belur, now part of UNESCO's Sacred Ensembles of the Hoysala, stand as masterpieces of medieval Karnataka's artistic legacy. Built during the reign of the Hoysala dynasty, these temple complexes are renowned for their exquisite craftsmanship, architectural innovation, andnarrative sculptures.

### Site:Hoysaleshwara Temple of Halebidu, Karnataka

The little village ofHalebidu was formerly known as Dorasamudra-a name linked to a large water-body built by the Rashtrakutas. Here at Halebidu, is situated, the Hoysaleshwara Templethat was commissioned around 1121 CE by Ketamalla, an officer under King Vishnuvardhana.

This temple is dedicated to Shiva. It features twin sanctums-one (symbolically) for the king (Hoysaleshwara) and one for his queen (Shantaleshwara)-each with its own vestibule, mandapa, and Nandi pavilion. The temple's name, Hoysaleshwara or God of Hoysala, reflects its royal patronage.

Thearchitectural components include a raised adhishtana (plinth), a jagati for circumambulation, and richly carved sculptural friezes featuring elephants, lions, horses, and mythological creatures. Above these arefigurative sculptures of deities, dancers, and celestial beings that are framed within devakoshtha are sculpted in high-relief. The upper levels of the temple exterior, showcase temple towers, lathe-turned pillars, bracketed eaves, and perforated stone screens that filter sunlight into the sanctum.

### STORIES ETCHED IN STONE

### Presence of Mythology in Temple Architecture

The temple is abundant insculptures. These sculptures are fine, and most of them are in high-relief. They are chiselled from green schist (soapstone), a material prized for its softness during carving and its durability over time.

### Reading an Indian Temple

To be able to 'look' at Temple Architecture of India, one needs to be able to 'read'its many elements. Some of these elements are; it's cultural contexts, the architectural styles and identities it displays, the rich layers of symbolism, and various stories that it narrates. Temples are religious spaces, and have an important role to play in society. They serve as a space for worship, for performing rituals and ceremonies, and for devotees to connect with the divine.Though it is believed in spirituality, that the divine is formless (nirguna); in religion, the divine is manifested in various physical forms. These divine forms (saguna)have various qualities, attributes, and formal features. Devotional practices in a temple space are directly intended towards such personifications of the divine. These forms aredeities of many kinds, like devas, devis, and the many divine, and semi-divine beings.These deities have many attributes, qualities, and stories that are associated with them.

## The Indian Purakatha Tradition

Purakatha (पुराकथा) means 'old legend' or 'old tale' or 'tale of the past ages'. This is a rich practice of storytelling. It also includes religious discourses that are based on myths, ancient narratives, legends, and histories. The Indian Purakatha is a living tradition and continues to be transmitted through oral, written, textual, scriptural, and artistic mediums. It grows and flourishes through the generations offering perspectives and stories, morals, values, and historical and cultural contexts to the society.

It sources are the Itihasa, Purana, Veda, and epic poems like the Ramayana and the Mahabharata. Religious discourses, local myths and legends, fables and folk narratives; also get added to it, making the Indian Purakatha Tradition rich with diversity. This is not a passive tradition, but an active one. It expanded on the Vedas, Epics and the myths present within them.

Myths are traditional tales, stories that speak of ancient cultures, modes of explaining natural phenomenon; and myths, most often have supernatural and divine beings as their characters. Mythologyis a collection of such stories and a systematic study of myths.

## Mythology x Temple Architecture

The sculptural fabric of most old Indian Temples are woven with stories from the Indian Purakatha Tradition or from the Indian mythological tradition. Indian Temple Architecture is abundant with images of deities. Myths provide the narrative content for architectural sculptors working on the temple structure. The output of these are beautiful in themselves, but to the more well-versed viewers, they provide more layered information.

Myths of a religious nature shape the depiction of Gods and Goddesses, and the sculpted stories. Myths have various symbols, icons and motifs that are encoded within them.They are rich in iconography. The understanding of this, brings out the sculpture'sdeeper meaning.

Through the Indian Temple, mythological stories, religious discourses, and myths became accessible and available to the uninitiated. The temple space got myths to the lay person by democratizing religious understanding and making complex theological concepts digestible, through simple visual storytelling.

To Be Continue...



*Image 1: Sculptural frieze typical of the Hoysala Style (Photograph by Prajakti, 2018)*



# Where is God??-

– **Adv. Mahadji S. Prabhudesai**



There was an interesting movie of Aamir Khan called 'PK'. Amongst the various issues the movie highlighted, was that in the name of God how commercial activities are taking place & have evolved in a steady business. Though the movie tickled your funny bones but it had a thought provoking angle to it...To connect to God or to pray to God do you require any medium??

In the pursuit of God Rushis, Munis, use to do “Tapascharya” (Penance). Well it is said that in “Satya Yuga” sages had to do “Tapascharya” (Penance) for lakhs of years in pursuit of god; in “Treta Yuga” it came down to thousand years and in “Dwapar Yuga” it further came down to 100 years. It is believed in the present Yug i.e the Kaliyug you can get connected to god just with 'Dhyan' and 'Namsmaran'.

If you believe in one God who is the creator of this universe, who is the controller of this universe and who has the capacity to destroy the universe then you can pray to him from wherever you are. Irrespective of the time & place; of course you should be able to connect to God with utmost pure mind without any distraction. “Man” (Mind ) should be clean rather than the “Tan” (Body). When you connect to him and when you pray to him you should be engrossed, absorbed that nobody is between you & the God. That prayer reaches to him faster than any other form or medium of prayer. Prayer made to him with utmost sanctity, honesty, and devotion reaches to him faster than Vrat/Vaikalya and other forms of Pujas.

Everyone in the world at least one point of time must have faced difficult situation in there life. That is all part of “Pralabhdh” , “Sanchit”. Then you require some solace. Then you seek advice from your near and dear ones. At that point of time you do whatever He/She advices out of fear or some kind of false hope. Things which are destined to happen will anyway happen and things that are not destined to happen will not happen no matter how much you try.

Our Vedas are purely based on science. The stories of puranas has the “Guhya Arth” & only a right Guru (Preacher) can give you the “Ghuyadnyan” (means the moral of the story or essence of a lesson). Praying to your parents is said to be the highest form of prayer; often relegated by us by not realizing the importance of it. Lord Ganesha is prayed first in every Puja. Why ?? Everyone is aware that while competing with his brother Karthikey as to who will finish the round of the universe first, Karthikey went to take round of the universe while Ganesha did Pradakshana (round) around Shiva-Parvati, (his parents ) which signified equivalent to taking round of the universe. The significance is pray to your parents first, they are your Gods.

A friend, relative, who helps you in the hour of your need, crisis is your God. A Doctor who saves your life is your God. For that matter even a stranger who comes with a helping hand in a situation of an accident is a God.
Ga. Di. Madgulkar (the famous Marathi Writer/Poet) has written this very meaningful Bhaktigeet

देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी
देव चोरुन नेईल, अशी कोणाची पुण्याई ?
देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी

देव अंतरात नांदे, देव दाही दिशी कोंदे
देव आभाळी सागरी, देव आहे चराचरी
देव शोधूनिया पाही, देव सर्वाभूतां ठायी
देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी

देव मूर्तीत ना मावे, तीर्थक्षेत्रात ना गावे
देव आपणात आहे, शीर झुकवोनिया पाहे
तुझ्या माझ्या जड देही देव भरुनिया राही
देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी

देव स्वये जगन्नाथ, देव अगाध अनंत
देव सगुण, निर्गुण, देव विश्वाचे कारण
काळ येई, काळ जाई, देव आहे तैसा राही
देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी

This is the true essence of life "Ga Di Madgulkar" not being a saint understood it. God is not in Temple, he is everywhere, he is within you, he is within Him, He cannot be restricted in one Idol.. God is in the Sky, the Sea & everywhere. Try to search him, you will find his presence everywhere in every thing...

**– Adv. Mahadji S. Prabhudesai**
Kakoda, Curchorem-Goa

# To Retire or Not? Insights into the Retirement Sector



To retire or not? Global Background: The answer to this for millions of people depends on the financial resources they have built over their working life span. The efficiency of the Retirement plans that are offered to individuals, is the backbone of the quality of post-retirement lives of the population at large. Countries usually hinge on the common principles and customize the retirement product for their citizens. The approach

over the past two decades in the world is influenced by the historic work published around 1994 by the World Bank, led by Dr. Estelle James released viz. "Averting the Old Age crisis: Policies to Protect the old and promote growth." This report suggested the famous 'Three Pillars" (which is now 5 pillar, pillar essentially means a segment dealing with a specific part of the population) of the old age security system, which Governments should develop and basis which a lot of reform across of the world was and is being undertaken. Most of the reform is concerned with moving the Retirement scheme from

Defined Benefit (DB i.e. fixed quantum is paid out) to Defined Contribution (DC i.e. no fixed benefit quantum but only fixed contribution to the scheme) Chile which was the poster boy of this reform has influenced many models. The 401 k plans in the US are also one of the most known examples of the existent DC plans. Retirement Reform: Indian Context India embarked on this path when the OASIS report (Old age Social and Income security) was released in 2000. This report set the tone for the Indian Pension reform and the subsequent decades saw the establishment of the PFRDA, launch of citizen National Pension system (NPS), rationalisation of the PSU Bank pensions, overview on Civil service pension, outsourcing to Asset managers for managing the assets and much more.

Indian Pension Landscape: Multiple schemes Let us now take a look at the various pension systems in India. Grants: On the non contributory side (from beneficiary point of view), which is essentially called pillar zero in the World bank parlance, there are schemes like the National Old Age Pension (NOAP) designed to support the Below Poverty Line (BPL) population. Occupational Schemes (for those working in formal employment): Large occupational pension schemes are set up under separate acts - Employee Provident Fund (includes the EPS benefit), Coal Mines Provident Fund, Assam Tea Employees Provident Fund et al. There are also Gratuity benefits available to those in employment. The Pension schemes provided by employers are essentially 'firm' level schemes and not governed as misconstrued by many. For the Self Employed: For those who are self employed, there is the erstwhile Public Provident Fund(PPF). The National Pension Scheme (NPS) is the improvised format which was introduced in 2009 and has better scheme features like subscriber's choice on asset class and manager, choice to

switch managers, tighter withdrawal facility to prevent premature leakages to the corpus and extremely low cost. Insurance companies also offer plans, which in many cases is a wrapped solution (combination with insurance). Mutual Funds have also introduced Retirement savings plan. It is evident that the Indian pension ecosystem is complex due to multiple offerings controlled by various agencies which may not have cohesion characteristics.

I now turn to some pointers for investors, the most important stake holder apart from the Asset Manager. Guideposts for Investors: Choose prudently as opportunity costs can be high:

- Investors today now have a palate to choose from.
- They should consider the schemes which have the potential to give them better replacement ratios. (Replacement ratio is the % of your pre-retirement annual income needed to maintain your standard of living after you stop working)

- Most schemes today enjoy EEE regime (meaning they are tax exempt at the time of contribution, accumulation and withdrawal phase) which should be availed of, by the investors. They should also build a strategy outside of their employment benefits, if they are employed. It is extremely important that investors have a different strategy with retirement funds than their usual portfolio.
- The importance of compounding is very pertinent in this type and even a 1% difference over 20-30 years can make significant difference to the corpus. Emphasis on the asset class like equity, that has the potential to maximise returns over longer time periods should be built in with adequate weightages. Relaxation of investment norms to include private markets, commodities et al should be used effectively.
- Investors should also understand if the scheme is assetized or not, whether the Manager managing is well capitalised and regulated. Pension liabilities can drown companies and get Governments into a debt trap. As beneficiaries, one must be vigilant that they aren't a part of a system which looks robust but is on the verge of cracking.
- Indian population today also suffers from the breakdown of traditional support systems of joint families which makes it critical for them to invest responsibly. An early recognition of the need to save for retirement is very critical in today's environment where jobs have become uncertain and cultural habits are changing. Availing professional advice to construct this portfolio can help achieve better outcomes. The intention of this article is to touch upon as many aspects of the retirement system and make readers at large, aware of this very important investing aspect of one's life, as this will determine how sunny the sunset years will be.

**– Nilesh G Hunswadkar**

(Nilesh G Hunswadkar is the Founder of Athang Expressions, Business Consulting firm helping companies from the formation to scaling phases. He has extensive experience in policy and practise, especially in the Asset Management industry and has advised some of the marque names in the industry.)

**May the Gomant Tarang achieve editorial and readership success!**
**With Best Wishes**
**Nilesh G Hunswadkar Founder, Athang Expressions (P) Ltd.**
**Business Consulting I Investment I Arts**

## शुभेच्छा आणि अभिप्राय



गोमंत तरंग प्रकाशित होत आहे ही स्वागतार्ह घटना आहे. संस्थेच्या उद्दिष्टाबरोबरंच संस्थेच्या स्थापनेपासून ज्यांनी या संस्थेला कष्ट करून नावारूपास आणलं त्यांचा परिचयही क्रमाक्रमानं यावा ही अपेक्षा! त्यामुळे तरुण पिढीला माहिती तर मिळेलच पण महत्त्वाचं म्हणजे तरुण पिढीला प्रेरणाही मिळेल. मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा!

**– सुरेश खरे**
नाटककार, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते,
पटकथालेखक आणि मुलाखतकार

(आदरणीय श्री. सुरेश खरे यांनी पहिल्या अंकासाठी पाठविलेला शुभेच्छा संदेश संपादकीय प्रक्रियेदरम्यान अनावधानाने प्रसिद्ध होण्यापासून राहून गेला. त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. त्यांचा तो बहुमूल्य संदेश या अंकात प्रकाशित करीत आहोत.)

◆◆◆◆◆◆



धि गोवा हिंदु असोसिएशन मराठीतील एक जुनी आणि नामांकित संस्था. आमच्या लहानपणापासून या संस्थेची नाटकं पाहतच आम्ही मोठे झालो. नुकतंच या संस्थेने 'गोमंत तरंग' हे ऑनलाइन त्रैमासिक सुरू केलंय. खूप छान वाटलं. हे त्रैमासिक उत्तरोत्तर समृद्ध होत जावो आणि अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचो, ही सदिच्छा. संस्थेच्या या नव्या उपक्रमाला माझ्या खूप खूप शुभेच्छा!

आपला,
**अच्युत पालव**, (पद्मश्री पुरस्काराने सन्मानित)
जागतिक कीर्तीचे सुलेखनकार (कॅलिग्राफर)

◆◆◆◆◆◆



'गोमंत तरंग' धि गोवा हिंदु असोसिएशन. मराठी रंगभूमीवरील एक अत्यंत महत्त्वपूर्ण अशी नाट्य संस्था. ज्या नाट्यसंस्थेने मराठी रंगभूमीला नटसम्राट, मत्सगंधा, रायगडाला जेव्हा जाग येते, अशा एकापेक्षा एक मैलाचा दगड ठरलेली सरस नाटके आणि त्याचबरोबर अत्यंत नावाजलेले रंगकर्मी दिले.

बऱ्याच कालावधी नंतर धि गोवा हिंदु असोसिएशन. या संस्थेचे सुभेदार गेस्ट हाऊस हे नाटक रंगभूमीवर आले. ज्याची निर्मितीही संस्थेच्या आजवरच्या निर्मितीला साजेशी अशीच आहे. या नाटकाच्या रौप्य महोत्सवी प्रयोगाच्या निमित्ताने दीनानाथला विमोचन झालेल्या धि गोवा हिंदु असोसिएशनच्या गोमंत तरंग या त्रैमासिकाच्या विमोचन समारंभाला उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभलं.प्रेक्षागृहातील काही मान्यवरांबरोबर मलाही गोमंत तरंग या मासिकाची आवृत्ती भेट म्हणून देण्यात आली. माझे अत्यंत जवळचे मित्र जे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. मा. सुभाष सराफ हे मासिकाच्या सल्लागार मंडळावर देखील आहेत. संपादक मा. जितेश सावंत, उपसंपादक मा.समीर कामत आणि संपादकीय मंडळामध्ये श्री राजेंद्र पै, ॲडव्होकेट महादजी प्रभुदेसाई, शर्मिला रेडकर, रजनी लोटलीकर आणि श्रीमती रश्मी रश्मी हळर्णकर हे आहेत. गोमंत तरंग ची पहिली आवृत्ती नजरेखालून घालताना लक्षात आलेल्या गोष्टी म्हणजे यात संपादकीय आहे. त्याचबरोबर अध्यक्षांचा संदेश आणि संस्थेची उद्दिष्ट संस्थेचे सामाजिक उपक्रम, शैक्षणिक उपक्रम, सांस्कृतिक उपक्रम याबद्दलची माहिती वाचकांना दिली गेलेली आहे. त्यानंतर विजय केंकरे यांची मुलाखत आहे.या मुलाखतीच्या अनुषंगाने त्यांचे वडील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ रंगकर्मी दामू काका यांचाही उल्लेख आहे. संस्थेच्या १०६ वर्षाच्या प्रवासाचा उहापोह देखील केला गेलेला आहे. छान छायाचित्र आहेत आणि अनेकांच्या शुभेच्छा आहेत. अर्थाती पहिलीच आवृत्ती आहे संपूर्ण मासिकाची मांडणी छान आहे,

रंगसंगती छान आहे, वापरला गेलेला मुद्रांकसाठीचा आपण फॉन्ट म्हणतो तोही छान आहे. त्यामुळे वाचन सुसह्य होत.

मला असं वाटतं की हे त्रैमासिक आहे. पुढील आवृत्ती मध्ये हे रंगभूमीला वाहून घेतलेलं असं मासिक असल्यामुळे त्या तीन महिन्यात आलेल्या कुठल्याही दोन किंवा तीन चांगल्या नाटकांचे परीक्षण त्यात केले जावो. नवीन रंगभूमीवर येऊ घातलेल्या नवीन नाटकांविषयी मग ती व्यावसायिक असतील प्रायोगिक असतील त्याच्याबद्दलची माहिती छान पद्धतीने प्रेक्षकांना देण्यात यावी, रंगभूमीला योगदान दिलेल्या वेगवेगळया रंगकर्मी विषयी माहिती यात्रे मासिकातून देण्यात यावी आणि त्याचबरोबर गोवा हिंदु असोसिएशनचे जे काही भविष्यातील उपक्रम असतील किंवा नजीकच्या काळातील उपक्रम असतील त्याचीही माहिती वाचकांपर्यंत पोहोचावी. त्यासाठी वेगवेगळया लोकांना जर संधी दिली गेली तर विविध लोकांच्या सहभागाने आपल्या या त्रैमासिकाचा प्रचार आणि प्रसार खूप चांगला होईल.

सर्वांना धन्यवाद.

**– श्री. प्रदीप कबरे**
ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक

◆◆◆◆◆◆



नमस्कार,

‘गोमंत तरंग’चा पहिला वहिला अंक खूपच सुरेख निघाला आहे. एखाद्या रोपाला किंवा चिमुकल्या बाळाला मोठं करण्यासाठी जितके परिश्रम करावे लागतात, तितकेच कष्ट एखादं मासिक काढण्यासाठीही घ्यावे लागतात.

अंक चाळला मन:पूर्वक अभिनंदन! संपादकीय अप्रतिम आहे. हा पहिला अंक आहे यावर विश्वास बसणार नाही, इतका सुंदर आहे.

यासाठी तुमच्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन! पुढील यशस्वी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

**– श्यामला पेंडसे**
लेखिका आणि अनुवादक
(कवडसा, True Blue, Chicken Soup for the Soul 1, Chicken Soup for the Soul 2, Night Train at Deoli)

◆◆◆◆◆◆



‘गोमंत तरंग’ चा पहिला वहिला अंक अथ ते इति वाचला.

मा. जितेश सावंत यांच्या संपादकीयातुन या अंकामागची प्रेरणा आणि उद्देश कळला. तर पुढे उपाध्यक्षा श्रीमती निरुपा केणी यांच्या ‘दिव्यत्वाची जेथ प्रचिती’ या लेखमालेच्या पहिल्या भागामधुन शतकभराहुन अधिक काळचा धि गोवा हिंदु असोसिएशनच्या वाटचालीचा पहिला टप्पा समजून घेता आला. मराठी आणि गोमांतकीय सांस्कृतिक चळवळीचा आढावाच यातुन मिळाला.

या अंकाचं प्रमुख आकर्षण असणारी ज्येष्ठ रंगकर्मी विजय केंकरे यांची मुलाखत ही आम्हा सर्व रंगकर्मींना आणि पुढच्या पिढीला अत्यंत मोलाची मार्गदर्शक ठरेल अशी आहे. विजय दादांच्या जडणघडणीचा एक महत्त्वाचा भाग या मुलाखतीतुन जाणून घेता आला.

एकुणच ‘गोमंत तरंगचा’ त्रैमासिकाचा अंक अतिशय नेटका आणि अत्यंत सकस असा आहे. ‘चित्रापेक्षा चौकट मोठी झालेली नाही’ हे महत्त्वाचे वैशिष्टय.

पुढच्या अंकाची प्रतीक्षा आहे.

मा. जितेश सावंत आणि संपुर्ण संपादकीय मंडळास अनेक शुभेच्छा.

आपला स्नेहांकित
**- स्वप्निल राजशेखर**, लेखक आणि अभिनेते



आपल्या मराठी भाषेमध्ये काळाचे भान राखून दर्जेदार अंक सातत्याने काढत राहण्याची आणि त्याविषयी विलक्षण आसक्ती बाळगून काम करत राहण्याची ही धडपड आजच्या काळात दुर्मिळ आणि कौतुकास्पद आहे. खरोखर आपल्या मातृभाषे साठी आणि आपोआपच मायभूमीसाठी शांतपणे पण ठामपणे ठोस असे काहीतरी करण्याचा हा आदर्श वस्तुपाठच आहे. खूप शुभेच्छा!

**– अतुल कहाते**

सुप्रसिद्ध लेखक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे अभ्यासक

महाराष्ट्र साहित्य परिषद ग्रंथकार पुरस्कार विजेते

◆◆◆◆◆◆



गोमंत तरंग या त्रैमासिकाचा पहिला अंक वाचनात आला. बहुरंगी आणि सर्वसमावेशक असा हा अंक अप्रतिम आणि धि गोवा हिंदु असोसिएशनच्या तेजस्वी परंपरेस साजेसा असा आहे.

हे त्रैमासिक सुध्दा शतायुषी व्हावे. जगभरातील मराठी रसिक वाचकाच्या पसंतीस उतरावे ही मनापासून शुभेच्छा! मी स्वत: या त्रैमासिकाचा नियमीत वाचक असेन हे निश्चित. अभिनंदन आणि शुभेच्छा!!

**– अजय कुरणे**

चित्रपट/मालिका दिग्दर्शक

◆◆◆◆◆◆



नमस्कार हांव राजदीप नायक,

धि गोवा हिंदु असोसिएशन चो नवो ऑनलाइन अंक 'गोमंत तरंग' हो प्रकाशित जाता. म्हाजेकडच्यान खूप खूप परबी. धी गोवा हिंदु असोसिएशन हे माझ्या काळजात आसा कारण. ह्या असोसिएशनान म्हाका शिक्षणाच्या वेळार खरीच गरज आसली तेन्ना मदत केल्या. हांव स्कूल शिकतलो तेन्ना धि गोवा हिंदु असोसिएशन ची म्हाका स्कॉलरशिप मेळया. हालीच म्हजे घरकांनिक तांचो नाट्य वावरखातीर पुरस्कार मेळा. आणि तांचेकडचे नाते आणिक घर जाला. आता तांचो हो अंक प्रकाशित जाता तातुन आमच्या गोयकरांची कला, साहित्य एकूण वळख महासागरात म्हणजे पुराय महाराष्ट्र भर पावपक मदत जातली. त्या खातिर आमी तुमच्या उपकारात उरतले. तुमच्या ह्या वावरक लाख लाख सलाम. आणि खूप खूप शुभेच्छा

**– राजदीप नायक**

अभिनेते, नाट्य दिग्दर्शक, निर्माते

◆◆◆◆◆◆



सप्रेम,

'धि गोवा हिंदु असोसिएशन' च्या 'गोमंत तरंग' ह्या त्रैमासिकाची पहिली आवृत्ती वाचली. हा स्तुत्य उपक्रम सुरू केल्याबद्दल, सर्वप्रथम ह्याचे संपादक श्री जितेश सावंत, उपसंपादक श्री समीर कामत, त्याचबरोबरीने श्री. सराफ सर, श्री केंकरे सर, सौ केणी मॅडम आणि धि गोवा हिंदु असोसिएशनच्या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन.

धि गोवा हिंदु असोसिएशन ही नाट्य संस्था म्हणून, अत्यंत दर्जेदार कलाकृती प्रेक्षकांसमोर सादर करण्यासाठी सुप्रसिद्ध आहेच, 'लेकुरे उदंड जाहली' ह्या नाटकामुळे माझे वडील श्री श्रीकांत मोघे आणि 'सुभेदार गेस्ट हाऊस' ह्या नाटकामुळे माझे, धि गोवा हिंदु असोसिएशन. शी एक अतूट नातं निर्माण झालंय. त्याचबरोबरीने संस्थेचे सामाजिक कार्य ही वाखाणण्याजोगे आहे. ह्या कार्यात, हे त्रैमासिक आणखी एक मानाचा तुरा ठरेल ह्यात शंकाच नाही.

संस्थेचा कार्यभार वाहणाऱ्यांचे लेख, ह्या उपक्रमाची गरज आणि आवाका ह्याची पुष्ठी देणारेच होय. आम्हा नाटकवेड्या

मंडळींना विजय केंकरे सरांची मुलाखत म्हणजे जणू पर्वणीच ठरली. पुढे जाऊन प्रदीर्घ मुलाखत आवडेल. गोमंतकाच्या साहित्याचा, कलेचा, इतिहासाचा, संस्कृतीचा, खाद्यसंस्कृतीचा, अमूल्य ठेवींचा भरजरी शेला प्रत्येक त्रैमासिकाद्वारे उलगडत जाईल. ही श्रीमंती जनमानसात, योग्यरित्या पोहोचवणारे 'धि गोवा हिंदु असोसिएशनचे' हात जबाबदार आणि समर्थ आहेतच. सर्वसंपन्न असे हे गोमंतक त्याविषयी जिव्हाळा आणि लोभ आहेच, तो उल्लेखनीय वाचनातून दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो.

शुभेच्छा आणि सदिच्छा निस्सिम प्रेम.

– **शंतनू मोघे,** अभिनेते
चित्रपट, टेलिव्हिजन आणि रंगभूमी

◆◆◆◆◆◆



The Goa Hindu Association is a renowned organisation that I have known since my childhood. Great people have been associated with it, and I am glad to be a part of Subhedar Guesthouse and the organisation. Theatre and articles related to it are always a pleasure to read. Reading Vijay Kenkre's interview is a pleasure. He shares his understanding and experience with humour.

As we move to digital, print magazines are dying out these days. M glad that Goa Hindu Association is releasing a written document for this will stay for posterity.

Best wishes

– **Manva Naik**
(Actress, Producer, and Director)

◆◆◆◆◆◆



धि गोवा हिंदु असोसिएशन ला १०६ वर्षे झाली, संस्था मोठी होण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींचा थोडा का होईना वाटा आहे त्याचं मनापासून अभिनंदन.. यानिमित्ताने गोमंत तरंग ह्या मासिकाची पहिली आवृत्ती निघाली.. याचाही मनस्वी आनंद झाला.. आजपर्यंत गोमंतकीय साहित्य संगीत रंगभूमीचा इतिहास वर्तमान आणि भविष्य यांचा सांगोपांग लेखाजोखा आता वाचकांपर्यंत येईल..

अनेक व्यक्तींची नव्याने ओळख होईल तर अनेक आदर्शवत व्यक्तींचा नव्याने परिचय होईल. यासाठी संपादक जितेश सावंत आणि संपूर्ण टीम चे अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा.

– **श्रीमती स्मिता गवाणकर**
(ज्येष्ठ, अनुभवी निवेदिका आणि सूत्रसंचालिका )

◆◆◆◆◆◆



धि गोवा हिंदु असोसिएशन ने प्रकाशित केलेल्या 'गोमंत तरंग' या त्रैमासिकाची पहिली आवृत्ती वाचनात आली. खूप आवडली. संपादक श्री. जितेश सावंत यांनी या त्रैमासिकाची मांडणी खूप आकर्षक आणि कलात्मक पद्धतीने केली आहे. आजवर धि गोवा हिंदु असोसिएशन ने कला, साहित्य, नाट्य, संस्कृती संवर्धनासाठी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. मनोरंजन विश्वातील माहिती वाचकापर्यंत पोचवण्यासाठी सुरू केलेलं हे त्रैमासिक नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. 'गोमंत तरंग' ला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

– **अजय कांबळे**
लेखक/दिग्दर्शक/अभिनेता

◆◆◆◆◆◆



धि गोवा हिंदु असोसिएशन कला विभाग म्हंटलं की डोळयासमोर येतात त्या अनेक दर्जेदार नाट्य कलाकृती हे वेगळे सांगायला नको, मध्ये काही काळ खंड पडला असला तरी आता नव्या जोमाने "सुभेदार गेस्ट हाउस" हे नाटक घेऊन ते पुन्हा रंगभूमीवर आले आहेत अर्थातच प्रेक्षकांना अजून एक उत्तम अनुभव देण्यासाठी.

मी त्याचा एक भाग आहे याचा आनंद तर आहेच, पण आणखी एक आनंद म्हणजे त्यांनी सुरू केलेल "गोमंत तरंग" हे ऑनलाईन त्रैमासिक, त्याचा दुसरा अंक आता प्रकाशित होणार आहे आजच्या काळात वाचनाकडे दुर्लक्ष होत असताना आपणच ऑनलाइन माध्यमातुन सगळयापर्यंत पोहोचावं आणि विविध कलाकारांना, साहित्यिकांना जगभर पोहचता यावा हा विचारच खूप प्रशंसनीय आहे.

**– रोहित देशमुख**
अभिनेते

◆◆◆◆◆◆



गोमंत तरंगला माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा.
वैविध्यपूर्ण लेख, उत्कृष्ठ मांडणी आणि अनुभवी लेखन यामुळे पहिला अंक यशस्वी आणि परिपूर्ण झाला आहे.

पुढच्या अंकाची आम्ही वाट पहात आहोत.

**-विनिता दाते**
अभिनेत्री मराठी/हिंदी रंगभूमी

◆◆◆◆◆◆



नव्या विचारांची आणि जाणीवांची दिशा देणारे 'गोमंत तरंग' हे त्रैमासिक गोव्याच्या पर्यटन वैभवाला, पाककलेच्या अद्वितीय चवीला आणि क्रीडा क्षेत्रातील उमेदीला नवी ओळख देवो. सामाजिक अडचणींवर प्रकाश टाकत आणि विकासाच्या वाटचालीला बळ देत हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरो हार्दिक शुभेच्छा!

**- मास्टरशेफ दीपा महाम्बरे अवचट**
लेखक, सी. ई. ओ., मा. आय. सि. एस,
संस्थापक - गोवा पोर्तुगीजा ग्रुप ऑफ रेस्टॉरंट, मा. आय. सि. एस

◆◆◆◆◆◆



'गोमंत तरंग' हे त्रैमासिक केवळ साहित्यिक उपक्रम न राहता गोव्याच्या जीवनाचा सर्वांगीण दस्तावेज ठरो. पर्यटन, पाककला, क्रीडा आणि सामाजिक अडचणींवर भाष्य करत गोव्याच्या विकासाला नवी गती देणारा हा प्रवास यशस्वी होवो. मन:पूर्वक शुभेच्छा!

**- डॉ. सुहास अवचट,**
एम.डी, एफ.आर. एस. एच. (यू के).
राष्ट्रपती पदक, महाराष्ट्ररत्न, उद्योग श्री,
मा. विशेष पोलीस अधिकारी,
विशेष कार्यकारी दंडाधिकारी

◆◆◆◆◆◆

संपादक गोमंत तरंग त्रैमासिक
स. न. वि. वि.

थि गोवा हिंदु असोसिएशन ही मुंबईतील १०६ वर्षांची जुनी संस्था आहे. या संस्थेतर्फे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर (१९ मार्च) गोमंत तरंग या त्रैमासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.

अंक वाचला. या अंकाच्या माध्यमातून गोमंतकीय संस्कृती, संस्थेची गौरवशाली परंपरा व साहित्य अभिव्यक्ती याचा आढावा घेण्यात येणार असून विविध क्षेत्रातील मान्यवरांचे विचार मांडणार असल्याचे संपादक जितेश सावंत यांचे संपादकीय मधील विचार वाचून आनंद वाटला.

संस्थेने १९२५ पासून २०११ पर्यंत रंगभूमीवर संगीत, ऐतिहासिक, विनोदी अनेक नाटके सादर केली. यासाठी अनेक मान्यवर नाटककार, कलाकारांचे फार मोठे योगदान लाभले. (संदर्भ शतक महोत्सवी स्मरणिका स्मृतीगंध) आता सात वर्षांनी संस्थेने 'सुभेदार गेस्ट हाऊस' हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आणले. नाटकाचे दिग्दर्शन विजय केकरे यांनी केले आहे. नाटकाला नाट्य रसिकाकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अंकात संपादक जितेश सावंत यांनी दिग्दर्शक विजय केकरे यांची घेतलेली मुलाखत उत्तम आहे. अंकात त्रैमासिकासाठी मराठी भाषा, गोव्याची भाषा, इंग्रजी भाषामधून आलेली अनेक शुभेच्छा पत्रे - छापण्यात आली आहेत.

पुढील अंकातून कविता, कथा, पुस्तक परीक्षणे, संस्थेसाठी योगदान दिलेल्या दिवंगत नाटककार कलावंत तसेच दिवंगत कार्यकर्त्यांच्या जयंती व स्मृतीदिनाचे स्मरण करणारी सदरे असावीत.

गोमंत तरंग या त्रैमासिकाला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा. तसेच संपादक जितेश सावंत, उपसंपादक समीर कामत तसेच संपादक मंडळ श्री. राजेंद्र पै, ॲडव्होकेट प्रभुदेसाई, श्रीमती शर्मिला रेडकर, श्रीमती रजनी लोटलीकर, श्रीमती रश्मी हळर्णकर यांना माझ्या शुभेच्छा.

आपणाकडून उत्तमोत्तम दर्जेदार अंक (त्रैमासिकाचे) वाचायला मिळो ही - ईश्वरचरणी प्रार्थना.

- **सुरेंद्र तेलंग** (पत्रकार आणि समीक्षक)
भ्रमणध्वनी ९३२३५७२४३२.

◆◆◆◆◆◆



Hearty congratulations team Goa Hindu Associtation on the occasion of publication of the First issue of Gomant Tarang. I found it to be a well designed publication with very informative content. I extend my best wishes to the Team for this initiative and hope they will be sharing high quality content in every future publication.

Regards,

**– Ajit Gunjikar**

Director - Ar- Ex Laboratories

◆◆◆◆◆◆



थि गोवा हिंदु असोसिएशन हि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कार्यरत असणारी जुनी जाणती संस्था आहे! आता या संस्थेतर्फे गोमंत तरंग हे त्रैमासिक सुरू झाले आहे! त्यानिमित्ताने माझ्या कडून या संस्थेस मन:पूर्वक शुभेच्छा!

**– श्री. पराग नगर्सेकर**
चेअरमन गोवा डेअरी! फोंडा गोवा!

◆◆◆◆◆◆



‘गोमंत तरंग’ - गोमंतकीय संस्कृताय आनी समाजीक अस्मितेचो हारसो

**आदित्य सिनाय भांगी,**
सहायक प्राध्यापक (हिंदी), गोंय विद्यापीठ, ताळगांव, - गोंय.
९६७३५८५९५३

‘धि गोवा हिंदु असोसिएशन’ हे शंबर वर्सां परस चड परंपरा आशिल्ले संस्थेन उजवाडायिल्ल्या ’गोमंत तरंग’(एप्रिल-जून २०२६) ह्या त्रैमासिकाचो पयलो अंक म्हणल्यार फकत एका संस्थेचें मुखपत्र न्हय, तर तो गोमंतकीय संस्कृताय, कला आनी समाजीक जाणिवांचो एक गिरेस्त दस्तऐवज. १९१९ वर्सा स्थापना जाल्ली आनी मुंबय सारकेल्या महानगरांत गोमंतकीयांचें संस्कृतीक केंद्र जाल्ल्या हे संस्थेचो हो नवो उपक्रम कोंकणी-मराठी साहित्य आनी संस्कृतीक चळवळींत मोलाची भर घालतलो हातूंत मात्तूय दुबाव ना.

संपादक जितेश सावंत आनी तांच्या पंगडान ह्या अंकांत फकत माहिती एकठांय न करता, तिका वैचारीक अधिश्ठान दिवपाचो यत्न केला. अंकाची सुरवात संस्थेच्या गौरवशाली इतिहासाची याद करून दिता आनी फुडारांतल्या वाटचालीचो वेध घेता. मुंबय रावन लेगीत आपल्या गोमंतकीय मुळां कडेन घट्ट जोडून रावपाची ओढ अंकाच्या दर एका पानाचेर जाणवता.

या त्रैमासिकाचें सगळयात व्हड खाशेलपण म्हणल्यार तातूंतली विशयांची वैविधता. हातूंत संस्थात्मक कार्य, ‘धि गोवा हिंदु असोसिएशन’च्या २०२५-२०२७ च्या व्यवस्थापन समितीची माहिती आनी तांच्या संकल्पना स्पश्टपणान मांडल्यात. गोंयचो दायज, थंयची लोककला आनी संगीताची परंपरा हांचेर उजवाड घालपी लेख वाचपा सारके आसात. मुंबयच्या गोमंतकीयांच्या समाजीक गरजो आनी तांच्या खातीर राबयिल्ले उपक्रम हांचो नियाळ घेतिल्ल्यान, हो अंक समाजाक जोडपी जाला.

अंकाच्या तांत्रिक आंगाचो विचार केलो जाल्यार, मांडावळ बरी आसा. फोटोचे वापरान अंक आनिकूय आकर्षक जाला. लेखनाची भास सुटसुटीत आसा, जी दरेक पिळगेच्या वाचकाक आपलीशी दिसता. ‘गोमंत तरंग’ कडून फुडारांत कांय अपेक्षा नक्कीच आसतल्यो. अंकांत तरूण पिळगेच्या लेखनाक आनी तांच्या मुखावल्या आधुनिक आव्हानांक (जशे तंत्रज्ञान, स्थलांतर, बदलती जीवनशैली) चड सुवात दिवची. तशेंच, गोंयच्या थळाव्या बोलीभासा आनी प्रमाण मराठी हांचो मेळ घालपी विभाग आसचे.

थोडक्यांत सांगपाचें जाल्यार, ‘गोमंत तरंग’ हो अंक फकत वाचून कुशीक दवरपाचो न्हय, तर तो सांबाळून दवरपा सारको आसा. संस्कृतीक गिरेस्तकाय सांबाळप आनी नवे पिळगेक आपल्या दायजाची वळख करून दिवपाचें म्हत्वाचें काम ह्या अंकांन यशस्वीपणान केलां. जितेश सावंत आनी तांच्या संपादकीय मंडळाचें हें पावल सामके तोखणायेचें आसा. फुडारांत हें त्रैमासिक गोमंतकीय साहित्याचो एक म्हत्वाचो स्तंभा थरतलो, हातूंत दुबाव ना.

# जाहीर आभार

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर प्रकाशित झालेल्या 'गोमंत तरंग'च्या पहिल्या अंकाला आपण सर्वांनी दिलेले प्रेम, उत्स्फूर्त प्रतिसाद आणि भरभरून कौतुक आमच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले आहे. पहिल्याच पावलापासून आपण दाखवलेला विश्वास, आपुलकी आणि सततची साथ हीच आमच्या पुढील वाटचालीची खरी ताकद आहे. आता आपल्या हातात 'गोमंत तरंग'चा दुसरा अंक सुपूर्द करताना आम्हांला विशेष आनंद होत आहे. या दुसऱ्या अंकालाही आपण दिलेले प्रेम, सहकार्य, प्रोत्साहन आणि उत्स्फूर्त प्रतिसाद याबद्दल आम्ही मन:पूर्वक आभारी आहोत.

मराठी चित्रपट आणि नाट्यसृष्टीचे लाडके अभिनेते, पद्मश्री आणि महाराष्ट्र भूषण माननीय श्री. अशोक सराफ तसेच अभिनेत्री श्रीमती निवेदिता सराफ यांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून 'गोमंत तरंग'च्या पहिल्या अंकाचे अत्यंत दिमाखदार प्रकाशन करून दिले, यासाठी आम्ही त्यांचे मन:पूर्वक ऋणी आहोत.

तसेच, 'गोमंत तरंग'च्या या प्रवासावर विश्वास ठेवून आम्हाला मोलाचे पाठबळ देणारे सर्व हितचिंतक, जाहिरातदार, आपल्या प्रतिभावान लेखणीने अंक समृद्ध करणारे लेखक, प्रेमाने अभिप्राय देणारे मान्यवर, संस्थेचे सभासद, रसिक वाचक तसेच अंकाला आकर्षक व देखणे रूप देणारी आमची डिझाईन टीम या प्रत्येकाचा सहभाग आमच्यासाठी अमूल्य आहे.

पहिल्या आणि दुसऱ्या अंकाच्या निर्मितीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, कळत-नकळत ज्यांनी आम्हाला सहकार्य केले, मार्गदर्शन केले आणि प्रेरणा दिली त्या सर्वांविषयी आम्ही मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

आपले प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद असेच कायम लाभत राहोत, हीच अपेक्षा.

संपादक मंडळ
'गोमंत तरंग'

## उत्सव चैतन्याचा, सोहळा आनंदाचा!



'धि गोवा हिंदु असोसिएशन' आणि 'गोमंत तरंग' परिवारातर्फे सर्व वाचक, सभासद आणि हितचिंतकांना १४ सप्टेंबर २०२६ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या मन:पूर्वक आणि हार्दिक शुभेच्छा!

बुद्धीची देवता असलेला आणि विघ्नहर्ता असणारा आपला लाडका बाप्पा आपल्या सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य घेऊन येवो. तसेच हा गणेशोत्सव आपल्या घरोघरी आणि सांस्कृतिक जीवनात आनंदाचे, नवचैतन्याचे नवे सूर घेऊन येवो, हीच बाप्पाच्या चरणी श्रद्धापूर्वक प्रार्थना!

।। गणपती बाप्पा मोरया ।।

संपादक आणि संपादकीय मंडळ,

**संस्थेचा वर्धापन दिन व श्री सत्यनारायण महापूजा**

**दरवर्षी प्रमाणे यंदाही २४ ऑगस्ट रोजी धि गोवा हिंदु असोसिएशनच्या कार्यालयात संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात येणार आहे.**

## वाचकांसाठी आवाहन (Appeal)

'गोमंत तरंग' त्रैमासिक हे आपले सामूहिक व्यासपीठ आहे !आम्ही आपल्यातील लेखकाला आणि विचारवंताला आमंत्रित करत आहोत. गोमंतकीय संस्कृती, साहित्य, कला, इतिहास, समाजकार्य आणि आपल्या अवतीभवती घडाऱ्या सकारात्मक घडामोडी यांवर आधारित आपले लेखन आम्ही आनंदाने स्वीकारू.

आपल्या मौल्यवान सूचना आणि अभिप्रायांमुळे हे त्रैमासिक अधिक समृद्ध व अर्थपूर्ण बनेल.

आपण किंवा आपल्या परिचयातील एखाद्या सदस्याने उल्लेखनीय यश संपादन केले असल्यास, ती माहिती आम्हाला जरूर पाठवा. अशा यशाचा गौरव 'गोमंत तरंग' मध्ये करण्यात येईल.

प्राप्त साहित्याबाबत आणि संपादनाबाबतचा अंतिम निर्णय संपादकीय मंडळाचा राहील.

**लेखन, सूचना व माहिती पाठवण्यासाठी संपर्क:**

ई-मेल:gomanttarag@gmail.com

फोन: ०२२-४९७९८२५६ / ९०८२१८३८०६

वेबसाइट: https://goahinduasso.org/

संपादकीय मंडळ, 'गोमंत तरंग' (धि गोवा हिंदू असोसिशएन)

## Appeal to Readers

"Gomant Tarang", our quarterly magazine, is a collective platform for all of us.We warmly invite the writer and thinker within you to contribute articles on Goan culture, literature, art, history, social initiatives, and other positive developments in society.If you or someone known to you has achieved something noteworthy, kindly share the details with us. Such achievements will be acknowledged and featured in "Gomant Tarang." Your valuable suggestions and feedback will help make Gomant Tarang more meaningful and enriching for all our readers. The Editorial Board reserves the final decision regarding the selection and editing of all submitted material.

**For submissions, suggestions, and information, please contact:**

Email: gomanttarag@gmail.com

Phone: 022-49798256 / 9082183806

Website:https://goahinduasso.org

Editorial Board, "Gomant Tarang" (The Goa Hindu Association)

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(शेड्युल्ड बँक)

विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...

## Strong & Steady returns with peace of mind.

## FIXED DEPOSITS

## आकर्षक व्याजदर!

**7.40% p.a.** ज्येष्ठ नागरिकांसाठी

**7.00% p.a.** इतरांसाठी



अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेशी
किंवा www.saraswat.bank.in या वेबसाईटवर संपर्क करा.

नियम व अटी लागू. जुलै 2026

Follow us: